सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, १ जून २०२६ | वर्ष ४ थे अंक ८४ | पाने १२ | किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# दूरदृष्टी विकासाची, पायाभरणी समृध्दीची...

## धाराशिव जिल्हयाच्या प्रगतीचे शिल्पकार
## सिंचन क्रांतीचे जनक आणि जनसामान्यांचे कैवारी,

# लोकनायक



# आदरणीय डॉक्टर साहेबांना

# वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

## धाराशिवच्या विकासाचे सहा सोनेरी टप्पे

**सिंचन क्रांती व आर्थिक समृद्धी :**
कोप बंधारे, पाझर व साठवण तलाव,लघु व मध्यम प्रकल्पांमुळे सिंचनक्षेत्रात मोठी वाढ झाली. दुष्काळी शिक्का असलेल्या जिल्ह्यात मराठवाड्यात सर्वाधिक ऊस उत्पादन झाले, साखर उद्योग आणि शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती साध्य झाली.

**कृष्णा खोऱ्याचे ऐतिहासिक पाणी :**
जिल्ह्याच्या भविष्यातील पाण्याची गरज ओळखून २१ टीएमसी पाणी योजना मंजूर करून आणली.

**धाराशिवच्या पाणीप्रश्नाला कायमस्वरूपी दिलासा :**
उजनी धरणातून १६ एमएलडी पाणी आरक्षित करून शहराच्या पाणीपुरवठ्याला बळकटी दिली.

**रेल्वे विकासाचे शिल्पकार :**
धाराशिवला रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर स्थान मिळवून देत विकासाची नवी दारे खुली केली.

**उच्च शिक्षणाची दारे खुली :**
अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण, आयुर्वेद, कृषी व विद्यापीठीय शिक्षणाच्या सुविधा जिल्ह्यात उपलब्ध करून दिल्या.

**ऊर्जा क्षेत्रातील प्रकाशपर्व :**
जिल्ह्यासह राज्यभर सक्षम वीजजाळ्याचा विस्तार आणि सिंगल फेज योजनेची प्रभावी अंमलबजावणी.

## शुभेच्छुक : तेरणा परिवार

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### लाडकी बहीण योजनेतील ८० लाख महिला अपात्र

**मुंबई :** मुंबईतील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ई-केवायसी प्रक्रियेची अंतिम मुदत संपल्यानंतर समोर आलेल्या आकडेवारीनुसार सुमारे ८० लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या आहेत. त्यामुळे योजनेतील लाभार्थ्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. महिला व बालविकास विभागामार्फत राबवली जाणारी ही योजना जुलै २०२४ मध्ये सुरू करण्यात आली होती. सुरुवातीला सुमारे २ कोटी ४६ लाख महिला या योजनेचा लाभ घेत होत्या. मात्र ई-केवायसी पडताळणीनंतर ही संख्या आता सुमारे १ कोटी ६६ लाखांवर आली आहे. योजनेच्या अटींनुसार लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच इतर पात्रता निकषही लागू करण्यात आले आहेत. पात्र लाभार्थ्यांची अचूक ओळख पटावी यासाठी ई-केवायसी मोहीम राबवण्यात आली होती. ■

### भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून भाविकांसाठी खुले

**पुणे :** पुण्यातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर पुन्हा एकदा भाविकांसाठी खुले होणार आहे. तब्बल काही महिन्यांच्या नूतनीकरण आणि विकासकामांनंतर मंदिर प्रशासनाने १५ जून २०२६ पासून नियमित दर्शन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सन २०२७ मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू होती. मंदिराचा मुख्य सभामंडप आणि पायरीमार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून भाविकांच्या सोयीसाठी आधुनिक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या कामांमुळे मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून तात्पुरते बंद ठेवण्यात आले होते, त्यानंतर ही मुदत ३१ मे २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती. ■

# आमची भूमिका मराठा समाजाला न्याय देण्याची

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उद्गार

◆ **अहिल्यानगर, ३१ मे**

आमच्या सरकारची मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका सातत्याने घेतली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना जी आश्वासने दिली आहेत ती त्यांनी स्वतःहा वाचून दाखविली. त्यामुळे भविष्यातही आम्ही मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री फडणवीस आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले असून त्यांना कोणती आश्वासने दिली आहेत, अशी विचारणा पत्रकारांनी केली असता ते म्हणाले की, सरकारने जी आश्वासने दिली आहेत ती सर्वांच्या समोर आहेत. स्वतःहा मनोज जरांगे, मंत्री राधाकृष्ण पाटील आणि प्रसाद लाड यांनी वाचून दाखविली आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस रविवारी चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आले होते. राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू अस्मिता जागृत ठेवली. तसेच शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार केला. एवढेच नव्हे तर त्यांनी लोकशासन आणि लोकप्रशासन कसे असू शकते याचे आदर्श उदाहरण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर घालून दिले. गेल्या वर्षी ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने चोंडीमध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेतली होती. जे निर्णय घेतले ते सर्व कामे आम्ही सुरू केली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# मनोज जरांगेंनी मागे घेतले उपोषण

◆ **जालना, ३१ मे**

महाराष्ट्र सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर मराठा आरक्षणाचे कार्यकर्ते मनोज जरांगे यांनी रविवारी पहाटे बेमुदत उपोषण मागे घेतले. राज्य सरकारच्या प्रतिनिधींनी त्यांना १२ कलमी प्रस्ताव सादर केला होता.



जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावात शनिवारी सकाळी मागील तीन वर्षांतील नववे बेमुदत उपोषण सुरू करणारे जरांगे यांनी मध्यरात्रीनंतर काही वेळातच ते मागे घेतले. शनिवारी जरांगे यांनी कडक उन्हात उपोषण सुरू केले होते. नंतर सरकारच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडे १२ कलमी प्रस्ताव सादर केला आणि त्यांना आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांच्या नेतृत्वातील सरकारच्या प्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली. आतापर्यंत निश्चित करण्यात आलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रे देण्यास राज्य सरकारने सहमती दर्शवली आहे. ही कागदपत्रे गावातील ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये प्रदर्शित केली जातील. या अंमलबजावणीची जबाबदारी विभागीय आयुक्तांच्या कार्यालयावर असेल, असे जरांगे यांनी समर्थकांना संबोधित करताना सांगितले.

### १५ दिवसांनंतर घेणार आढावा

वैध नोंदी उपलब्ध असूनही प्रमाणपत्रे देण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. सरकारने या संदर्भात औपचारिक आदेश जारी करावेत आणि ते सर्व संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवावेत, अशी मागणी करण्यात आल्याची माहिती जरांगे यांनी दिली. १५ दिवसांनंतर जात वैधता प्रमापत्राच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यासही सरकारने सहमती दर्शवली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठा आणि कुणबींसाठी स्वतंत्र मंत्रालयाच्या मागणीला पाठिंबा कायम असल्याचे त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

# तरुणांच्या योगदानातून भारत बलशाली

## मन की बात कार्यक्रमातून पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन



◆ **नवी दिल्ली, ३१ मे**

प्रत्येक क्षेत्रात तरुणांचे योगदान वाढत असून, यामुळे भारताची वाटचाल विकसित राष्ट्राच्या दिशेने सुरू आहे. देशाचे खेळाडू नवीन विक्रम मोडत आहेत. देशातच नव्हे, तर परदेशातही भारतीय तरुणांच्या प्रतिभेचा बोलबाला आहे. देशाचे खेळाडू नवीन विक्रम मोडत असून, त्यांनी जागतिक ओळख निर्माण केल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मन की बात कार्यक्रमात म्हणाले.

रेडिओवर प्रसारित मन की बातच्या १३४ व्या भागात देशवासीयांना संबोधित करताना मोदी यांनी भारतीय खेळाडू गुरिंदरवीर सिंग आणि अनिमेश कुजूर यांच्याशी झालेल्या संभाषणाचाही उल्लेख केला. तरुणांच्या वाढत्या उत्साहाची आणि त्यांनी प्रस्थापित केलेल्या नवीन विक्रमांची प्रशंसा केली. नेदरलँड्ससह पाच देशांच्या अलीकडील दौऱ्यातील अनुभव सांगताना ते म्हणाले, परदेशात भारतीयांनी प्रतीभेच्या जोरावर निर्माण केलेली स्वतःची ओळख पाहून मी भारावून गेलो. ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे. नेदरलँड्समध्ये आयोजित एका विशेष समारंभात चोळ काळातील प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आले. समृद्ध इतिहासाचा आणि संस्कृतीचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. भारताचा हा अमूल्य वारसा जपण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. याच संदर्भात, ज्ञान भारतम अभियान अंतर्गत छत्तीसगडमधील मल्हार येथे एक महत्त्वाचा शोध लागला आहे. येथे तीन दुर्मिळ ताम्रपट सापडले असून, ते पांडुवंशी घराण्यातील महर्षी बलारजुन यांच्या कारकिर्दीशी संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### भारतीय संस्कृतीचा आकाश, ताऱ्यांशी संबंध

खगोलशास्त्राचा संदर्भ देत पंतप्रधान म्हणाले, भारतीयांना खगोलशास्त्राबद्दल नेहमीच विशेष आकर्षण राहिले आहे. आपल्या देशात जुन्या वेधशाळा आजही अस्तित्वात आहेत, जिथे गणिताचे अद्भुत शोध लागले आहेत. नौकानयन असो, दिनदर्शिका असो किंवा आपले सण असोत, या सर्वांचा संबंध आकाश आणि ताऱ्यांशी आहे. मी बंगळूरु ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीबद्दल जाणून घेतले आहे, जिथे निरीक्षण सत्रे आयोजित केली जातात. देशभरात खगोलशास्त्र क्लब अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. ■

### गिरिजा अम्मांचे कार्य प्रेरणास्पद

तामिळनाडूतील नागरकोविल येथील शिक्षिका गिरिजा अम्मा सुमारे १५ शाळा चालवतात, त्यापैकी चेन्नईतील जयगोपाल गारोडिया हिंदू विद्यालय ही सर्वात प्रमुख आहे. त्यांची देशभक्तीची भावना प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देते. त्यांनी देशाच्या अनेक सैनिकांसाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. यासाठी, त्यांनी त्यांच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी मुलांना शूर सैनिकांसाठी दररोज एक रुपयाचे योगदान देण्यास सांगितले. या योगदानाची रक्कम ४० लाख रुपये झाली. ■

# आसाम मंत्रिमंडळाचा शुक्रवारी विस्तार

◆ **गुवाहाटी, ३१ मे**

आसाम सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार शुक्रवारी, ५ जून रोजी होणार आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी ही माहिती दिली. नवीन मंत्र्यांच्या शपथविधीसोबतच अनेक मंत्र्यांच्या खातेवाटपातही फेरबदल होण्याची शक्यता आहे.

सरमा यांनी रविवारी राज्य मंत्रिमंडळ विस्ताराची घोषणा करताना एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, आसाम सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार ५ जून रोजी होणार आहे. मंत्रिमंडळात कोणत्या नवीन चेहऱ्यांचा समावेश केला जाईल किंवा कोणत्या खात्यांमध्ये बदल केला जाईल हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले नसले तरी, गेल्या अनेक आठवड्यांपासून आसामच्या राजकीय वर्तुळात मंत्रिमंडळ विस्तार आणि फेरबदलाची चर्चा सुरू आहे. या विस्तारामुळे मंत्रिमंडळातील रिक्त जागा भरल्या जातील आणि काही विद्यमान मंत्र्यांच्या खात्यांमध्येही बदल होऊ शकतो. सध्या, मुख्यमंत्र्यांव्यतिरिक्त मंत्रिमंडळात केवळ चार मंत्री आहेत. (वृत्तसंस्था)

# व्हिटॅमिन डी-३, कॅल्शियमसह ३० औषधे स्वस्त!

## औषधांच्या किमतींवर सरकारचा अंकुश

◆ **नवी दिल्ली, ३१ मे**

सामान्य नागरिकांना अत्यावश्यक औषधे योग्य आणि परवडणाऱ्या दरात मिळावीत यासाठी राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्राधिकरणाने एकूण ३० औषधांच्या कमाल किरकोळ किंमती निश्चित केल्या असून त्या तात्काळ लागू करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे औषध बाजारात पारदर्शकता वाढण्यासोबतच रुग्णांच्या खिशावरील भार कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



२७ मे २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशात व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, मिथाइलकोबालामिन, एल-मिथाइलफोलेट कॅल्शियम, पायरीडॉक्सल-५ फॉस्फेट यांसारख्या महत्त्वाच्या जीवनसत्व आणि आरोग्यपूरक औषधांचा समावेश आहे. ही औषधे हाडांचे आरोग्य, व्हिटॅमिनची कमतरता आणि विविध न्यूरोलॉजिकल समस्यांवरील उपचारांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. याशिवाय बिलास्टिन-मॉन्टेलुकास्ट टॅब्लेट, बिसोप्रोलोल फ्युमरेट, ॲटोरवास्टॅटिन-फेनोफायब्रेट आणि ॲम्लोडिपिन यांसारख्या औषधांचाही या यादीत समावेश आहे. प्रत्येक औषधाची प्रति युनिट नवीन किंमत निश्चित करण्यात आली असून उत्पादक आणि विक्री करणाऱ्या कंपन्यांना या दरांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.विशेष म्हणजे व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, मिथाइलकोबालामिन आणि संबंधित घटक असलेल्या गोळ्यांची किंमत प्रति टॅब्लेट सुमारे १९.७८ निश्चित करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### मनमानी थांबेल

काही कोलेस्ट्रॉल नियंत्रण औषधांची किंमत १८.४६ प्रति गोळी इतकी ठेवण्यात आली आहे. एनपीपीएच्या मते, या निर्णयाचा मुख्य उद्देश अत्यावश्यक औषधे सर्वसामान्यांना वाजवी दरात उपलब्ध करून देणे आणि बाजारातील अनियंत्रित किंमतींवर नियंत्रण ठेवणे हा आहे. नवीन दर लागू झाल्याने आरोग्यसेवा खर्चात काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ■



राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यातील पुष्कर येथे अधिक मासातील पौर्णिमेनिमित्त महाआरती करताना पुजारी

### केदारनाथ यात्रा स्थगित; बद्रीनाथ मार्गावर जाम

**डेहराडून :** उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून बदललेल्या हवामानाने संपूर्ण पर्वतीय भागात भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि रस्त्यांची दुरवस्था यामुळे प्रसिद्ध केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. रुद्रप्रयाग जिल्हा प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतल्याने अनेक भाविक विविध मार्गांवर अडकले आहेत.हवामान विभागाने राज्यात ऑरेंज अलर्ट जारी केला असून, सततचा पाऊस आणि डोंगराळ भागात होणारे भूस्खलन यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. प्रशासनाने यात्रेकरूंना सुरक्षित ठिकाणी थांबण्याचे आवाहन केले असून हेल्पलाइन क्रमांकही जारी केले आहेत. आपत्कालीन मदतीसाठी ११२ वर संपर्क साधण्याची सुविधा देण्यात आली आहे. ■




### नायडू यांनी सांगितली मोदींची नवी व्याख्या

**केंद्रीय** कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करतांनाच्या ३५ वर्षांच्या आठवणींवर आधारित 'अपनापन' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच दिल्लीत झाले. माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. नायडू आणि देवेगौडा हे दोघेही दक्षिण भारतातील. मोदी यांच्या सरकारमध्ये मंत्री असतांना नायडू पंतप्रधान मोदी यांचा उल्लेख नेहमी मोडी असा करत असत. बहुधा दक्षिण भारतात द या शब्दासाठी ड या शब्दाचा वापर करत असावेत. चौहान यांच्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात नायडू यांनी मोदी या शब्दाची नवीन व्याख्या उपस्थितांसमोर केली. 'मेकिंग ऑफ डेव्हलप्ड इंडिया' (एमओडीआय) असा मोदी या शब्दाचा नवा अर्थ नायडू यांनी सांगितला. राज्यसभेचे सभापती असतांना नायडू यांची कोणत्याही विषयावरची उत्स्फूर्त प्रतिक्रिया ऐकण्यासारखी राहायची. शिवराजसिंह चौहान यांची पहिल्यांदा मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून कशी निवड झाली, तो किस्साही नायडू यांनी उपस्थितांना सांगितला. शिवराजसिंह चौहान यांनी मोदी यांच्यासोबत काम करतांनाच्या अनेक आठवणींना या पुस्तकातून उजाळा दिला. एक व्यक्ती म्हणून मोदी पक्षाच्या नेत्याचा आणि कार्यकर्त्यांचा किती विचार करतात, हे त्यांनी अनेक उदाहरणातून स्पष्ट केले.

एखाद्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री उपस्थित असण्याचा हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा. या कार्यक्रमाला मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, केंद्रीय मंत्री मनोहरलाल, ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

●● ●●

### पहेलवान मुरलीधर मोहोळ राजकारणाच्या आखाड्यात

**केंद्रीय** नागरी उड्डयण आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ जवळपास दोन दोनअडीच महिन्यांच्या प्रदीर्घ वैद्यकीय रजेनंतर राजकारणाच्या आखाड्यात पुन्हा एकदा नव्या दमाने उतरले आहेत. शनिवार ३० मेला त्यांनी दिल्लीत आपल्या मंत्रालयाच्या कामांना सुरुवात केली. भाजपा कार्यकर्ते आणि पुण्याच्या जनतेत मुरलीअण्णा म्हणून ओळखले जाणारे मोहोळ तसे कुस्तीच्या आखाड्यातील खरेखुरे पहेलवान. पण कुस्तीचा आखाडा सोडून त्यांना राजकारणाच्या आखाड्यात उतरावे लागले. पुण्याचे महापौर राहिलेले मोहोळ यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला चारीमुंड्या चित केले. पहिल्यांदाच खासदार म्हणून निवडून आलेल्या आलेल्या मोहोळ यांचा मोदी यांनी आपल्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश केला आणि त्याच्याकडे सहकार तसेच नागरी उड्डयण अशा दोन महत्वाच्या खात्यांची जबाबदारी सोपवली. अमित शाह सहकार खात्याचे कॅबिनेट मंत्री आहेत, म्हणजे मोहोळ यांच्या खात्याचे महत्व लक्षात येईल. जवळपास ३० वर्षांपूर्वी कुस्ती खेळतांना मोहोळ यांच्या पायाला दुखापत झाली. त्यावेळी त्यांनी त्यावर उपचारही केले. पण जवळपास ३० वर्षानंतर त्यांचा पायाचा त्रास पुन्हा उमळला. ऑपरेशनशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरु असतांना मोहोळ यांना ऑपरेशन करावे लागले. १३ मार्चला पुण्यातील एका रुग्णालयात ऑपरेशन झाले. ऑपरेशननंतर डॉक्टरांनी त्यांना जवळपास अडीचतीन महिने पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. जनतेच्या सेवेचा ध्यास घेतलेले अण्णा रुग्णालयातील पलंगावर अस्वस्थ होते. कधी एकदा आपण जनतेच्या सेवेसाठी मातीच्या मैदानात उतरतो, असे त्यांना वाटत होते. त्यानुसार पाय अजून पूर्णपणे बरा झालेला नसतांना तसेच विश्रांतीची गरज असतांना मोहोळ दिल्लीला परत आले, आणि आपल्या कामावर रुजू झाले. शनिवारी आपल्या मंत्रालयाच्या अनेक बैठकांना ते उपस्थित राहिले.

●● ●●

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराची पुन्हा चर्चा

**केंद्रीय** मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चर्चा अधूनमधून होत असते. पण भाजपाने चार राज्यातील प्रदेश अध्यक्ष बदलवले. केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा यांच्याकडे दिल्ली प्रदेश भाजपाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. मल्होत्रा रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे राज्यमंत्री आहेत. त्यांना आता दिल्लीतील भाजपाचा संघटनात्मक रस्ता २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रशस्त करावा लागणार आहे. याआधी भाजपाने पंकज चौधरी यांना उत्तरप्रदेश भाजपाचे अध्यक्ष बनवले होते. सलग सातवेळा खासदार म्हणून निवडून आलेले चौधरी केंद्रात अर्थराज्यमंत्री आहेत. उत्तरप्रदेश भाजपाच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतरही पंकज चौधरी यांनी अर्थराज्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही. ते एकाच वेळी केंद्रीय मंत्री आणि उत्तरप्रदेश भाजपाचे अध्यक्ष म्हणून काम पाहात आहेत. तशीच स्थिती हर्ष मल्होत्रा यांचीही होऊ शकते. भाजपात एक व्यक्ती एक पद हे धोरण आहे, त्यामुळे पंकज चौधरी आणि हर्ष मल्होत्रा आता फारकाळ ही दोन पदे आपल्याजवळ ठेऊ शकणार नाहीत. त्यांना केंद्रातील मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागेल. त्यामुळेच मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा यावेळी पुन्हा एकदा सुरु झाली आहे.

●● ●●

### राहुल गांधी दिल्लीतील ऑटोवाल्यांना भेटतात...

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी गेल्या काही महिन्यात चांगलेच सक्रिय झालेले दिसतात. त्यांनी आपले वादग्रस्त परदेश दौरे बंद केले नसले तरी कमी केल्यासारखे दिसतात. त्यामुळे सध्या त्यांना देशातंर्गत घडामोडीत घालण्यासाठी बऱ्यापैकी वेळ मिळतो आहे, असे वाटते. त्यामुळे काही दिवसांपूर्वी त्यांनी दिल्लीतील ऑटोवाल्यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. मंडी हाऊसला लागून असलेल्या बंगाली मार्केटमधील तोडरमल पार्कमध्ये ते ऑटोवाल्यांना भेटले. त्यांच्यासोबत जमिनीवर बसून चर्चा केली आणि डबाही खाल्ला. हा डबा राहुल गांधींनी आपल्यासोबत घरुन नेला होता की तो ऑटोवाल्यांनी त्यांच्यासाठी आणला होता, हे मात्र समजू शकले नाही.

गेल्या काही दिवसांत आखातातील युध्दजन्य परिस्थितीमुळे डिझेल, पेट्रोल आणि सीएनजीच्या किंमतीत वाढ झाली आहे, याचा ऑटोवाल्यांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम झाला आहे. या मुद्यावर चर्चा करत राहुल गांधींनी त्यांना तुमचे प्रश्न मी संसदेत मांडतो, असे सांगत दिलासा देण्याचा प्रयत्न केला. दिल्लीतील ऑटोवाले आतापर्यंत आपचे नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे समर्थक मानले जात होते, आता ते राहुल गांधींचे म्हणजे काँग्रेसचे समर्थक होतात का, याकडे लक्ष लागले आहे.

● **दिल्लीवाला**

# निदा खानसह इतर आरोपींना कोठडी

## नाशिक फाईल्स प्रकरणात तपास वेगात




◆ **नाशिक, ३१ मे**

नाशिक फाईल्स संबंधित कथित लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात आरोपी निदा खान हिला सध्या कोणताही दिलासा मिळालेला नाही. तिच्या जामीन अर्जावरील सुनावणी आता १२ जून रोजी होणार असल्याचे नाशिक रोड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

नाशिक प्रकरणातील अन्य आरोपी दानिश शेख आणि तौसिफ अत्तार यांच्या जामीन अर्जांवरही त्याच दिवशी सुनावणी होणार आहे. निदा खानला छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती आणि ११ मे रोजी तिला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर तिच्या कोठडीत वाढ करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने न्यायालयात दुसरे आरोपपत्र दाखल केले आहे. मुंबई नाका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आलेल्या आठ गुन्ह्यांशी संबंधित हे आरोपपत्र भारतीय न्याय संहिता अंतर्गत सादर करण्यात आले आहे. या आरोपपत्रात अनेक आरोपींची नावे नमूद करण्यात आली असून तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.यापूर्वी २२ मे रोजी एसआयटीने देवलाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल प्रकरणात १५०० पानांचे मोठे आरोपपत्र सादर केले होते. या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

# अभिनेता अंकुर वाढवेवर हल्ल्याचा प्रयत्न

◆ **पुसद, ३१ मे**

'चला हवा येऊ द्या' फेम अभिनेता अंकुर विठ्ठल वाढवे याच्यावर पुसदमध्ये प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न झाला. २० ते ३० लोकांच्या टोळीने २९ मे रोजी हा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.



मूळ पुसदकर असलेल्या अंकुरने फेसबुक पोस्ट व लाईव्ह व्हिडीओच्या माध्यमातून त्याच्यावर ओढावलेली आपबीती सांगितली होती. अंकुर पुसदमध्ये एका चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी आला आहे.

त्याने दिलेल्या माहितीनुसार, या सिनेमाचा भाग असलेले काही मित्र त्याला भेटायला आले होते. त्यातील काही जणांनी मद्यपान केले होते आणि ते शेजारच्या घरासमोर लघुशंका करीत होते.

या प्रकाराला अंकुर व त्याच्या सहकाऱ्यांनी विरोध केला आणि त्यांना परत पाठवले होते. याचा राग मनात धरू तरुणांचे टोळके घेऊन ते अंकुरला मारहाण करण्यासाठी आले. यावेळी टोळीतील काही लोकांनी अंकुरला ओळखले, त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळली नाही. वसंतनगर पोलिस ठाण्याच्या मध्यस्थीने हा संभाव्य हल्ला टळला.

### काय म्हणाला अंकुर

अंकुर त्याच्या लाईव्हमध्ये म्हणाला, मला काही झाले नाही. पुसदमध्ये चित्रीकरण सुरू होते. या सिनेमाचा भाग असणारे मित्र भेटायला आले होते. त्यात काहींनी मद्यपान केले होते. ते शेजारच्या घरावर लघुशंका करीत होते. परिस्थिती चिघळू नये म्हणून आम्ही त्यांना परत पाठवले. त्यातील एक मुलगा २०-३० जण मारहाण करण्यासाठी घेऊन आला होता. ■

### फेसबुकवर दिली माहिती

अंकुरने फेसबुकवर एक पोस्ट करत घडलेली माहिती दिली. पोस्टमध्ये तो म्हणाला, पुसदमध्ये माझ्यावर २० ते ३० लोकांच्या टोळक्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. वसंतनगर पोलिसांच्या मध्यस्थीने प्रकरण टळले. पण यावरून लक्षात येते की, पुसदमध्ये गुन्हेगारी वाढलेली आहे. अंकुरच्या या पोस्टनंतर अनेक मित्र व चाहते त्याची विचारपूस करू लागले. ■

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १ जून २०२६

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. | dainiktarunbharat.com
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कार्य व कार्यक्रम तर शरीर आहे. यामागील उद्देशात खरा प्राण आहे हिंदू संघटन व त्यासाठी आवश्यक आहे सामर्थ्य संपन्न समाज व मार्ग आहे सामाजिक समरसता, सुरक्षा, संपन्नता, संस्कार, संघर्ष, समृद्धता या गुणांचा सम्यक विकास.

**- स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# 'मुंबई'चा सूड घेण्यासाठी आखला होता भयंकर कट

## अटक केलेल्या दहशतवाद्यांची कबुली; आयएसआयचे समर्थन

**मुंबई, ३१ मे**

दिल्ली पोलिसांनी उद्ध्वस्त केलेल्या पाकिस्तान समर्थित आयएसआय-अंडरवर्ल्डच्या अतिरेक्यांनी येथील वांद्रे भागातील 'गरीबनगर' परिसरात अलिकडेच राबवण्यात आलेल्या अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान अनधिकृत मशीद पाडल्याचा सूड घेण्यासाठी मुंबईतील पोलिस आणि सुरक्षा दलांवर हल्ला करण्याचा कट रचला होता, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्ली आणि इतर शहरांमधील महत्त्वपूर्ण प्रतिष्ठाने, सुरक्षा संस्था आणि पोलिस कर्मचाऱ्यांवर हल्ले करण्याचा कथित कट रचणाऱ्या आठ अतिरेक्यांना अटक केल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी शनिवारी दिली. यात एका नेपाळी नागरिकाचा समावेश आहे.

वांद्रा स्थानकाजवळील गरीबनगर येथील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी १९ ते २३ मे या कालावधीत राबवण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान दगडफेक करण्यात आली. यात पोलिसांसह १० जण जखमी झाले. गरीबनगर येथील अतिक्रमण हटाव मोहिमेची संशयितांनी पाहणी केली होती आणि पोलिसांच्या तैनातीचे व्हिडीओ व छायाचित्रे पाकिस्तानातील सूत्रधारांकडे पाठवली होती, अशी माहिती मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने रविवारी वृत्तसंस्थेला दिली.



दिल्ली पोलिसांनी अटक केलेले दहशतवादी

### छोटा शकीलचा निकटवर्तीय कटकारस्थानात

**गरीबनगरमधील अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान तैनात असलेले पोलिस कर्मचारी आणि हिंदू समाजातील सदस्य हे या कटाचे नियोजित लक्ष्य होते, असे अधिकाऱ्याने सांगितले. या कटाचे नियोजन पाकिस्तानची आयएसआय, गुंड शहजाद भट्टी, यावर खान आणि छोटा शकीलचा निकटवर्तीय असलेला अंडरवर्ल्डमधील गुंड मुन्ना झिंगाडा यांनी केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.**

गोपनीय माहितीच्या आधारे दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने २७ मे रोजी मुंबईतील कुर्ला येथून साजिद महबूब शेख उर्फ अरबाज खान आणि ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथून तौकीर रिझवान शेखला अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दादर रेल्वे स्थानकाबाहेरील एका गर्दीच्या पुलाची या दोघांनी संभाव्य लक्ष्य म्हणून पाहणी केली होती, असे तपासात निष्पन्न झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाईल फोनमध्ये मुंबईतील विविध ठिकाणांचे व्हिडीओ तसेच पाकिस्तान आणि दुबई येथील त्यांच्या सूत्रधारांशी झालेली संभाषणे व व्हॉईस नोट्स आढळल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

१९८४ पासून या परिसरात झोपड्या उभारण्यात आल्या. २०१७ मध्ये न्यायालयाने अतिक्रमण हटविण्याचा आदेश दिला होता. परंतु, न्यायालयीन प्रक्रियेमुळे ही झोपडपट्टी हटविण्यास विलंब झाला. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर मनपाने ही कारवाई केली. *(वृत्तसंस्था)*

## सूर्याच्या मारेकऱ्याचा पोलिसांकडून खात्मा

**लखनौ, ३१ मे**

गाझियाबाद येथील १७ वर्षीय किशोर सूर्य प्रताप चौहान यांच्या हत्येतील आरोपीचा उत्तरप्रदेश पोलिसांनी रविवारी पहाटे चकमकीत खात्मा केला. असद असे आरोपीचे नाव आहे.

२८ मे रोजी सूर्य प्रताप चौहानवर चाकूहल्ला केल्यानंतर असद फरार झाला होता. रविवारी पहाटेच्या सुमारास खोडा आणि इंदिरापुरम् पोलिसांच्या संयुक्त पथकासोबत झालेल्या चकमकीत त्याला गोळी लागली. या गुन्ह्यात कथित सहभाग असल्याप्रकरणी त्याच्या वडिलासह आणखी तीन आरोपींना अटक करण्यात आली. चाकूहल्ल्याच्या घटनेनंतर असद फरार झाला होता. *(वृत्तसंस्था)*

# सोलापूर विधान परिषदेसाठी 'भाजपा'कडून राजेंद्र राऊत यांच्या नावावर शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून अखेर बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय निवड समितीने रविवार, दि.३१ मे २०२६ रोजी रात्री उशिरा विधान परिषद विविध जागांसाठी उमेदवारांची अधिकृत यादी प्रसिध्द केली. तीत सोलापूरच्या मतदारसंघासाठी राजेंद्र राऊत यांचे नाव आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्या आणि विद्यमान राजकीय गणित पाहता 'भाजपा'कडे स्पष्ट बहुमत असल्याने पक्षाचा उमेदवार कोण असेल? याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. उमेदवारी मिळविण्यासाठी विशेषतः माजी आमदार राजेंद्र राऊत आणि प्रशांत परिचारक यांच्यात चुरस लागली होती. संघटनात्मक अनुभव, स्थानिक पातळीवरील प्रभाव, राजकीय स्वीकारार्हता या जोरावर राजेंद्र



राऊत यांनी यात बाजी मारली. बार्शी नगरपालिका, कृषी उत्पन्न बाजार समिती यांसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील काम काजाच्या अनुभवामुळे राजेंद्र राऊत यांनी जिल्ह्याच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील बहुमताचे गणित लक्षात घेता भाजपचा विजयाचा दावा अधिक मजबूत झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. गुरुवार, दि.१८ जून २०२६ रोजी या मतदान होणार आहे.

# विधान परिषदेसाठी महायुतीचे ठरले

## जागावाटपाचा फार्म्युला निश्चित; उमेदवारांची लवकरच घोषणा

**मुंबई, ३१ मे**



राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या विधानपरिषदेच्या १७ जागांसाठीच्या महायुतीच्या जागावाटपाचा सस्पेन्स अखेर संपला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अंतर्गत चर्चा, दावे-प्रतिदावे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या दिल्लीतील मॅरेथॉन बैठकांनंतर महायुतीचा अंतिम फॉर्म्युला निश्चित झाला आहे. आगामी निवडणुकीत महायुती '११-४-२' अशा समीकरणासह मैदानात उतरणार आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस अगदी तोंडावर असल्याने रविवारी रात्री या जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. राज्यात सर्वाधिक संख्याबळ असलेल्या भारतीय जनता पक्षाने सुरुवातीला १४ जागा लढवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, महायुतील इतर सहकारी पक्षांना न्याय देण्यासाठी भाजपाने समजुतदारपणे मोठ्या भावाच्या भूमिकेत येऊन, तीन जागा आपल्या मित्रपक्षांसाठी सोडल्या. त्यामुळे भाजपा आता ११ जागांवर आपले उमेदवार उतरवणार असून, यामध्ये नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली या मतदारसंघांचा समावेश आहे. या जागांवर भाजपची स्थानिक पकड मजबूत असल्याने जास्तीत जास्त जागा जिंकून वरिष्ठ सभागृहातील आपले संख्याबळ वाढवण्याचा भाजपचा पूर्ण प्रयत्न असणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देखील या निवडणुकीत मोठी राजकीय तडजोड करावी लागली आहे. *(तभा वृत्तसेवा)*


### शिवसेनेने सोडला कोकणवरील दावा

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुरुवातीला ७ जागांची आग्रही मागणी केली होती, मात्र प्रदीर्घ वाटाघाटींनंतर त्यांच्या वाट्याला ४ जागा आल्या आहेत. यामध्ये शिंदेंचा स्वतःचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यासह नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ या मतदारसंघांचा समावेश आहे. जागावाटपाच्या या तडजोडीत शिवसेनेला कोकणच्या जागेवरील आपला हक्क सोडावा लागला आहे, तसेच छत्रपती संभाजीनगर-जालना या जागेवरून शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या राजकीय रस्सीखेचावरही अंतर्गत तडजोडीने पडदा टाकण्यात आला आहे.**

## महत्त्वाचे

### पेट्रोल, डिझेलवरील निर्यात शुल्कात घट

**नवी दिल्ली :** पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यातीवर लागू असलेल्या विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्कात (विंडफॉल) केंद्र सरकारने ५० टक्क्यापर्यंत कपात केली. नवीन दर १ जूनपासून लागू होणार आहेत. देशांतर्गत बाजारात इंधनाची पुरेशी उपलब्धता राखण्यासाठी पूर्वी आकारण्यात आलेल्या शुल्काचा वेळोवेळी आढावा घेतला जातो, असे सरकारने म्हटले आहे. अर्थ मंत्रालयाच्या प्रसिद्धिपत्रकानुसार पेट्रोल निर्यातीवरील शुल्क निम्मा करून प्रति लिटर १.५ करण्यात आला, डिझेलवरील हा कर प्रति लिटर १३.५ आणि विमान इंधनावरील कर प्रति लिटर ९.५ पर्यंत कमी करण्यात आला आहे. पेट्रोल आणि डिझेल निर्यातीवरील रस्ते आणि पायाभूत सुविधा उपकर शून्य राहणार आहे. सरकारने स्पष्ट केले की, देशांतर्गत वापरासाठी होणाऱ्या पेट्रोल आणि डिझेलवरील सध्याच्या शुल्क दरांमध्ये कोणताही बदल झालेला नाही.



### बंगळुरू सलग दुसऱ्यांदा आयपीएल विजेता; विराट कोहलीचे नाबाद अर्धशतक

**अहमदाबाद, दि. ३१ मे-**

येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी झालेल्या आयपीएलच्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूने गुजरात टायटन्सचा ५ गडी राखून पराभव करीत सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले. विजयासाठी असलेले १५६ धावांचे लक्ष त्यांनी ५ बाद १६१ धावा करीत गाठले. विराट कोहलीने षटकार मारून संघाचा विजय निश्चित केला. सलामीवीर व्यंकटेश अय्यर व कोहलीने शानदार फलंदाज करीत अर्धशतकी भागीदारी केली. अय्यर ३२ धावांवर बाद झाल्यानंतर कोहलीने एका बाजूने शानदार फलदांजी करीत तडफदार अर्धशतक साजरे केले. त्याने ४२ चेंडूत ९ चौकार व ३ षटकार लगावीत नाबाद ७५ धावांची खेळी केली. रजत पाटीदार (१५), टीम डेव्हीड (२४) जितेश शर्मा (नाबाद ११) यांनी संघाच्या विजयात साथ दिली. विराटने आपला अनुभव पुन्हा एकदा पणाला लावत आरसीबीला ही ट्रॉफी जिंकून देण्यात मोलाचे योगदान बजावलं. या जेतेपदानंतर आरसीबी आयपीएलमध्ये सलग दोन वेळा ट्रॉफी जिंकणारा दुसराच संघ ठरलाय. याआधी चेन्नईनं २०१० आणि २०११ साली आयपीएलची ट्रॉफी उंचावली होती. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल २०२६ साठी तब्बल ४६.५ कोटी रुपयांची एकूण बक्षीस रक्कम राखून ठेवली आहे. विजेत्या आणि उपविजेत्या संघांसह प्लेऑफमधील इतर संघांवरही पैशांचा वर्षाव झाला आहे.

(अगोदरचे वृत्त पान ५)

# आम्हीही बळकावला भारताचा भूभाग

**• नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांचे संसदेत वक्तव्य • जमिनीच्या वादात चीन-ब्रिटनलाही ओढले**

**काठमांडू, ३१ मे**

भारताने नेपाळच्या भूभागांवर केलेल्या अतिक्रमणाप्रमाणे नेपाळनेही भारतीय भूभाग बळकावल्याचे आपल्या निदर्शनास आले, असे वादग्रस्त वक्तव्य नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी रविवारी केले. नेपाळी संसदेत दीर्घकाळापासून सुरू असलेल्या सीमावादाबाबत विचारल्या गेलेल्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी उपरोक्त वक्तव्य केले.



या समस्येवर तोडगा काढण्यासाठी इतिहासकार, सर्वेक्षक आणि तज्ज्ञांची मदत घेण्यावर दोन्ही देशांचे एकमत झाले आहे तसेच नेपाळने या मुद्यावर चीन आणि ब्रिटनसोबत राजनयिक चर्चा केल्याचे सांगितले. या माध्यमातून दोन्ही देशांमधील वादात त्यांनी चीन आणि ब्रिटनलाही ओढले.

नेपाळ आणि भारत यांच्यात कालापानी, लिपुलेख आणि लिम्पियाधुरा या क्षेत्रांबाबतचा सीमावाद जुना आहे. या तिन्ही क्षेत्रांवर दोन्ही देश दावा करतात. ही क्षेत्रे उत्तराखंडचा भाग असल्याचे भारताचे म्हणणे आहे आणि हा प्रश्न द्विपक्षीय चर्चेद्वारे सोडवला जावा, असे भारताने स्पष्ट केले.

नेपाळ सरकारने भारताला अधिकृतपणे एक राजनैतिक पत्र पाठवले असून, त्यामध्ये लिपुलेखसह भारताकडून होणाऱ्या प्रदेशांवरील अतिक्रमाणाच्या मुद्याचा उल्लेख करण्यात आला आहे आणि आम्हाला त्यांचे उत्तरही प्राप्त झाले, असे शाह यांनी नेपाळच्या संसदेत सांगितले. इतिहासकार, सर्वेक्षक आणि संबंधित तज्ज्ञांच्या मदतीने, राजनैतिक मार्गांद्वारे एकत्र बसून हा प्रश्न सोडवण्यावर दोन्ही देशांचे एकमत झाले आहे.

नेपाळकडून भारतीय भूभागावर अतिक्रमण केले जात असल्याबाबत नेपाळच्या पंतप्रधानांकडे कोणतीही माहिती नाही, असे भारतातील नेपाळचे माजी राजदूत नीलांबर आचार्य यांनी सांगितले. दोन्ही देशांमधील सीमावादांपैकी ९७ टक्के वाद यापूर्वीच मिटले आहेत. मात्र, काही अद्याप प्रलंबित आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

सीमेवरील काही भागांमध्ये सीमास्तंभ नसल्यामुळे, दोन्ही देशांचे नागरिक परस्परांच्या भूभागाचा वापर करतात, असे आचार्य यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### मित्र बनून समस्या सोडवावी

**एका अशा वस्तुस्थितीबद्दल जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल, ती मला पंतप्रधान झाल्यावर नुकतीच समजली आहे. भारताने केवळ नेपाळच्या प्रदेशांवर अतिक्रमण केले नाही, तर नेपाळनेही अनेक ठिकाणी भारताच्या प्रदेशांवर अतिक्रमण केले आहे, असे शाह म्हणाले. आता दोन्ही देशांनी या वस्तुस्थितीचा अभ्यास करावा आणि मित्र बनून हा प्रश्न सोडवावा, अशी अपेक्षा शाह यांनी व्यक्त केली.**

### चीन-ब्रिटनसोबत चर्चा

**भारत-तिबेट आणि नेपाळची सीमा भिडते तिथे ही तीन ठिकाणे आहेत या मुद्यावर चीन आणि ब्रिटनशी चर्चा केली आहे. ब्रिटिश सरकारने हा प्रदेश सोडून दिला होता, अशा काळाशी संबंधित हा मुद्दा असल्याने त्यांच्यासोबत चर्चा केल्याचे बालेंद्र शाह यांनी सांगितले.**

# राज्यात मेघगर्जना, गारपिटीचा इशारा

**अनेक जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट**

**पुणे, ३१ मे**

राज्यातील विविध भागांत पुढील दोन दिवस वादळी पाऊस, मेघगर्जना आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भ आणि लगतच्या तेलंगणा राज्यावर ०.९ किलोमीटर उंचीवर चक्राकार स्थिती कायम असून नैऋत्य मोसमी पावसाची उत्तर सीमा अद्याप स्थिर आहे. या पृष्ठभूमीवर रविवारी विदर्भातील काही ठिकाणी, तर कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सोमवार (१ जून) राज्यभर तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

पुणे शहर आणि परिसरात पुढील दोन दिवस हवामान मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता असून दुपारनंतर किंवा सायंकाळी आकाश अंशतः ढगाळ होऊ शकते. रविवारी शहरात कमाल तापमान ३७ अंश सेल्सियस, तर किमान तापमान २५.४ अंश सेल्सियस नोंदविण्यात आले. सोमवारी कमाल तापमान ३७ अंशांवर स्थिर राहण्याची, तर किमान तापमान २५ अंशांपर्यंत किंचित घटण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ३ जूननंतर पुणे आणि परिसरात मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

**कोणत्या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट?**

सोमवारी जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट, ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणारे वारे आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता असल्याने ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नंदुरबार, नाशिक आणि नाशिक घाट विभागालाही याच स्वरूपाच्या हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. अहिल्यानगर, सातारा, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर आणि वाशिम जिल्ह्यांत मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामानासह मेघगर्जना आणि हलक्या पावसाचा अंदाज असल्याने या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

सोमवारी धुळे, नाशिक घाट विभाग, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत गारपिटीसह वादळी पावसाची शक्यता कायम असून या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतही मेघगर्जना व वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# भावगीतांची सम्राज्ञी सुमन कल्याणपूर यांचे निधन

**मुंबई, ३१ मे**

मधुर आणि सुश्राव्य आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आणि भावगीतांची सम्राज्ञी सुमन कल्याणपूर यांचे रविवारी निधन झाले. वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी अन्त्यसंस्कार होणार आहे.



कल्याणपूर यांनी मराठी, हिंदीसह अनेक भाषांमध्ये अजरामर गाणी गायली. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारने २०२३ साली त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित केले . सुमन कल्याणपूर यांचा जन्म २८ जानेवारी १९३७ रोजी बांगलादेशातील भवानीपूर येथे झाला होता. लहानपणापासूनच त्यांना संगीताची प्रचंड आवड होती. सुमनजींचे माहेरचे आडनाव हेमाडी असे होते. त्यामुळे लग्नापूर्वी त्या सिनेसृष्टीत सुमन हेमाडी या नावानेच गाणी गात असत आणि याच नावाने त्यांची सुरुवातीची गाणी लोकप्रिय झाली. एका जाहीर कार्यक्रमात गझलसम्राट तलत महमूद यांनी सुमनताईंचा आवाज ऐकला. त्या आवाजाने प्रभावित होऊन त्यांनी स्वतःच्या एका आगामी चित्रपटासाठी सुमनताईंना गाण्याची विचारणा केली. सुमनताईंनीही या सुवर्णसंधीला होकार दिला आणि तिथूनच त्यांचा चित्रपटसृष्टीतील यशस्वी प्रवास सुरू झाला. तर मराठी भावगीत गायनाची त्यांची सुरुवात ग. दि. माडगुळकर यांच्या अजरामर गीतांनी झाली. *(वृत्तसंस्था)*

# देशातील १६६ जलाशयांत २४ टक्केच पाणीसाठा



**अवघ्या महिनाभरात २१.४११ अब्ज घनमीटरने घसरण**



**नवी दिल्ली, ३१ मे**

बहुतांश राज्यात तापमानाने उच्चांक गाठला असताना, देशातील जलाशयांमध्ये पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत असल्याचे समोर आले. मे महिन्यांतच देशातील १६६ जलाशयातील साठ्यात २१.४११ अब्ज घनमीटरने घसरण होऊन त्यात केवळ २४.७५ टक्के पाणी शिल्लक आहे. तर १५ धरणांतील साठा सामान्यापेक्षा अर्ध्यावर आला आहे.

केंद्रीय जल आयोगाने रविवारी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, देशातील १६६ प्रमुख जलाशयांमध्ये मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत एकूण साठा कमी होऊन ४५.४१९ अब्ज घनमीटर (बिलियन क्यूबिक मीटर) झाला आहे, जो त्यांच्या एकूण क्षमतेच्या केवळ २४.७५ टक्के आहे. मे महिन्याच्या सुरुवातीच्या आठवड्यात या जलाशयांमध्ये ६६.८३० अब्ज घनमीटर पाणी होते, जे एकूण क्षमतेच्या ३६.४१ टक्के होते. याचा अर्थ असा की, एका महिन्यातच उष्णता आणि मोठ्या वापरामुळे देशातील मुख्य जलस्रोतांतून सुमारे २१.४११ अब्ज घनमीटर पाणी कमी झाले. मोसमी पाऊस लांबणीवर गेल्यास देशात पाण्याचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आयोगाने व्यक्त केली आहे. *(वृत्तसंस्था)*

### अनेक जलाशये कोरडे

**देशाच्या काही भागांमध्ये परिस्थिती इतकी भीषण आहे की, तेथील मोठी धरणे पूर्णपणे कोरडी झाली आहेत. महाराष्ट्रातील भीमा उज्जैनी धरण आणि बिहारमधील चंदन धरण ही जलाशये मे महिन्याच्या सुरुवातीलाच पूर्णपणे कोरडी झाली.**

### जलविद्युत प्रकल्पांवर परिणाम

**जलसाठ्याच्या मोठ्या घसरणीचा थेट परिणाम देशाच्या वीज उत्पादनावरही होऊ शकतो. देशातील आठ जलविद्युत प्रकल्पांशी संबंधित तलावांत मे महिन्याच्या सुरुवातीला पाण्याची पातळी सामान्यापेक्षा कमी होती, तर आता ६ मोठ्या तलावांत अतिशय कमी साठा उपलब्ध आहे. मे महिन्यात पारा वाढल्याने तलावांमधील पाण्याची पातळी वेगाने खाली आली. देशातील ११२ धरणांमध्ये पाण्याची पातळी सामान्यापेक्षा कमी आहे.**

### कर्नाटक, आंध्रमध्ये पाणीबाणी

**पाण्याच्या टंचाईचे सर्वात भीषण चित्र दक्षिण भारतातील राज्यांमध्ये पाहायला मिळत आहे, जिथे पाण्याची पातळी किमान स्तरावर आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला यामध्ये एकूण क्षमतेच्या २६.८३% पाणी शिल्लक होते, जे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्याच्या अहवालात घसरून केवळ १७.५५% राहिले आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशसारख्या राज्यांमध्ये पाण्याची टंचाई सर्वाधिक आहे.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पाकिस्तानातील पाणीटंचाई

हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना निसर्गाने भरभरून दिले आहे. दोन्ही देशांतील कोट्यवधी नागरिकांचा दाता आणि रक्षणकर्ता हाच हिमालय आहे. कडाक्याच्या थंडीपासून तर हिमालय नागरिकांचे रक्षण करतोच; शिवाय पिण्यासाठी पाणी आणि पिकांसाठी पाटामध्ये खळखळून वाहणाऱ्या जलधारेची सोयही हिमालयातील हजारो हिमशिखरे करीत आली आहेत. जगातील सर्वांत प्राचीन आणि समृद्ध अशी सिंधू संस्कृतीही याच हिमालयाच्या कुशीत फळली, फुलली. मनुष्याचा एक विचित्र स्वभाव आहे. काहीही मोफत मिळाले तर त्याची किंमत राहत नाही. पाण्याचेही तसेच. आजही आपण पाण्याच्या वापराबाबत गंभीर नाही. निसर्गाने मानवाला दिलेली पाणी ही सर्वांत मौल्यवान देणगी आहे. पाणी आपल्या जीवनमरणाशी निगडित आहे. पाणी नसेल किंवा त्याचा तुटवडा निर्माण झाल्यास हाहाकार उडतो. भारतीय हवामान खात्याने यावर्षी जो अंदाज व्यक्त केला, तो चिंता वाढविणारा आहे. सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असून, जून आणि जुलैमध्ये कमी पाऊस होणार असल्याचे म्हटले आहे. मृग आठवडाभरावर असताना हवामान खात्याच्या नव्या अंदाजाने सरकारची चिंता वाढविली आहे. भारताची अर्थव्यवस्था आजही शेतीवरच अवलंबून आहे. सर्वांत जास्त रोजगार निर्मितीचे साधन अजूनही शेतीच आहे. पाऊस पुरेसा आला नाही तर शेती पिकणार नाही, धान्योत्पादनात घट होऊन महागाई वाढू शकते. त्यामुळे पाण्याचे महत्त्व ओळखून भारताने योग्य पावले उचलली पाहिजेत; शिवाय पाकिस्तानातील सध्याच्या परिस्थितीचा धडाही घेतला पाहिजे. कारण वातावरणात होणारे बदल मानवाच्या चिंता वाढवत आहेत. या समस्या काही एका विशिष्ट देशासाठी भेडसावणाऱ्या नसून त्यांनी वैश्विक रूप धारण केले आहे.

भारताचा शेजारी देश असलेल्या पाकिस्तानात सध्या भीषण पाणी समस्या निर्माण झाली आहे. आर्थिक राजधानी असलेल्या कराची शहरात सध्या नागरिकांना पिण्याचे पाणी मिळण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. या महानगरातील ७० टक्के जनता पाण्यासाठी व्याकुळ झाली आहे. ही परिस्थिती का ओढवली? १९४७ मध्ये पाकिस्तानची निर्मिती करण्यात आल्यानंतर जी सरकारे सत्तेवर आली, त्यांनी पायाभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्याची फळे आज पाकिस्तानला भोगावी लागत आहेत. १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू जल करार झाला. १९५० मध्ये पाकिस्तानात भीषण जलसंकट निर्माण झाले होते. या संकटाला भारतच जबाबदार असल्याचा कांगावा करीत पाकिस्तानने १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघात तक्रार केली. नद्यांच्या प्रवाहात अडथळे निर्माण करीत असल्याने गावागावांमध्ये जलसंकट निर्माण झाल्याचे तक्रारीत म्हटले. युनोच्या शिफारशीनंतर जागतिक बँकेने कराराचा मसुदा तयार करून दोन्ही देशांना सादर केला. त्यानंतर प्रदीर्घ चर्चा आणि संवादानंतर सप्टेंबर १९६० मध्ये सिंधू जल करारावर दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली. करारानुसार पंजाबमधून वाहणाऱ्या रावी, सतलज आणि बियास या नद्यांवर भारताला तर काश्मीरमधून वाहणाऱ्या सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांवरील पाण्यावर पाकिस्तानला हक्क प्रदान करण्यात आला. नुकसान सहन करूनही भारत या कराराशी बांधील राहिला. एवढेच नव्हे तर १९६५ मध्ये दोन्ही देशांत युद्ध होऊनही भारताने पाणी अडविले नाही. प्रवाह न अडविता वीजनिर्मिती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा अधिकार भारताला मिळाला; पण त्यातही पाकिस्तानने सातत्याने अडथळे आणले. एवढेच नव्हे तर धरणातील गाळ काढण्यासही पाकिस्तान आक्षेप घेत असे. गेल्या ६० वर्षांमध्ये भारताच्या बाजूने असलेल्या धरणांमध्ये एवढा गाळ साचला होता, की पाणी साठवणूक क्षमता कमालीची कमी झाली होती. एवढेच नव्हे तर गैरभाजपा सरकारांनी पाकिस्तानच्या दबावापुढे नांगी टाकत गाळ बाहेर काढण्यासाठी तयार केलेली द्वारे सिमेंट काँक्रिटने बंद केली होती. आपल्या जनतेची काळजी घेणे ही प्रत्येक सरकारची जबाबदारी असते. शेजारी देशांसोबतचे संबंध कायमस्वरूपी मित्रत्वाचे अथवा शत्रुत्वाचे असतात, असे नाही. पाकिस्तान सिंधू जल करार करून बिनधास्त होता.

२०२४ मधील पहेलगाम दहशतवादी घटना झाल्यानंतर भारताने सिंधू जल करारच तात्पुरता स्थगित केला. भारत अशाप्रकारचे पाऊल उचलेल याची कल्पना पाकिस्तानने केली नसावी. त्याचे परिणाम आता पाकिस्तानच्या सर्वसामान्य जनतेला भोगावे लागत आहेत. कराचीसह पाकिस्तानातील पाणी समस्येला तेथील सरकार पूर्णपणे जबाबदार आहे. पावसाळ्यात पंजाब आणि सिंध प्रांतात पूर आला किंवा दुष्काळ पडला तर त्याचे खापर भारतावर फोडण्याचे कामच पाकिस्तान सरकार गेल्या ६० वर्षांत करीत आले आहे. भारतातून येणारे प्रचंड पाणी रोखण्याची अथवा साठवणूक करण्याची कोणतीही सोय करण्यात आली नाही. वास्तविक पाहता हिमालय आणि भारतातील नद्यांमधून वाहत येणारे पाणी साठविण्यासाठी धरणे, तलाव आणि नदी जोड कालवे बांधण्याची गरज होती. पण, केवळ भारताचा विरोध करण्यात धन्यता मानत पाणी साठविण्याच्या कोणत्याही पायाभूत सुविधा पाकिस्तानात निर्माण करण्यात आल्या नाहीत. त्याचेच परिणाम आता पाकिस्तानातील जनता भोगत आहे. गव्हाचे पीठ, पेट्रोल-डिझेलसाठी रांगा लावणाऱ्या गरीब, असहाय पाकिस्तान्यांना आता कॅन घेऊन पाण्यासाठीही रांगा लावाव्या लागत आहेत. आदर्श मानकानुसार कोणत्याही देशाकडे १२० दिवसांचा जलसाठा उपलब्ध असणे गरज असताना संपूर्ण पाकिस्तानात फक्त ३० दिवस पुरेल एवढाच जलसाठा शिल्लक आहे. कारण, गेल्या ७० वर्षांत पाकिस्तानात मोठी धरणेच बांधली नाहीत. आजही सिंचनासाठी बहुतांश कालव्यांची जी व्यवस्था आहे, ती १९४७ पूर्वीची असल्याने पाणी गळतीचे प्रमाण मोठे आहे. पाकिस्तानात आज मंगला आणि तारबेला ही दोनच मोठी धरणे आहेत. या धरणांमधील पाण्याची पातळी खालावली आहे. सर्वांत भीषण स्थिती जवळपास दोन कोटी लोकसंख्या असलेल्या कराची शहराची आहे. कराचीला दररोज १०८० दशलक्ष गॅलन पाण्याची गरज असताना केवळ ४०० दशलक्ष गॅलन उपलब्ध होत आहे. पाणीच मिळत नसल्याने अनेक कुटुंबे तात्पुरते स्थलांतर करीत आहेत किंवा शहर कायमचे सोडून इतरत्र जात आहेत. गरिबांची स्थिती फारच दयनीय आहे. पाणी माफिया सक्रिय झाले असून, ते अव्वाच्या सव्वा दराने पाणी विकत आहेत. तसेही अर्ध्यापेक्षा जास्त कराची शहर माफिया, गुंडांच्या आधिपत्याखाली आहे. उपलब्ध जलवाहिन्या फोडून पाणी फुकटात वापरण्याची रीत पाकिस्तानमध्ये सर्वत्र आहे. सोबतीला सडलेली आणि भ्रष्ट प्रशासन व्यवस्था आहे. भारताने ज्या वेगाने धरणे, कालवे आणि नदी जोड प्रकल्पांना प्रत्यक्षात उतरविले, तसे पाकिस्तानच्या कोणत्याही प्रांतात घडले नाही. त्यामुळे मनसेरा असो की कराची आणि गुजरानवाला असो की ग्वादार, पाकिस्तानातील अनेक शहरे पिण्याच्या पाण्यासाठी तडफडत आहेत. आता सामान्य जनता रस्त्यावर उतरत असल्याने शाहबाज शरीफ सरकारवर दबाव वाढत आहे. धरणांनी तळ गाठला, कालवे कोरडे पडले असून, नद्या आटल्या आहेत. सिंधू करार स्थगित झाल्यानंतर परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. भारताने आपल्या हक्काचे पाणी अडविणे सुरू केले. याचा फटका पाकिस्तानच्या पंजाब आणि सिंध प्रांताला बसत आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी व्यवस्थाच न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जलसाठे निर्माण केले असते आणि जलव्यवस्थापनाला महत्त्व दिले असते तर आज कराचीत हाहाकार उडाला नसता. हिमशिखरांचे वेगाने वितळणे, पर्यावरणातील बदल, नद्यांच्या पात्रात झालेली घट, सरकारची अनास्था, भारतावर विसंबून राहणे, वाढती लोकसंख्या, नियोजनशून्य कारभार, धरणे आणि तलावांचा अभाव आदी कारणांमुळेही पाकिस्तानात जलसंकट निर्माण झाले आहे. सरकारने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत तर तेथे पाण्यासाठी यादवी माजण्याची शक्यता आहे. भारतात अजूनही परिस्थिती तितकी बिकट नाही हे आपले भाग्य. एक मात्र कायम लक्षात ठेवावे लागेल आणि ते असे की पाणी व्यवस्थापन हे वेळेवरचे काम नसते. ते सतत करत राहावे लागते.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# नव्या जगाची, नवी मांडणी!

युद्धात उडालेला धुराळा की दारूगोळा खाली आला की मित्र आणि शत्रू यांचे चेहरे जरा स्पष्ट होऊ लागतात. प्रत्येक युद्धानंतर शत्रू आणि मित्र बदलत असतात. मित्र शत्रू झालेले असतात तर शत्रू मित्र झालेले दिसतात. मग, नव्या मैत्रीच्या आणाभाका घेतल्या जातात. नव्या जगाची नव्याने मांडणी सुरू होते. जुनी समीकरणे मोडीत निघतात, नवी समीकरणे साकारली जातात. अमेरिका-इराण युद्धात तात्पुरती का होईना युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय रंगमंचावर नेमका हा खेळ सुरू झाला आहे.

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीत अमेरिकेचे विद्यमान परराष्ट्र मंत्री आणि भावी राष्ट्रपती म्हणून ओळखले जाणारे मार्को रुबियो यांनी भारत-अमेरिका मैत्रीची संकल्पना मांडली तर रशियन राष्ट्रपतींनी बीजिंगमध्ये जाऊन, चीनशी आपल्या संबंधांना नवी धार देण्याचा प्रयत्न केला. भारत दौऱ्यावर असताना, मार्को रुबियो यांनी लाख मोलाचा एक मुद्दा मांडला. जगातील सर्वांत जुनी लोकशाही असलेला देश आणि जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेला देश म्हणजे अमेरिका व भारत यांनी एकत्र आले पाहिजे. अमेरिका हे वारंवार बोलत असली तरी प्रत्यक्षात मात्र तसे करताना दिसत नाही. चीनचा वाढता धोका लक्षात घेऊन, भारत-अमेरिका मैत्रीची संकल्पना मांडणाऱ्या पत्रकारालाच ट्रम्प प्रशासनाने अटक केली होती. आता जगातील अमेरिकाविरोधी , लोकशाहीविरोधी शक्ती एकत्र येत असताना, अमेरिका एकटी पडत असल्याचे चित्र तयार झाले आहे. त्या पृष्ठभूमीवर रुबियो यांच्या या विधानाचा अर्थ लावला पाहिजे.

**नवी युती :** एक मावळलेली महासत्ता रशिया आणि एक उगवती महासत्ता चीन यांच्यात मागील १५ वर्षांपासून एक घट्ट युती तयार होत आहे. अमेरिकेने याची दखल घेत भारतासोबत तेवढीच घट्ट युती तयार करण्याचे प्रयत्न करावयास हवे होते. बराक ओबामा, ज्यो बायडेन यांच्या कार्यकाळात तसे काही प्रयत्न झालेही. पण, डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्रपती झाल्यापासून त्यांनी सतत व सातत्याने भारतविरोधी भूमिका घेतली. केवळ भारतच नाही तर आपल्या मित्रदेशांनाही अमेरिकेने दुखावले.

**दोन करार :** दुसऱ्या महायुद्धानंतर नव्या जगाची आखणी करताना दोन करार झाले होते. वॉर्सा करार आणि वॉशिंग्टन करार. अल्बानिया, बल्गेरिया, चेकोस्लाव्हिकिया, रुमानिया, हंगेरी, पोलंड व पूर्व जर्मनी यांनी वॉर्सा करारावर सह्या करून सोवियत युनियन गोटात दाखल होण्याचा निर्णय केला होता तर वॉशिंग्टन करारावर सह्या करणारे नाटो देश अमेरिकेचे मित्र देश मानले गेले. अमेरिकेच्या प्रत्येक राष्ट्रपतीने नाटो देशांशी असलेली मैत्री सांभाळली. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बायडेन यांनी नाटोचा विस्तार करीत नाटो सदस्यसंख्या ३२ केली. आणि आज एकही नाटो देश अमेरिकेसोबत नाही. इराणची नाकेबंदी करण्यासाठी नाटो देशांनी समोर यावे, पुढाकार घ्यावा असे आवाहन राष्ट्रपती ट्रम्प यांनी वारंवार करूनही नाटो देश अमेरिका-इराण युद्धात सामील झाले नाहीत. एक काळ होता या देशांचे नेतृत्व अमेरिकेकडे होते. पण ट्रम्प यांनी नाटो देशांच्या नेत्यांना अपमानित करून त्यांना दुखावले. असे करून त्यांनी एकप्रकारे चीन-रशियाला बळकट केले आहे.

**कॅनडाही दुरावला :** कॅनडा हा पृथ्वीतलावरील दुसरा मोठा देश. अमेरिका आणि कॅनडा यांचे संबंध फार जवळचे होते. राष्ट्रपती ट्रम्प यांनी वारंवार धमक्या देत कॅनडाला दूर लोटले. टेरिफ नावाचे शस्त्र त्याच्याविरोधातही उगारले.

**तीन शक्ती :** जगाच्या राजकारणात आज तीन शक्ती एकत्र आल्या आहेत. चीन, रशिया व काही इस्लामिक देश. इस्लामिक देशांचे नेतृत्व वा मध्यस्थी पाकिस्तान करीत आहे. इराण प्रकरणात पाकिस्तानचे चांगलेच फावले. आज बहुतेक मुस्लिम देश इराणच्या बाजूने म्हणजेच चीन-रशियाच्या बाजूने झाले आहेत. आणि या तीन शक्तींची युती जगातील लोकशाही व भारत यांच्यासाठी चांगली मानली जात नाही.

**घातक निर्णय :** राष्ट्रपती ट्रम्प एकापाठोपाठ एक घातक असे निर्णय अमेरिकेसाठी आहेत. अमेरिका व नाटोने युक्रेनला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रपती बायडेन यांनी युक्रेनला सांकेतिक पाठिंबा म्हणून युद्ध सुरू असताना आपल्या पत्नीस युक्रेनला पाठविले होते. अमेरिकेने आपली अद्ययावत शस्त्रास्त्रे युक्रेनला दिली होती. कोट्यवधी डॉलर दिले. नाटो देशांनी युक्रेनला पाठिंबा दिला. शस्त्रे दिली. मात्र ट्रम्प यांनी युक्रेनला वाऱ्यावर सोडून दिले. आज युक्रेन युद्धात तग धरून आहे तो केवळ नाटो देशांच्या पाठिंब्यामुळे. नाटोने अमेरिकेचे ऐकले असते तर रशियाने केव्हाच युक्रेनचा घास गिळला असता व तो युरोपच्या प्रवेशद्वारावर धडकला असता. हे टाळण्यात आले ते नाटो देशांनी युक्रेनला दिलेल्या पाठिंब्यामुळे. अमेरिका हा नाटोचा सेनापती. पण सेनापतीनेच युद्धातून पलायन केले. पण सैनिकांनी म्हणजे नाटो देशांनी युक्रेनचा किल्ला लढता ठेवला आणि याचा परिणाम म्हणजे रशियाची दमछाक होत राहिली.

**आत्मघातकी निर्णय :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी घेतलेला आणखी एक आत्मघातकी निर्णय म्हणजे सौदी अरेबिया, कतार, कुवेत, बहरीन व संयुक्त अरब अमिरात यांना लाखो कोटी रुपयांची शस्त्रे विकण्याची त्यांची भूमिका. एका इराणला नि:शस्त्र करण्यासाठी पाच मुस्लिम देशांना शस्त्रसज्ज करण्याचा ट्रम्प यांचा निर्णय योग्य मानला जाणार नाही. एकेकाळी जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन, अब्राहम लिंकन, रुझवेल्ट, जॉन केनेडी यांच्यासारखे महान राष्ट्रपती देणारी अमेरिका आज एवढी कंगाल झाली आहे की तिच्या नशिबी ट्रम्प नावाचे राष्ट्रपती आले आहेत.

**चीनचा उदय :** नव्या जगाच्या एका गटाचे नेतृत्व चीनकडे आले आहे. रशियाने जणू माघार घेत चीनला आपला नेता मानले आहे. आता इराण, उत्तर कोरिया यांच्यासारखे देश या गटात सामील होतील. दुसरीकडे युरोपातील देशांना नेताच नाही. त्यांच्या नेत्याने म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या समर्थक राष्ट्रांना दूर ढकलले आहे. पण, काही देश असे आहेत की त्यांना कोणत्याच गटात सामील व्हायचे नाही. यात भारतही आहे. भारत सोवियत युनियन वा अमेरिका यापैकी कोणत्या गटात कधी सामील झाला नाही. भारताचे रशियाचे फार जवळचे संबंध राहिले हे खरे असले तरी अमेरिकेसोबत भारताने तणाव निर्माण होऊ दिला नाही.

**संकट आणि संधी :** चिनी भाषेत संकट आणि संधी यांच्यासाठी एकच आद्याक्षर वापरले जाते. भारतासाठी सध्याची स्थिती नेमकी अशी झाली आहे. भारतासमोर संकट आहे आणि संधीही. संकट हे की चीन बळकट होत आहे आणि पाकिस्तान चीनच्या फार जवळ जात आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये याचे परिणाम प्रकर्षाने दिसले. दुसरे संकट म्हणजे अमेरिकेशी भारताचे संबंध काहीसे तणावाचे झाले आहेत. या साऱ्यावर मात करून भारताला आपली स्थिती बळकट करावयाची आहे. मात्र ही स्थिती भारतासाठी एक संधीही आहे. इराणसह काही मुस्लिम देशांशी भारताचे फार चांगले संबंध आहेत. स्व. सुषमा स्वराज परराष्ट्र मंत्री असताना त्यांनी एक चमत्कार घडविला होता. मुस्लिम देशांनी पाकिस्तानचा आक्षेप फेटाळून लावत स्वराज यांना मुस्लिम देशांच्या बैठकीसाठी आमंत्रित केले होते.


**तिसरे जग :** जग पूर्वी अमेरिका व सोवियत युनियन असे विभागलेले होते. येणाऱ्या काळात ते अमेरिका व चीन असे विभागले जाणार आहे. सध्याची स्थिती भारतासाठी एक चांगली संधी आहे. तिसऱ्या जगाचे नेतृत्व स्वत:कडे घेण्याची. पं. नेहरू यांनी हेच केले होते. भारत अलिप्त राष्ट्र चळवळीचा नेता होता. आज काही देशांसाठी भारत एक मोठी बाजारपेठ आहे. पण, भारताने केवळ 'आंतरराष्ट्रीय बाजारपेठ' न होता तिसऱ्या जगाची राजधानी व्हावे.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# भरपूर आंबे खा कोया जपून ठेवा!

प्रत्येक ऋतूत एक गोडवा असतो. पण उन्हाळ्यातील आमरसाची मजाच काही वेगळी असते. म्हणूनच उन्हाळा म्हणजे आंबा खाण्याचा आनंद देणारा ऋतू असतो. याच कारणाने अनेक जण उन्हाळ्याची आतुरतेने प्रतीक्षा करतात. वर्तमानात महाराष्ट्रातील प्रत्येक जण उन्हाळ्याचा विशेषत: सूर्य प्रकोपाचा सामना करीत आमरसाचाही गोडवा चाखत आहे. पण हा आनंद मिळत असला तरी वाढत असलेला सूर्याचा प्रकोप पाहता पुढे काय होणार, अशीच चिंता सर्वांचा रक्तदाब वाढवीत आहे. याच गंभीर संकटावर कायमस्वरूपी तोडगा काढायचा झाल्यास राजाश्रयाचा विचार न करता प्रत्येकाने लोकाश्रय देत आमराई उभारण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने भरपूर आंबे खा, पण कोया मात्र जपून ठेवत त्याचीच पावसाळ्यात लागवड करून आमराई उभारा. अशाच स्वरूपाची नामी संधी आपल्याला मिळणार आहे. अकोला शहरात मे २०२३ मध्ये तेथील मनपा आयुक्त कविता द्विवेदी यांनी भरपूर आंबे खा पण कोया जमा करा, असे नागरिकांना आवाहन केले होते. त्यानुसार सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त कोयांना गोळा करीत अकोला शहरातील खुल्या जागेवर त्यांची लागवड करण्यात आली होती. आता तसाच प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याची गरज आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटी आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३ लाख ७ हजार ७१३ चौरस किलोमीटर आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रफळात आपण राहत असलो तरी वृक्षांची घटती संख्या पाहता महाराष्ट्रातील वातावरण सातत्याने तापत आहे. या स्थितीत समजा ७ कोटी लोकांनीही मनावर घेत प्रत्येकी ५ कोया या उन्हाळ्यात जमा करून त्यांची पावसाळ्यात लागवड केल्यास सुमारे



३५ कोटी आंब्याची झाडे आपण लावू शकतो. कुठलाही गाजावाजा न करता प्रत्येकाने हे कार्य स्वत:साठी करायला हवे. मिळेल त्या जागेवर आंब्याची झाडे लावल्याने फार मोठे पुण्य आपल्या पदरात पडेल.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असा आपण अभिमानाने उल्लेख करतो. समजा ३५ कोटी आंब्याच्या कोया लावण्याचा प्रयोग यशस्वी ठरल्यास संत भूमीसह महाराष्ट्र आमराईचे राज्य असाही अभिमानाने उल्लेख करावा लागेल. जंगलातील प्राणी अन्न मिळत नसल्याने गावांकडे धाव घेतात. कारण काय तर वन विभागाने फळांऐवजी भलत्याच झाडांची लागवड केली आहे. त्याच चुकीचा फटका वन्यप्राण्यांसह माणसालाही बसला आहे. पण जेव्हा संपूर्ण राज्यात खुल्या जागेवर आंब्याची झाडे लागतील, तेव्हा त्यापासून सर्वांनाच लाभ होईल. गाईंना खायला आंब्याची पाने मिळतील. शिवाय माणसांना आंबा मिळेल. भूगर्भातील जलस्तर उंचावून ऑक्सिजनची मात्राही वाढेल. वाटसरूंना सावली मिळेल. म्हणजेच काय तर आंब्याची लागवड लाभदायकच ठरेल. विशेष म्हणजे घरोघरी आंबे एकसारखे आणले जात नाहीत. प्रत्येक जण आपापल्या परीने विविध जातींचे आंबे विकत आणून आमरसाचा आनंद घेत असतो. आता विविध जातींच्या आंब्यांची लागवड झाल्याने कोकणातील हापूसची मजा नागपुरातील व्यक्तीला नि:शुल्क घेता येईल. यातूनच आपल्या आंब्याच्या पारंपरिक जातींनाही लोकाश्रय मिळून त्यांचेही जतन आपोआप होईल. नागपूर जिल्ह्यातील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता विलास मोटघरे यांनी पुढाकार घेत सुमारे २५ हेक्टर परिसरात ७७५८ झाडे लावून उभारलेली आमराई ही महानिर्मितीसाठी अभिमानास्पद प्रयोग ठरली आहे. रामटेक तालुक्यातील खिंडसी आणि मनसर रामधाम येथे पर्यटकमहर्षी चंद्रपाल चौकसे यांनी सुमारे १० हजार वृक्षांचे रोपण करीत स्वबळावर त्याचे यशस्वी संवर्धनही करून दाखविले आहे. मग आपणही आंबे खायचे आणि कोया जपून त्यांच्या लागवडीचा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात केल्यास चमत्कार नक्कीच घडू शकतो. शेवटी, 'तुम्हीच वापरा तुमची शक्ती, तुम्हीच घ्या लाभ पुरा, हाच जलस्वराज्यचा मंत्र खरा' या फॉर्म्युलानुसार आमराईच्या प्रयोगाला लोकाश्रय मिळाल्यास त्याचे दूरगामी लाभ सर्वांनाच मिळतील. फळांचा राजा आंबा उत्कृष्ट चवीसोबत आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. यात व्हिटॅमिन ए, सी आणि फायबर भरपूर असते. आंबा रोगप्रतिकारशक्ती वाढवतो. पचनक्रिया सुधारते आणि त्वचा निरोगी राहते. डोळ्यांना व्हिटॅमिन ए लाभदायक असल्याने दृष्टी सुधारते. आंबा कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तदाब कमी करण्यास मदत करतो. यामुळे हृदय निरोगी राहते. एकंदरीत पाहता प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील कडू आठवणी विसरून आंबा जसा चोखून खाता, तसाच प्रत्येक क्षणाचा गोडवा चाखावा, तेच सर्वांसाठी फलदायी ठरेल.

९८८१७१७८५९


## कानोसा

अमोल पुसदकर

# हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा

'आज पुन्हा जाहले सचेतन, युगायुगाचे हे सिंहासन,' असे एका गीतात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाबद्दल म्हटलेले आहे.देवगिरीचे साम्राज्य १३१९ पर्यंत पूर्णतः बुडाले होते. त्यानंतर जवळपास ३०० वर्षांपेक्षा अधिकचा काळ गेला होता. महाराष्ट्रामध्येच काय, संपूर्ण देशामध्ये हिंदू राजे कुठेही स्वाभिमानाने आपला ध्वज फडकवीत राज्य करू शकत नव्हते. पिढ्या मागून पिढ्या गुलामगिरीत जन्म घेत होत्या आणि गुलामगिरीत मरत होत्या. एवढ्या मोठ्या काळ्या रात्रीनंतर १६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने एक नररत्न जन्माला आले, ज्याने प्रजेला बादशाहीच्या जाचातून सोडविले. आपले स्वराज्य उभे केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे काही फक्त मराठ्यांचे स्वराज्य नव्हते, हे काही महाराष्ट्रापुरते मर्यादित स्वराज्य नव्हते, तर हे संपूर्ण भारतात राहणाऱ्या हिंदू समाजाचे स्वराज्य होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. हिंदुत्वाचा विचार घेऊन एक संघटना १९२५ साली सुरू झाली व पाहता पाहता शंभर वर्षांचा इतका मोठा कालखंड तिने एकाच विचाराने भारून पूर्ण केला. संघ जेव्हा सुरू झाला, त्यावेळेस लोक म्हणायचे की, 'काय डॉक्टर साहेब, या आठवी-नववीच्या मुलांना घेऊन तुम्ही हिंदू राष्ट्र बनविणार आहात का?' म्हणजे तो उपेक्षेचा कालखंड होता. संघाने ही उपेक्षा सहन केली. संघाचे कार्य जसे वाढू लागले, तसे शासनकर्त्यांचे सिंहासन डोलू लागले. त्यांना असे वाटू लागले की संघ सत्तेच्या स्पर्धेमध्ये उतरेल आणि त्यामुळे त्यांनी संघाला समाप्त करण्याचे प्रयत्न केले. हा विरोधाचा कालखंड होता. आणि त्यानंतर हिंदू विचार असलेले सरकार या देशामध्ये आल्यानंतर संघाकरिता शासनाच्या दृष्टिकोनातून अनुकूलतेचा काळ सुरू झाला. संघाने उपेक्षा, विरोध आणि अनुकूलता या तिन्ही कालखंडांचा सामना जरी केलेला असला, तरीही संघ स्थापनेच्या वेळेस, ज्यावेळेस पूजनीय डॉक्टरांनी स्वयंसेवकांना विचारले की, 'संघाने गुरू कोणाला मानायला पाहिजे?', त्यावेळेला स्वयंसेवकांनी उत्तर दिले की, 'डॉक्टर साहेब, आपण संघाची स्थापना केलेली आहे, त्यामुळे आपणच गुरू व्हायला पाहिजे.' परंतु त्यावेळेस पूजनीय डॉ. हेडगेवार त्यांना म्हणाले की, 'अरे, आपले काम तर हिंदू समाजाच्या संघटनेचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य तर शेकडो वर्षांचे आहे. समाजाला मार्गदर्शन करणारे, प्रेरणा देणारे असे एखादे प्रतीक आपण गुरुस्थानी ठेवले पाहिजे.' आणि त्यानंतर संघामध्ये व्यक्तीऐवजी त्यागाचे प्रतीक असलेल्या भगव्या ध्वजाला गुरुस्थानी ठेवण्यात आले.



परंतु डॉ. हेडगेवार त्यावेळेस स्वयंसेवकांना म्हणाले होते की, 'भगव्या ध्वजानंतर कुठल्या एका व्यक्तीला जर तुम्हाला आदर्श स्थानी ठेवायचे असेल, तर तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना ठेवले पाहिजे.' इतका आदर, पूजनीय डॉ. हेडगेवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल होता. गुलामगिरीच्या जोखडात कित्येक शतके खितपत पडलेल्या हिंदू समाजामध्ये पौरुषत्व जागवून, महाभयंकर बादशाह्यांना उलथवून, त्यांना कायमची मूठमाती देण्याचे काम याच हिंदवी स्वराज्याच्या बीजातून झालेले होते.

नागपूरच्या भूमीमध्ये उगवलेले संघाचे रोपटे पाहता पाहता विशाल वटवृक्षामध्ये रूपांतरित झाले. त्याच्या शाखा देश-विदेशात पसरल्या. आणि जसे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे सर्वसामान्य भारतामध्ये पसरलेल्या हिंदू समाजाकरिता एक दीपस्तंभ होते, त्याचप्रमाणे संघ आणि संघाचे कार्य भारतातच नव्हे, तर जगभरात पसरलेल्या हिंदू समाजाचे एक आशेचे केंद्र झाले. संघामध्ये सुद्धा ज्यांनी डॉ. हेडगेवार यांना पाहिले नाही, ज्यांनी श्रीगुरुजींना पाहिले नाही, ज्यांनी बाळासाहेब देवरसांना पाहिले नाही, असेही लोक संघाचे तेवढ्याच निष्ठेने कार्य करीत आहेत. संघाचे कार्य व्यक्तिकेंद्रित राहिले नाही. एका मागून एक सरसंघचालक होत गेले. सरसंघचालक कोण आहे, हे बघून कोणीही संघाच्या शाखेत जात नाही, तर तो संघाचा विचार, त्याचे कार्य हे बघूनच संघामध्ये प्रवेश करत असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील सगळ्यात मोठी घटना म्हणजे त्यांचा राज्याभिषेक. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक स्वीकारला नाही, तर महाराष्ट्रामध्ये उभे राहणारे मराठी सिंहासन हे हिंदवी सिंहासन आहे, हे ते ओळखत होते.

याचे महत्त्व ओळखून संघाने सुद्धा आपल्या सहा उत्सवांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिवसाला 'शिवराज्याभिषेक दिन' असे न म्हणता 'हिंदू साम्राज्य दिवस' असे म्हटलेले आहे. एखादी संस्था, संघटना एखादे कार्य करीत असताना एखादी गोष्ट खूपच लाखमोलाची होऊन जाते. संघाचे कार्य हे अखिल भारतीय आहे, आंतरराष्ट्रीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही त्यावेळेस एक अखिल भारतीय घटना होती. ही गोष्ट संघाने ओळखली आणि म्हणूनच संघाच्या सर्व प्रांतामध्ये विविध भाषा बोलणारे लोक हा उत्सव साजरा करतात. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, कार्य, हा इतिहास तर सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचतोच; परंतु त्यांच्या मनात सुद्धा, छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे राजे होते, त्यांच्या जीवनापासून आणि कर्तृत्वापासून प्रेरणा ग्रहण केली पाहिजे व वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी आम्ही संघटित झालो पाहिजे, हा बोध स्वयंसेवकांना आणि समाजाला सुद्धा मिळतो. संघाचे चतुर्थ सरसंघचालक पूजनीय रज्जूभय्या म्हणायचे की, 'आम्ही रावणाचा काळ बघितला आहे, आम्ही अकबराचा काळ बघितलेला आहे, आम्ही औरंगजेबाचा काळ बघितलेला आहे आणि तो काळ आम्ही बदलविलेला सुद्धा आहे. आताही समाजासमोर उभ्या असलेल्या समस्या आम्ही समाप्त करू आणि एका वैभवशाली भारताचे निर्माण करू.' हिंदू साम्राज्य दिवस हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे, त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाचे, त्यांनी सर्वसामान्य माणसांमध्ये निर्माण केलेल्या देशभक्तीचे, आत्मविश्वासाचे एक उदाहरण आहे. आजच्याही काळामध्ये समाजासमोर, राष्ट्रासमोर अनेक समस्या आहेत, कदाचित उद्याही असतील; तरीही सुद्धा आम्ही आपल्या बुद्धी, शक्ती, पराक्रमाने त्यावर मात करू आणि परमवैभवशाली भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध होऊ, हाच संदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या दिनानिमित्त सर्वांनी ग्रहण केला पाहिजे.

९५५२५३५८१३
(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### एसटीचा आज वर्धापन दिन

एक जून १९४८ रोजी राज्यात पहिली एसटीची बस धावली, म्हणून दरवर्षी १ जून एसटीचा वर्धापन दिन साजरा केला जातो. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता अनेक अडचणी, आर्थिक संकटांचा सामना करीत डोंगर रांगा पार करीत दुर्गम भागापर्यंत एसटी आपली सेवा देत आहे. साधी बस, लालपरी ते इलेक्ट्रिक एसी बस अशा विविध रूपात सध्या एसटी प्रवाशांच्या सेवेसाठी धावत आहे. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग, शालेय विद्यार्थी अशा अनेक समाज घटकांना एसटीने ते ३० टक्क्यांपासून शंभर टक्क्यांपर्यंत तिकिटामध्ये सवलती दिल्या आहेत. प्रवाशांनी सुद्धा 'वाट पाहीन पण एसटीने जाईन' या वाक्यावर हक्क दाखवून एसटीला आपलेसे केले आहे.

बाजारात खाजगी प्रवासी वाहतुकीची स्पर्धा असतानाही खेडोपाडी प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीच हक्काची बनली आहे. एसटीचा चालक- वाहक सुद्धा ऊन, पावसाची तमा न बाळगता विश्वास सार्थ ठरवत प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देत आहेत. तिकीट सवलतींचा फायदा, चांगल्या सुविधा दिल्याने आर्थिक लाभापोटी एसटीच फायदेशीर असल्याने प्रवाशांची संख्या लक्षणीय दिसून येते. परिवर्तन बस नावाने प्रवासी वाहतूक सुरू करून आधुनिक धाटणीच्या बस लालपरी, शिवाई, शिवनेरी अशा नामांतर घडवून आणलेल्या बसमुळे प्रवाशांना सुखद प्रवास घडू लागला. एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या अनंत अडचणी शासन दरबारी पडून असताना अनेक कर्मचारी एसटीच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटत आहेत. त्यास प्रवाशांचीही साथ लाभत आहे. उत्तरोत्तर एसटी प्रशासन, चालक, वाहक, प्रवाशांच्या सेवेसाठी झटत राहो, याच एसटीला वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

●● ●●

### ज्येष्ठ नागरिकांनी स्वत्व जपावे

ज्येष्ठ नागरिकांना परिवारात आणि समाजात मानसन्मानाने वागवले जात नाही अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. पूर्वी संयुक्त कुटुंब होते त्यावेळी ज्येष्ठ व्यक्ती कुटुंब प्रमुख या नात्याने कुटुंबाच्या सुख-दुःखात सहभागी होत असत. कलह झाला तरी त्यावर उपाययोजना करीत असे. त्यांचा शब्द हा अंतिम मानला जात असे. स्वाभाविकच ज्येष्ठांचा मानसन्मान राखला जात असे. कालांतराने परिस्थिती बदलली. कुटुंबे विभक्त होत गेलेत. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना आपले स्थान आता शोधावे लागत आहे. परिवाराची परिभाषा आता संकुचित झाली आहे. पती, पत्नी, असल्यास एखाद दुसरे मूल. आजी-आजोबा, आई-वडील केवळ आवश्यकतेनुसार वापरावयाच्या वस्तू झाल्या आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये. अर्थात यालाही अपवाद आहेत. ज्या परिवारात आजही ज्येष्ठांना मानसन्मानाने वागवले जात आहे त्या आदर्श परिवाराचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून अनुकरण करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यात ज्येष्ठ व्यक्तींची प्रमुख भूमिका राहणार आहे. त्यालाच आपण स्वत्व जपणे म्हणतो.

मी आता वृद्ध झालो आहे, वय झाले आहे. त्यामुळे माझ्या मर्जीनुसार कनिष्ठांनी वागले पाहिजे हा अट्टहास सोडून द्यावा लागेल. आपली दिनदर्शिका बदलावी लागेल, सवयी बदलता आल्या तर फारच चांगले. परिवारात पोषक वातावरण निर्माण करावयाचे असेल तर माझी मर्जी म्हणून चालणार नाही. यावर उपाय म्हणजे स्वतःमध्ये बदल करणे, तडजोड करण्याची तयारी ठेवणे, वयानुसार प्राप्त झालेल्या अनुभवाचा फायदा आपल्या कुटुंबाला आणि समाजाला करून दिला तर आयुष्य अधिक सुखकर होईल, कुटुंबात शांतता राहील. जीवन जगणे असह्य होणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

●● ●●

### लग्न म्हणजे पोट भरण्याचे साधन नव्हे

छत्तीसगडमध्ये न्यायालयाने लग्न करून पैशासाठी छळ करणे, त्यापेक्षा बायको नांदवण्याची ताकद नसेल तर लग्न करू नका, अशी समज दिली आहे. लग्न म्हणजे दोन जीवाचे मिलन. दोन कुटुंबांत नातेसंबंध निर्माण करणे. आता लग्न म्हणजे पोट भरण्याचे साधन झाले आहे. बेरोजगार मुले थोडासा व्यंग असलेल्या मुलीबरोबर लग्न करून आयुष्यभर मुलीच्या बापाच्या पैशावर आयुष्य जगतात. पूर्वी घरजावई म्हणजे कमीपणाचे लक्षण होते. स्त्रियांनी नोकरी करणे म्हणजे पुरुषांच्या मनगटात ताकद नसणे असे समजले जायचे. आता स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. तरी सुद्धा व्यवसाय, इतर कामांसाठी माहेरून पैसे आणायला त्यांच्यामागे तगादा असतो. तिचा छळही होतो. जीव जातो. समानतेचे युग आहे. लग्नापूर्वी मुलं-मुली भेटतात. त्यावेळी काही गोष्टी स्पष्ट बोलाव्या. लग्न म्हणजे पवित्र बंधन. त्यावर पैशाचे सावट नको. पत्नी म्हणून नांदवण्याची ताकद असेल तरच लग्न करा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# १ जूनपासून वादळी पावसाचा अंदाज

**शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये**

**१० जूनपर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. दरम्यान, शेतकरी बांधवांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये. विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

# सुंदरच्या अर्धशतकाने गुजरात ८ बाद १५५

## सुदर्शन, गिल, बटलर अपयशी ● रसिख सलाम, भुवनेश्वर, हेझलवूडचा प्रभावी मारा

**अहमदाबाद, ३१ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्धच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना यजमान गुजरात टायटन्सने २० षटकांत ८ बाद १५५ धावा उभारल्या आणि बंगळुरूसमोर विजयासाठी १५६ धावांचे लक्ष्य ठेवले. वॉशिंग्टन सुंदरने तेवढी नाबाद ५० धावांची खेळी केली, परंतु इतर फलंदाज बंगळुरूच्या प्रभावी गोलंदाजीविरुद्ध दबावाखाली खेळले. गुजरातला १५५ धावांवर रोखताना बंगळुरूकडून रसिख सलामने २७ धावांत ३ बळी, तर भुवनेश्वर कुमार व जोश हेझलवूडने प्रत्येकी २ बळी, कृणाल पांड्याने १ बळी टिपला.



वॉशिंग्टन सुंदर नाबाद ५०

बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित बंगळुरूच्या वेगवान गोलंदाजांनी गुजरात टायटन्सच्या फलंदाजावर वर्चस्व गाजविले.

डावाच्या प्रारंभीच जोश हेझलवूडने कर्णधार शुभमन गिलला (१०), तर भुवनेश्वर कुमारने साई सुदर्शनला (१२) लवकरच तंबूत परत पाठवून गुजरातच्या फलंदाजीतील हवाच काढून घेतली. गिल पाटीदारकडून, तर सुदर्शन शर्माकडून झेलबाद झाला. गुजरातने ३.४ षटकांत २६ धावांत हे दोन भरवशाचे फलंदाज गमावले. त्यानंतर निशांत सिंधू (२०) व जो बटलरने (१९) संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु रसिख सलामने सिंधूला, तर कृणाल पांड्याने बटलरला बाद केले. तोपर्यंत गुजरातने १२.१ षटकांत ४ बाद ७३ धावांपर्यंत मजल मारली होती.



फटकेबाजी करताना शुभमन गिल

वॉशिंग्टन सुंदरने अर्शद खानच्या साथीने संघाला शंभर धावांचा उंबरठ्यावर आणले असतानाच, जोश हेझलवूडने अर्शद खानला (१५) बाद केले. गुजरातने १४.१ षटकांत ९९ धावांत आपला निम्मा संघ गमावला.

पुढे वॉशिंग्टन सुंदर व राहुल तेवतिया संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत असतानाच रसिख सलामने तेवतियाच्या (७) रुपाने आपला दुसरा बळी मिळविला. त्यानंतर भुवनेश्वर कुमारने जेसन होल्डरच्या (७) रुपाने आपला दुसरा बळी मिळविला, त्यामुळे गुजरातची १८.३ षटकांत ७ बाद १४२ धावा अशी स्थिती झाली होती. रसिख सलामने रशीद खानच्या (७) रुपात तिसरा बळी घेतला. वॉशिंग्टन सुंदर व कॅगिसो रबाडाने (३) नाबाद खेळी करत गुजरात टायटन्सला २० षटकांत ८ बाद १५५ धावांचा टप्पा गाठून दिला. वशिंग्टन सुंदरने ३७ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने नाबाद ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. *(वृत्तसंस्था)*



रसिख सलामचे ३ बळी

# सोळा वर्षाखालील मुलांची सोलापूर जिल्हा संघ निवड चाचणी १० जूनपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

जिल्हा सोळा वर्षाखालील मुलांचा संघ निवडण्यासाठी निवड चाचणी इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे बुधवार १० जून व गुरुवार दिनांक ११ जून रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत निवड चाचणी घेण्यात येणार आहे. ज्या खेळाडूंनी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडे रजिस्ट्रेशन केलेले आहे, अशाच खेळाडूंना निवड चाचणीसाठी उतरण्यास परवानगी मिळेल. इच्छुकांनी निवड चाचणी फी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्यालयात कोड वर जमा करावी.

१ सप्टेंबर २०११ ते ३१ ऑगस्ट २०१३ दरम्यान जन्मतारीख असलेल्या खेळाडूंना निवड चाचणीसाठी उतरता येईल. ज्या खेळाडूंनी अद्यापपर्यंत स्वतःचे रजिस्ट्रेशन केलेले नाही त्यांनी ९ जून २०२६ पर्यंत स्वतःचे रजिस्ट्रेशन करून घ्यावे. जे खेळाडू सकाळी ९ ते ११ पर्यंत रिपोर्टिंग करतील त्यांनाच निवड चाचणीस उतरता येईल याची नोंद घ्यावी. यानंतर आलेल्या खेळाडूस निवड चाचणीस उतरता येणार नाही. खेळाडूंच्या पालकांनी व कोच ने चाचणी दरम्यान व्यत्यय आणू नये, निवड समिती सदस्यांना बाधा येईल असे कृत्य करू नये खेळाडूंनी पांढऱ्या गणवेशात यावे.

पाऊस पडल्यास तारखेत बदल करण्यात येईल, असे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे.

## महत्वाचे...



# मुख्य तिकीट निरीक्षक संजय कांबळे यांचा रेल्वे सेवेतून निवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. ३१ मे-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विभागीय मुख्य तिकीट निरीक्षक (डीसीटीआय) संजय कांबळे हे ३१ मे २०२६ रोजी तब्बल ३२ वर्षांहून अधिक कालावधीच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेनंतर रेल्वे सेवेतून निवृत्त झाले. संजय कांबळे यांनी १९९४ मध्ये मुंबई विभागात भारतीय रेल्वे सेवेत रुजू झाले. मुंबई, ठाणे आणि पुणे येथे विविध पदांवर काम केल्यानंतर १९९६ मध्ये त्यांची सोलापूर विभागात बदली झाली. २००३ पर्यंत त्यांनी ओपन लाईन तिकीट तपासणी पथकात कार्य केले. त्यानंतर त्यांची मध्य रेल्वेच्या प्रतिष्ठित फ्लाइंग स्कॉड (सीसीएम स्कॉड) मध्ये नियुक्ती करण्यात आली. या पथकात त्यांनी सुमारे १५ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली. फ्लाइंग स्कॉडमधील कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुन्हा सोलापूर विभागात परत येऊन सीटीआय (चौकशी), सीटीआय (मुख्यालय) आणि अखेरीस डीसीटीआय, सोलापूर या महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी सांभाळली. आपल्या संपूर्ण सेवाकाळात महसूल संरक्षण, तिकीट तपासणीतील शिस्त, प्रवाशांना दर्जेदार सेवा आणि कर्तव्यनिष्ठ कार्यपद्धती यासाठी ते ओळखले जात होते. त्यांच्या प्रामाणिकपणा, शिस्तप्रियता आणि कार्यतत्परतेमुळे त्यांनी रेल्वे प्रशासनात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या निवृत्तीनिमित्त सोलापूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच त्यांच्या निरोगी, आनंदी व समृद्ध निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक जयदीप प्रदक्षिणे, सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक कल्पना बनसोडे आदी अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



# उमाबाई श्राविका विद्यालयात पदभार हस्तांतरण सोहळा संपन्न

**सोलापूर, दि. ३० मे २०२६**

येथील नामांकित श्राविका संकुलातील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे ३० मे रोजी शासनाच्या विहित वयोमर्यादेनुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त प्रशालेत पदभार हस्तांतरण सोहळा झाला.प्राचार्य ेहोळे यांनी आपल्या पदाचा कार्यभार व सूत्रे नवनिर्वाचित प्राचार्या अश्विनी पंडित यांच्याकडे सोपवली. यावेळी नवनियुक्त उपमुख्याध्यापिका माधवी खोत यांनीदेखील आपल्या पदाचा कार्यभार उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित यांच्याकडून स्वीकारला. यावेळी प्रशालेच्या वतीने प्राचार्य मोहोळे व सेवानिवृत्त होत असलेले सेवक कुंभार मामा यांचा सत्कार करण्यातआला. प्राचार्य मोहोळे यांनी ा दीर्घ सेवाकाळातील अनुभवांना उजाळा देत विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच नवनियुक्त प्राचार्या अश्विनी पंडित यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास प्रशालेचे पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण भावनिक व उत्साहपूर्ण होते. उपस्थितांनी प्राचार्य मोहोळे व कुंभार मामा यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुप कस्तुरे, सुहास छंचुरे यांनी परिश्रम घेतले.

# मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट व बिजापूर क्रिकेट क्लब विजयी

## रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. ३१ मे-**

रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत रविवारी मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट अ आणि बिजापूर क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या सामन्यांत शानदार विजय नोंदवले.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मध्य रेल्वे संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १६३ धावांचा मजबूत धावफलक उभारला. यामध्ये अभिषेक पवार याने ३७, प्रवीण देशेट्टी याने २२, सिद्धार्थ नाका याने १९ तर पृथ्वीराज मिसाळ याने नाबाद १७ धावा केल्या. जयहिंद कुर्डूवाडीकडून प्रवीण मोहडी आणि अभी मुले यांनी प्रत्येकी २ बळी, तर विल्सन काळे आणि सचिन सुरवसे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१६४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना जयहिंद कुर्डूवाडीचा डाव अवघ्या १६ षटकांत ५८ धावांवर आटोपला. रणवीर गवळी (११८ धावा) आणि रितेश कॉलने (१५ धावा) यांचा अपवाद वगळता इतर फलंदाज अपयशी ठरले. मध्य रेल्वेकडून आदित्य दडे, सिद्धार्थ नाका आणि पार्थ लोंढे यांनी प्रत्येकी २ बळी, तर वेदांत काळे याने १ बळी घेतला. उत्कृष्ट कामगिरी बद्दल सिद्धार्थ नाका याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. वरिष्ठ खेळाडू वासुदेव दोरणाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राजा पटेल, विक्रांत पवार, अंबादास तोरा उपस्थित होते. या सामन्यात सचिन गायकवाड व नवीन माने यांनी पंच म्हणून तर शुभम मुतुर यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.



दुपारच्या सत्रात बिजापूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. साऊथ सोलापूर आपटे रेड संघाचा डाव १७ षटकांत अवघ्या ९९ धावांवर मर्यादित राहिला. चेतन माडेकर याने २३, श्रेयस दुधगी याने २१ तर नवीन आवर याने १३ धावा केल्या. बिजापूर क्लबच्या अक्षय भांबिरे याने घातक गोलंदाजी करत १५ धावांत ४ बळी घेतले. अक्षय बिरादार, डी. सुमित आणि गिरीश यादव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

प्रत्युत्तरादाखल बिजापूर क्रिकेट क्लबने अवघ्या ९.१ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात १०२ धावा करत विजय मिळवला. आदर्श राठोड याने ३१, शांतेश याने २४ आणि अक्षय भांबिरे याने २३ धावांचे योगदान दिले. साऊथ सोलापूरकडून श्रेयस दुधगी, स्वयंम टोणपे आणि सचिन माने यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. ४ बळी आणि २३ धावा करणाऱ्या अक्षय भांबिरे याला सामनावीर घोषित करण्यात आले.

प्रवीण देशेट्टी, लियाकत शेख यांच्या हस्ते त्याला पुरस्कृत करण्यात आले. सामन्यात चिराग शहा व शुभम मुतुर यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

**उद्याचे सामने:**

**सकाळी :** केपी क्रिकेट अकॅडमी विरुद्ध हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लब.

**दुपारी :** टाइम्स ११ विरुद्ध साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू.




**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ५१/२०२६

१. जहांगीर उस्मान शेख -- अर्जदार
रा. कोरफळे ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील अक्षय काशीद)

विरुद्ध

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी ग्रा. पं. कोरफळे -- गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. कोरफळे ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे कोरफळे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जुन १९७२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९७२ रोजी मौजे कोरफळे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

सही/-
(एफ. आर. शेख)
तहसिलदार बार्शी



**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व बार्शी पैकी शहर वैराग व मे. दुय्यम निबंधक साहेब वैराग यांचे हद्दीतील व नगरपंचायत वैराग यांचे हद्दीतील घरजागा तिचा सि.स.नं.३३९ याचे क्षेत्रफळ २४३.२० चौ. मी., याचा वैराग नरगपंचायत मिळकत नं. ११४ असा असून नगरपंचायत दप्तरी क्षेत्रफळ ५२०० चौ. फूट इतके असून सदर जागेमध्ये दगडम ातीमध्ये बांधलेले ५७६ चौ. फूट इतके असून, ३२०० चौ. फूट जागा दगड, विट, सिमेंटमध्ये बांधलेली आहे, ७८० चौ. फूट ही जागा लोडबेरिंग पध्दतीने बांधलेली आहे व सदर जागेच्या वर दुसरा मजला असून त्याचे क्षेत्रफळ ७८० चौ. फूट आहे व खुली जागा ६४४ चौ. फूट इतकी आहे. याची चतुःसिमाः- पुर्वेस - सिटी सर्व्हे नंबर ३५४ ची जागा, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - सिटी सर्व्हे नं. ३४० व ३४२ च्या जागा, उत्तरेस - सिटी सर्वे नंबर ३३५,३३७ व ३३८ च्या जागा येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक प्लॉट जागा आतील दगड, माती, झाडझुडपे वगैर तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली घर जागा ही नम्रता अमित गांधी यांना बक्षिसपत्राद्वारे मिळालेली मिळकत असून सदरची मिळकत ही त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. विद्यमान मालकांनी सदरची घरजागा त्यांचे प्रांपचिक अडचणीसाठी विक्रीस काढलेली आहे व आमचे अशिलाबरोबर विक्री करणेकामी बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर घरजागा मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा घर मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद घर जागेवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर घरजागेसंदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर घरजागेवर कोणाचा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास काही वाद असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर घरजागा या निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.३१/०५/२०२६

सही/-
**ॲड. श्री. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे**
**२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर, माढा रोड,**
**वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India
1911 से आपके लिए "सेंट्रल" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

**Central Bank of India**
**REGIONAL OFFICE SOLAPUR :** Sai Ved Divine, Near Shivdare Arts and Commerce College, Jule Solapur, Dist.Solapur, (MH) Pin-413004
Phone No.0217-2728133 E-mail : recvsolaro@centralbank.bank.in

**ताबा नोटीस नियम ८ (१) अंतर्गत सरफेसी नियम**

ज्याअर्थी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अक्कलकोट रोड शाखा च्या अधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत आणि कलम १३ (२) आणि १३ (१२) सह वाचनात येणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार श्रीमती सुरैय्या सलीम पटेल (कर्जदार) आणि श्री. समीर सलीम पटेल (जामीनदार) यांना सदर नोटीसमध्ये नमूद केलेली रु. ८,७२,०४५.०७ (अक्षरी रुपये आठ लाख बहात्तर हजार पंचेचाळीस आणि सात पैसे फक्त) (जी रक्कम दिनांक ०१.११.२०२५ पर्यंतचे मुद्दल आणि व्याज दर्शवते) ही थकबाकी, तसेच दिनांक ०२.११.२०२५ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्च, सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्यासाठी दिनांक ०१.११.२०२५ रोजी मागणी नोटीस बजावली होती.

कर्जदार बँकेची संपूर्ण थकबाकी भरण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा आज दिनांक २७ मे २०२६ रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेसोबत केला जाणारा कोणताही व्यवहार सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अक्कलकोट रोड शाखा यांच्या रु. ८,७२,०४५.०७ (अक्षरी रुपये आठ लाख बहात्तर हजार पंचेचाळीस आणि सात पैसे फक्त) (जी रक्कम दिनांक ०१.११.२०२५ पर्यंतचे मुद्दल आणि व्याज दर्शवते) तसेच दिनांक ०२.११.२०२५ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्चाच्या बोजाच्या अधीन राहील.

तारण ठेवलेली मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्ता**

स्थावर मालमत्ता जमीन आणि इमारतीचे संपूर्ण तपशीलवार वर्णन आणि तिच्या चतुः सीमांसह मालकी हक्काच्या दस्तऐवजाचा तपशील:

**मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट नं. ४०६ चे सर्व भाग आणि पार्सल, ज्याचे क्षेत्रफळ ५३.८१ चौ.मी. असून तो बिल्डिंग च्या चौथ्या मजल्यावर ''हेरिटेज कॉन्डोमिनियम'', टाऊन प्लॅनिंग स्कीम नं. ३, फायनल प्लॉट नं. ३७, जुना सर्वे नं. २०३७ ते २०६९ मध्ये स्थित आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३१७४.१३ चौ.मी. आहे. सदर मालमत्ता महानगरपालिका घर नं. ५६३, सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत, दक्षिण सदर बाजार, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा- सोलापूर - ४१३००३ येथे स्थित आहे. मालकी हक्कः श्रीमती सुरैय्या सलीम पटेल (कर्जदार)

**फ्लॅटच्या चतुःसीमा -**
पूर्वः- फ्लॅट नं. -४०५ पश्चिमः- खुली जागा
उत्तरः- फ्लॅट नं. -४०७ दक्षिणः- फ्लॅट नं. -४०३

**दिनांकः- २७.०५.२०२६**
**ठिकाणः- सोलापूर**
शिक्का
**सही/-**
**अधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक**
**सेंट्रल बँक ऑफ इंडिया करिता**



सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India
1911 से आपके लिए "सेंट्रल" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

**Central Bank of India**
**REGIONAL OFFICE SOLAPUR :** Sai Ved Divine, Near Shivdare Arts and Commerce College, Jule Solapur, Dist.Solapur, (MH) Pin-413004
Phone No.0217-2728133 E-mail : recvsolaro@centralbank.bank.in

**ताबा नोटीस नियम ८ (१) अंतर्गत सरफेसी नियम**

ज्याअर्थी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अक्कलकोट रोड शाखा च्या अधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत आणि कलम १३ (२) आणि १३ (१२) सह वाचनात येणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार श्री. विठ्ठल नागनाथ जाधव (कर्जदार) आणि श्रीमती सरुबाई नागनाथ जाधव (सह-कर्जदार) यांना सदर नोटीसमध्ये नमूद केलेली रु. २५,५४,८६७.८५ (अक्षरी रुपये पंचवीस लाख चोपन्न हजार आठशे सदुसष्ठ आणि पंच्याऐंशी पैसे फक्त) (जी रक्कम दिनांक २०.०९.२०२५ पर्यंतचे मुद्दल आणि व्याज दर्शवते) ही थकबाकी, तसेच दिनांक २१.०९.२०२५ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्च, सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्यासाठी दिनांक २०.०९.२०२५ रोजी मागणी नोटीस बजावली होती.

कर्जदार बँकेची संपूर्ण थकबाकी भरण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा आज दिनांक २७ मे २०२६ रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेसोबत केला जाणारा कोणताही व्यवहार सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अक्कलकोट रोड शाखा यांच्या रु. २५,५४,८६७.८५ (अक्षरी रुपये पंचवीस लाख चोपन्न हजार आठशे सदुसष्ठ आणि पंच्याऐंशी पैसे फक्त) (जी रक्कम दिनांक २०.०९.२०२५ पर्यंतचे मुद्दल आणि व्याज दर्शवते) तसेच दिनांक २१.०९.२०२५ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्चाच्या बोजाच्या अधीन राहील.

तारण ठेवलेली मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्ता**

स्थावर मालमत्ता जमीन आणि इमारतीचे संपूर्ण तपशीलवार वर्णन आणि तिच्या चतुः सीमांसह मालकी हक्काच्या दस्तऐवजाचा तपशील:

**मालमत्तेचे वर्णन**

ब्लॉक नं. ६९९ मधील जमीन आणि इमारतीचे सर्व भाग आणि पार्सल, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ११२ चौ.मी. असून त्यापैकी बांधीव क्षेत्र ६५.०५ चौ.मी. आहे, जे ''राजस्व नगर को-ऑप. हौसिंग सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर'' येथे स्थित आहे. ज्याचा जुना सर्वे नं. ३६८, नवीन सर्वे नं. २२/१+२+३+४+५+६/१, १, २२/१+२+३+४+५+६/१, २२/१+२+३+४+५+६/२, २२/१+२+३+४+५+६/२ असा आहे. ऑनलाइन ७/१२ नुसार उत्तर बाजूचे २२/१+२+३+४+५+६/१/१, २२/१+२+३+४+५+६/१, २२/१+२+३+४+५+६/२ आणि राजस्व नगर को-ऑप. हौसिंग सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर, जिल्हा- सोलापूर - ४१३००३ मधील २२/१+२+३+४+५+६/२ क्षेत्र. मालकी हक्कः श्री. विठ्ठल नागनाथ जाधव (कर्जदार)

**ब्लॉक/प्लॉटच्या चतुःसीमा -**
पूर्वः- रस्ता पश्चिमः- मनोरमा नगर
उत्तरः- ब्लॉक नं. -६९८ दक्षिणः- ब्लॉक नं. -७००

**दिनांकः- २७.०५.२०२६**
**ठिकाणः- सोलापूर**
शिक्का
**सही/-**
**अधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक**
**सेंट्रल बँक ऑफ इंडिया करिता**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्वाचे...



## शाहू स्पोर्टस् दक्षिण सोलापूर उन्हाळी खोखो प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सोलापूर, दि. ३१ मे -**

जि प शाळा अंत्रोळी येथे २१ मे पासून सुरू असलेल्या शाहू स्पोर्ट्स दक्षिण सोलापूर यांच्या उन्हाळी खोखो प्रशिक्षण शिबिराचा निरोप समारंभ संपन्न झाला.किशोर व किशोरी गटातील खेळाडूंसाठी खास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन प्रशिक्षक सदानंद गुजले यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. याचा समारोप शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे व दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी शाहू स्पोर्ट्सचे सचिव श्रीरंग बनसोडे, खजिनदार नागनाथ म्हमाने, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत कोकरे, पालक सलीम शेख, शशिकांत कोळी, अंत्रोळी गावचे समस्त पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भरपूर सराव करून खेळामध्ये सातत्य ठेवावे व अंत्रोळी गावातून राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाडूंनी नेत्र दीपक कामगिरी करून आपल्या गावचे नाव लौकिक करावे असे कार्यक्रमाचे श्री. ढेपे म्हणाले. याप्रसंगी राज्यस्तरीय खेळाडू गौरी शिंगण व या उन्हाळी प्रशिक्षण वर्गाचे प्रशिक्षक सदानंद गुजले यांचा सत्कार करण्यात आला.



## पीएम क्रिकेट टीमकडून चंद्रशेखर बोधले यांना श्रद्धांजली

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पीएम क्रिकेट टीमचे जिवलग सदस्य व सर्वांचे लाडके मित्र स्वर्गीय चंद्रशेखर (अविनाश) बोधले यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण क्रिकेट विश्वात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या स्मरणार्थ पीएम क्रिकेट टीमच्या वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व खेळाडू व पदाधिकाऱ्यांनी अविनाश बोधले यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे, मित्रत्वाच्या नात्यामुळे आणि संघासाठी दिलेल्या योगदानामुळे प्रत्येकाच्या मनात त्यांचे विशेष स्थान होते. श्रद्धांजली सभेदरम्यान अनेक खेळाडू भावूक झाल्याचे दिसून आले. त्यांच्या आठवणींनी वातावरण गहिवरून गेले होते. 'मित्र गेला, पण त्याच्या आठवणी कायम आमच्या हृदयात जिवंत राहतील, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या. दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पी.एम. क्रिकेटचे संस्थापक परमेश्वर माळगे, ॲड. विजय कोनापुरे, काशिनाथ औरसंग, अमोग्सिद यादवाड, प्रकाश स्वामी, बालाजी पाटक जयराज मडिवाळ प्रभु बिराजदार लक्ष्मण कावळे, श्रीकात जमादार सुधीर मोरे साईद सय्यद, नितीन काबळे, दिपक भोसले, कौस्तुभ स्वामी, धनराज गायकवाड धर्मराज नाशी, कुमार केगणाळकर, पुडलिक बनसोडे, प्रतिक सोनवणे, वैभव काबळे, राहुल पाटील, सप्निल इंगळे, सिराज शेख, लखन चिवडशेट्टी, श्रीकांत भोसले, सदानंद कोकडे, यश दिडोरे, गणेश जाधव, विवेक इंगळे, ईम्रान शेख, नरेद्र आगलावे, समाधान फडतरे, प्रशांत गुमटे, जयनु शेख, सचिन कुसेकर, सनी किर्तने उपस्थित होते.

## चॅम्पियन चषक १३ वर्षाखालील राज्य निवड स्पर्धा सोलापुरात ५ जूनपासून

**सोलापूर, दि. ३१ मे-**



महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना, सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच व हेरिटेज समुह, चॅम्प चेस स्कूल व नेक्स्ट मुव्ह चॅम्पियन ऑनलाइन चेस अकॅडमीच्या सहकार्याने सोलापुर चेस अकॅडमीने चॅम्पियन चषक १३ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्य निवड चाचणी आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन शुक्रवार ५ ते ७ जुन दरम्यान केले आहे. येथील गांधीनगर नगरमधील हेरिटेज येथील हॉलमध्ये या स्पर्धा रंगणार आहेत. जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त व्हावे व उदयोन्मुख खेळाडूंना चालना मिळावी या हेतुने सोलापुरात १३ वर्षाखालील गटाकरिता आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे. जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार आठ फेऱ्यात स्पर्धा होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी ६० मिनिटे व प्रत्येक चालीला ३० सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. १ जानेवारी २०१३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. यातुन दोन मुले व दोन मुलींची निवड राष्ट्रीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धे साठी करण्यात येईल. या निवड चाचणी स्पर्धेतील विजेत्यांना ३६ हजार रकमेची रोख पारितोषिके व रु. २१ हजाराची आकर्षक चषक व पदके प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेतुन निवड झालेल्या खेळाडूंना राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होणार आहे. जिल्हा निवड झालेल्या खेळाडूंची राहण्याची मोफत सोय अकॅडमीकडून केली जाणार असुन या सहभागी होणाऱ्या जिल्ह्यातील तसेच राज्यभरातील बिगरमानांकित बुद्धिबळ खेळाडूंना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त करण्याची संधी मिळणारआहे. स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी काम पाहणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी सांगितली आहे. इच्छुक खेळाडूंनी माहितीसाठी वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे मो.क्र. ८८८०४५३४४ यांच्याकडे संपर्क साधावा. या स्पर्धेत जिल्ह्यातील १३ वर्षाखालील खेळाडूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते पाटील, हेरिटेज समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज शहा, अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरची १५ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**





राज्यस्तरीय वयोगट डायव्हिंग स्पर्धेत १४ १७ व १९ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात सोलापूरच्या खेळाडूंनी चार सुवर्ण, सहा रौप्य व पाच कांस्य पदक घेऊन सोलापूरला वर्चस्व मिळवून दिले आहे. कोल्हापूरच्या संघाने तीन सुवर्ण, दोन रौप्य व एक कांस्य पदक मिळवून दुसऱ्या स्थानावर तर मुंबई संघाने दोन सुवर्ण, एक रौप्य व तीन कांस्य पदक मिळवून तिसऱ्या क्रमांकावर वाटचाल सुरू आहे.

राज्य जलतरण संघटनेच्या समन्वय समितीच्या वतीने समन्वय समितीचे प्रमुख मनीष भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली अशोक चौक येथील श्री मार्कंडेय जलतरण तलावावर स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक मयूर व्यास, सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी नजीर शेख, सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सुरेश देशमुख, सचिव संतोष कोल्हापुरे, विजय गुल्लापल्ली, अनिल यरगल, किरण कोल्हापूर, प्रशिक्षक मनीष भावसार, शिक्षक श्रीकांत शेटे, रेल्वेचे प्रशिक्षक हरीष अन्नदास, जलतरणचे प्रशिक्षक श्रीकांत दोरनाल उपस्थित होते.

**सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेते याप्रमाणे (कंसात मिळविलेले गुण) : हायबोर्ड : १४ वर्षाखालील मुली :** मनस्वी सावंत (१६५.९५, सोलापूर), कनक शंकु (१५७.९५, सोलापूर), उज्वला सोमा (१३४.१५, सोलापूर). **मुले :** संभाव चेचर (२१४.३५, कोल्हापूर), शौर्य पाटील (१९८.३५, कोल्हापूर), अंश तिलोतिया (१८०.४०,सोलापूर). **१९ वर्षाखालील मुले :** स्वराज लाड ( ३६९.७०, मुंबई), संकेत लिगडे, २९५.८५, सोलापूर), श्रीयश सपकाळ (२८२.६०), मुली : श्रावणी सूर्यवंशी (३०४.४०, सोलापूर), वंशिका चुंगीवाडीयार (१९८.६०), हर्षदा गोली (१९०.५५, सोलापूर).

**तीन मीटर स्प्रिंग बोर्ड : १७ वर्षाखालील मुले :** नील पाटील (२९६.२५,कोल्हापूर), रणवीर खाडे (२४६.४५, सोलापूर), वेदांत चिल्वेरी (२२०.३०, सोलापूर). **मुली :** मनस्वी माने (२५६.६०, सोलापूर), गीतिका सालियन (१९१.९०, मुंबई), निशिता ठाकूर (१७०.२५, मुंबई).

**एक मीटर स्प्रिंग बोर्ड : १४ वर्षाखालील : मुले :** मीत वलन्त्र (२१०.२०, मुंबई), संभाव चेचर (१९६.५०, कोल्हापूर ), शौर्या पाटील (१८०.९०, कोल्हापूर). **मुली :** कनक शंकू (१५८.४०, सोलापूर), मनस्वि माने (१३७.८५), भार्गवी हळुंडे (१३०.३५, मुंबई).

**१७ वर्षाखालील मुले :** हायबोर्ड : नील पाटील (२५४.३०, कोल्हापूर), रणवीर खाडे (२३९.८०, सोलापूर), अथर्व माळी (१६९.३०,

## चॅलेंजर्स व रॉयल्स संघांचे विजय

**सोलापूर, दि. ३१ मे -**


श्लोक


हर्ष

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या आंतर अकॅडमी क्रिकेट स्पर्धेत चॅलेंजर्स आणि रॉयल्स या संघांनी शानदार विजय मिळवले.

मास्टर्स अकॅडमीच्या क्रीडांगणावर सुरू असलेल्या या स्पर्धेत वॉरिअर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २५ षटकांत ९ बाद १४२ धावा केल्या. त्यात जगन्नाथ ढंगापुरे याने ३४ आणि श्रीनाथ कोडम याने २९ धावा केल्या. चॅलेंजर्स संघाकडून अर्णव निंबाळकर याने ३ षटकांत १४ धावा देत २ बळी मिळवले. प्रत्युत्तरादाखल १४३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चॅलेंजर्स संघाने २३.१ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात लक्ष्य पूर्ण केले. चॅलेंजर्सकडून हर्ष वळसंगे याने नाबाद ५६ धावांची उत्कृष्ट खेळी केली, तर विराज वाडकर याने १८ धावा केल्या. वॉरिअर्सकडून आदित्य मिसाळ याने ३ षटकांत १० धावा देत १ बळी मिळवला. चॅलेंजर्स संघाने हा सामना ७ गडी राखून जिंकला. नाबाद अर्धशतक झळकावणाऱ्या हर्ष वळसंगे याला सामनावीर घोषित करण्यात आले. दुसरा सामन्यात टायगर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना १२.५ षटकांत सर्वबाद ८४ धावा केल्या. त्यात मयूर इंगळे याने सर्वाधिक २९ धावा केल्या. रॉयल्स संघाकडून श्लोक मुलगे याने घातक गोलंदाजी करत ३.५ षटकांत अवघ्या ११ धावा देत ५ गडी बाद केले. ८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रॉयल्स संघाची अवस्था बिकट झाली होती, मात्र त्यांनी ९ गडी बाद ८५ धावा करत सामना जिंकला. रॉयल्सकडून मडीअप्पा याने १६ धावा केल्या. टायगर्स संघाकडून दर्शन काळे याने ४ षटकांत १८ धावा देत ३ बळी मिळवले. रॉयल्स संघाने १ गडी राखून हा अटीतटीचा सामना जिंकला. ५ बळी घेणाऱ्या श्लोक मुलगे याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

## कोल्हापूरचा सिकंदर शेख ठरला 'देवाभाऊ केसरी'चा मानकरी

### शिवराज्याभिषेक निमित्त कुस्ती मैदान

### महिला कुस्तीमध्ये कोल्हापूरची सृष्टी भोसले मानकरी

**सोलापूर, दि. ३१ मे -**

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जंगी कुस्ती मैदानातील प्रमुख आणि सर्वात आकर्षणाची ठरलेली 'देवाभाऊ केसरी' ची मुख्य लढत महाराष्ट्र केसरी विजेता पैलवान सिकंदर शेख (कोल्हापूर) विरुद्ध अमृत पंजाब यांच्यात झाली. या लढतीत सिकंदर शेख याने निकाल डावावर अमृत पंजाबला पराभूत करत शानदार विजय मिळवला. महिलांच्या कुस्तीत कोल्हापूरची पैलवान सृष्टी भोसले हिने सांगलीच्या ऋतुजा जाधव हिच्यावर 'एक चाक' डावावर विजय मिळवला.

राजेंद्र चौकातील लाला आखाडा मैदानावर या कुस्ती स्पर्धे चे आयोजक संजय साळुंखे, महेश सरवदे आणि नगरसेवक युवराज सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य कुस्ती सोहळा पार पडला. हे मैदान वडार समाज आणि जोशी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.



या कुस्ती सोहळ्याला सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजप शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर, ग्रामीण पोलीस उपायुक्त विजय कबाडे आदी उपस्थित होते. या कुस्ती मैदानात समालोचक अशोक धोत्रे यांनी उत्तमप्रकारे सामन्यांची माहिती देत धावते समालोचन केले.

### रविराज सरवदे, सौरभ इगवे, यतिराज भोसले यांचीही बाजी

मैदानावरील अन्य कुस्तीमध्ये लाल आखाडा तालमीचा पैलवान रविराज महेश सरवदे याने गंगावेश तालीम कोल्हापूरचा पैलवान भागवत निरगुडे याच्यावर 'दुहेरी पट' काढून विजय मिळवला. केगावचा पैलवान सौरभ मधुकर इगवे याने संदीप पाटील (आर्मी पुणे) याच्यावर 'कलाजंग' डाव करून विजय संपादित केला. सोलापूर लाल आखाडा तालमीचा पैलवान यतिराज भोसले याने शंकर तिठे (जय हनुमान तालीम, वाडी बामणी) याच्यावर मात करत विजय मिळवला.

## न्यू. इंग्लिश स्कूल करकंबच्या दोघांची नेपाळच्या क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३१ मे-**



न्यू.इंग्लिश स्कूल करकंबच्या (ता.पंढरपूर) चैतन्य संतोष बुगड व ओम अंकुश साळुंखे यांन गोवा येथे झालेल्या राज्य गोवा कप क्रिकेट स्पर्धेत १६ वर्षांखाली गटात उत्कृष्ट कामगिरी केली. या कामगिरीवर त्यांची काठमांडू (नेपाळ) येथे होणाऱ्या नॅशनल डोमेस्टिक क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली.

चैतन्य यास एम.बी.ए.क्रिकेट क्लबचे महादेव भिसे, वडील संतोष व आई वैशाली बुगड यांनी मार्गदर्शन केले.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल दोघांचा करकंब न्यू. इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष संजय कुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते, क्रीडा शिक्षक अशोक खपाले, शिक्षक भिसे, अधिकारी काटे, व्यापारी बापू विधाते, बाळासाहेब विधाते, डॉ.आलेकर, स्टेट बँकेचे निवृत्त अधिकारी विजय भागवत यांच्या उस्थितीत सत्कार झाला.

## क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके यांचा आज सन्मान

**सोलापूर, दि. ३१ मे -**



हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे ज्येष्ठ क्रीडाशिक्षक गंगाराम महादेव घोडके हे २७ वर्षांच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. या सेवापूर्तीनिमित्त सोमवार १ जून रोजी सकाळी ११ वाजता सेवानिवृत्ती सन्मान सोहळा होईल.

होटगी रोडवरील आसरा चौकातील किल्लेदार मंगल कार्यालय येथे हा सोहळा श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यावेळी मजरेवाडी शिक्षण संकुल मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, अक्कलकोट अध्यक्ष महेश इंगळे, म.न.पा. जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनचे अध्यक्ष सिध्देश्वर पाटील, सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल असोसिएशन अध्यक्ष, नगरसेवक व सी.ए. विनोद भोसले, महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन सचिवमा. डॉ. प्रदिप तळवेलकर (गुरुजी), श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सन्मान सोहळ्यास क्रीडाप्रेमी, आजी-माजी विद्यार्थी उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघ जिल्हाध्यक्ष प्रा. संतोष खेडे व शहराध्यक्ष सुहास छंचुरे यांनी केले आहे.

## धाराशिव, मुंबई उपनगरला विजेतेपद

### राज्य निमंत्रित महिला खोखो व कबड्डी स्पर्धा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राज्य निमंत्रित महिलांच्या खो खो स्पर्धेत धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ व कबड्डीमध्ये स्वराज्य स्पोर्ट्स क्लब मुंबई उपनगरने विजेतेपद पटकाविले. नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा सोलापूर जिल्हा कबड्डी व खो-खो असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित केली होती.

खो-खोच्या अंतिम सामन्यात अश्विनी शिंदे (३. ३०, १. ०० मि. नाबाद व २ गुण) व संध्या सुरवसे (१.००, ३. ०० मि. व ३ गुण ) यांच्या अष्टपैलू खेळामुळे धाराशिवने ठाण्याच्या ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनवर १३-९ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळवला. ठाण्याच्या दिव्या गायकवाड (१.४० मि. व ३ गुण ) हिने एकाकी लढत दिली.

कबड्डीच्या अंतिम सामन्यात याशिका पुजारी, प्रतिक्षा तांडेल व सानिया इंगळे यांच्या अष्टपैलू खेळीमुळे मुंबई उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने बारामती अकॅडमीस २९-१९ असे हरविले. बाराम तीच्या सुंदरी गुप्ता हीची लढत अपुरी पडली. माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते प्रथम तीन संघास ५१,३१, १५ हजार रुपये पारितोषिक व अहिल्याबाई होळकर स्मृती करंडक देण्यात आले. यावेळी डॉक्टर सूर्यकांत कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, स्पर्धेचे निरीक्षक संदीप तावडे, जयंत मोरे, खोखो असोसिएशनचे पदाधिकारी उमाकांत गायकवाड, श्रीरंग बनसोडे, शरद व्हनकडे, अजित शिंदे, कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी मदन गायकवाड, एल. एस. गायकवाड, मरगु जाधव, संजय मोतेकर, लक्ष्मण बेल्हाळे व संतोष जाधव, हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर, उपाध्यक्ष अक्षय वाकसे, उपाध्यक्ष नागेश खरात, सचिव शंकर नरोटे, सहसचिव समर्थ मोटे, खजिनदार प्रवीण खरात, ट्रस्टी, जयदीप जानकर, शिवाजी वाघमोडे, सिद्धबाबा निशाणदार, दिग्विजय देवकते, प्रभात हक्के, अतुल माशाळ, योगेश तरंगे आदी उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिक विजेते खेळाडू**

**खोखो :** अष्टपैलू : अश्विनी शिंदे (धाराशिव), आक्रमक : वैष्णवी फुटक (रत्नागिरी), संरक्षक : दिव्या गायकवाड (ठाणे) **कबड्डी :** अष्टपैलू : याशिका पुजारी ( मुंबई उपनगर), चढाईपटू : सुंदरी गुप्ता (बारामती), बचावपटू : प्रीती जाधव (सांगली).

**स्पर्धेतील प्रथम तीन संघ**

**खोखो:** छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ (धाराशिव), ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशन (ठाणे), आर्यन स्पोर्ट्स क्लब (रत्नागिरी). **कबड्डी :** स्वराज्य स्पोर्ट्स क्लब (मुंबई उपनगर), बारामती अकॅडमी (बारामती), आनंदवन महिला संघ (परभणी).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बार्शीतील व्यापाऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ मे-**

मार्केट यार्डातील भागीदारीच्या वादातून व्यापारी विकास गुळमिरे यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपी संजय लक्ष्मण केवळे यांची बार्शी अतिरिक्त सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी हा निकाल दिला.

फिर्यादी वैशाली गुळमिरे यांनी बार्शी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, मृत विकास गुळमिरे व आरोपी संजय केवळे हे कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी येथील गाळा क्रमांक २ मध्ये भागीदारीत भुसार मालाचा व्यवसाय करीत होते. व्यवसायातील आर्थिक व्यवहार, हिशोबातील मतभेद, गाळा सोडण्याचा तगादा तसेच सततचा मानसिक त्रास यामुळे विकास गुळमिरे यांनी १६ डिसेंबर २०२४ रोजी गाताचीवाडी शिवारातील दगड खाणीत उडी मारुन आत्महत्या केल्याचा आरोप केला होता.

तपासादरम्यान, आत्महत्येपूर्वी मृत व्यक्तीने व्यापारी मित्रांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर संदेश पाठवून आरोपीस आपल्या मृत्यूस जबाबदार धरल्याचा मजकूर समोर आला होता. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. प्रकरणाच्या सुनावणीवेळी साक्षीदारांचे जबाब, पुरावे, तपासातील कागदपत्रे तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद न्यायालयासमोर मांडण्यात आला. बचाव पक्षातर्फे सादर युक्तिवादात पुराव्यांची साखळी, घटनाक्रमातील विसंगती तसेच आत्महत्येस थेट प्रवृत्त केल्याचे ठोस पुरावे नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांचा विचार करुन न्यायालयाने आरोपीविरुद्धचा आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नसल्याचे नमूद केले. त्यानुसार आरोपी संजय लक्ष्मण केवळे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

न्यायालयाने तपासादरम्यान जप्त मोबाईल हँडसेट मालकी हक्क पडताळून मूळ मालकास परत करण्याचे निर्देशही दिले. प्रकरणात आरोपीतर्फे अॅड. महेश जगताप, अॅड. राहुल कसबे व अॅड. केदार पाटील यांनी युक्तिवाद केला. तर सरकार पक्षातर्फे अॅड. डी. डी. देशमुख यांनी काम पाहिले.



## ह.भ.प.साळुंखे पाटील यांच्या स्मृतीला ना. आठवले यांच्याकडून अभिवादन

**सांगोला, दि.३१ मे -**

केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शनिवार दि.३० मे रोजी जवळा (ता.सांगोला) येथील शारदाई आध्यात्मिक नगरी येथे मा.आ.काकासाहेब साळुंखे पाटील आणि ह.भ.प. शारदादेवी साळुंखे पाटील यांच्या स्मृतीला अभिवादन केले. यावेळी माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासह रिपाइं प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, तालुकाध्यक्ष खंडू सातपुते आदीसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ना. रामदास आठवले यांनी संपूर्ण स्मृतीस्थळाची पाहणी करताना मा. आ.काकासाहेब साळुंखे पाटील यांनी सांगोला तालुक्यासाठी दिलेले योगदान जाणून घेतले.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना आज दुपारी मिळणार मूळ गुणपत्रक

**सोलापूर दि.३१ मे-**




महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १० वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल ८ मे रोजी जाहीर झाला होता. निकालानंतर सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकृत मूळ गुणपत्रका आणि उत्तीर्ण प्रमाणपत्राची प्रतीक्षा होती. अखेर सोमवार, दिनांक १ जून रोजी दुपारी ३.०० वाजता सर्व शाळांमध्ये एकाच वेळी विद्यार्थ्यांना गुणपत्रकांचे वाटप करणार असल्याची माहिती राज्य शिक्षण मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिली.मंडळाच्या अधिकृत कार्यपद्धतीनुसार, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना सोमवार, १ जून रोजी सकाळी ११.०० वाजता गुणपत्रक, प्रमाणपत्र आणि तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख सुपूर्द केले जातील. त्यानंतर मुख्याध्यापकांच्या नियोजनाखाली त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता सर्व शाळांमार्फत विद्यार्थ्यांना हे गुणपत्रक थेट हाती दिले जाईल. पुढील अकरावी प्रवेश आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ही मूळ कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यामुळे संबंधित सर्व मुख्याध्यापक, विद्यार्थी आणि पालकांनी या वेळेची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि विहित वेळेत शाळेत उपस्थित राहून आपली गुणपत्रके प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन विभागीय मंडळाने केले आहे. याबाबत सर्व माध्यमिक शाळांना आधीच सूचित करण्यात आले आहे. शाळा स्तरावर गुणपत्रिका वाटपाची तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहितीही राज्य शिक्षण मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिली आहे.

## निधन वृत्त...

### पांडुरंग हरिदास



**पंढरपूर,दि.३१ मे -**

येथील पांडुरंग उर्फ शाम प्रभाकर हरिदास (वय ७९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. पन्नास वर्षे त्यांनी वृत्तपत्र विक्रीचे काम केले होते. जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते मुकुंद हरिदास यांचे ते थोरले बंधू होत.

# वय वाढतंय, मुलींच्या डोक्यात अपेक्षा भरवू नका

## भारत वाघमारे; चर्मकार समाज विकास मंडळाचा मेळावा

### ४५० वधू-वरांची नोंदणी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर : अनेक समाजात मुलींचे प्रमाण कमी असतानाही मुलींचे विवाह थांबले आहेत. त्यांचे वय वाढत आहे. याला पालकांच्या अपेक्षांचं ओझं जबाबदार आहे. यापुढे तिच्या डोक्यात अपेक्षा भरवू नका, तडजोडीचा मार्ग अवलंबून पुढचे आयुष्य सुखी करा, अशी अपेक्षा रायगडचे उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी व्यक्त केली.

चर्मकार समाज विकास मंडळाच्या वतीने आयोजित वधू-वर परिचय संमेलनात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. मेळाव्यास राज्य वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, शुभांगी माने, पूर्वा वाघमारे, पाटबंधारे निवृत्त कार्यकारी संचालक हरीदास टाणपे, नायब तहसीलदार बालाजी बनसोडे, पाकणी आश्रम शाळेचे संचालक दत्तात्रय शिंदे, प्रमुख निमंत्रक राजशेखर जेऊरकर, मल्हारी बनसोडे, निवृत्त पोलीस निरीक्षक विठ्ठल अंगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

संत रोहिदास, संत हरळय्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन उदघाटन झाले. मेळाव्यात ४५० वधू-वरांची नोंदणी झाली. अतिथींच्या मनोगतानंतर इच्छुक वधू-वर, पालक यांनी अपेक्षा व्यक्त केल्या. प्रास्ताविकातून राजशेखर जेऊरकर यांनी संमेलन आयोजनामागील हेतू सांगितला.

**रोहिदासांचे विचार घरा-घरापर्यंत पोहोचवा : गायकवाड**

प्रमुख अतिथी माधव गायकवाड यांनी १३ व्या शतकात संत रोहिदासांनी सर्वप्रथम सती प्रथेला विरोध केल्याचे सांगत स्त्रियांना सन्मान दिला, त्यांचे विचार घराघरापर्यंत पोहोचवा अशी अपेक्षा व्यक्त केली. चर्मकार समाजाची दशा आणि दिशा विषयावर ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले नसते तर आज समाजाची दशा वाईट असती. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. ते मुलांना पाजा. शासकीय सेवेत असताना आपण समाजासाठी किती उपयोगी येतोय विचार करा, महिन्यातील एक रविवार समाजकार्यासाठी द्या, असे आवाहन केले.

अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी संत रोहिदासांच्या विचारावर चाला, बाबासाहेबांनी दिलेल्या अधिकाराचा वापर करा असे सांगितले.भारत वाघमारे यांनी आरक्षणाच्या मुद्यावर बोलताना अ, ब, क, ड वर्गीकरणाला आक्षेप नोंदवण्यास सांगितले.

संमेलनासाठी परशुराम शिंदे, रेवणसिद्ध व्हनमराठे, वामन धुळराव, शिवपूत्र हरवाळकर, अंबादास वाघमारे, दत्तात्रय हरवाळकर, शावरप्पा वाघमारे, प्रा. आंबादास चाबुकस्वार, राजेंद्र व्हनकोरे, शिवकुमार तोळणुरे, महादेव कांबळे, संगीता शिंदे, पौर्णिमा धुळराव, सुनिता वनस्कर, सुजाता हरवाळकर, रुपाली बनसोडे, ज्योती बनसोडे, ज्योती कांबळे, यल्लप्पा व्हनहुवे, यांच्यासह चर्मकार समाज विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यासंह अनेक कार्यकर्त्यांनी दिवसभर परिश्रम घेतले.

## काटेवाडी येथे शेतातील वहिवाटीवरून महिलेस दोघांकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

शेतातील वहीवाट व बांधाच्या कारणावरून एका महिलेला लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील काटेवाडी येथे शनिवारी रात्री नऊ वाजता घडली.

सुमन सावकार साळुंखे (वय ४५ वर्ष , राहणार काटेवाडी) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव असून शनिवारी रात्री नऊ वाजता काटेवाडी येथील शेतात त्यांना सुभाष आनंद साळुंखे व महादेव साळुंखे यांनी मिळून मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना कामती येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात शेजारी गोविंद गोरे यांनी आज रविवारी पहाटे दाखल केले.

# बार्शी बाजार समितीचे सहसचिव मिरगणेंचा निवृत्तीनिमित्त सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मे-**

कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी येथे सहसचिव म्हणून गेली २७ वर्षे निष्कलंक व उल्लेखनीय सेवा बजावलेले श्री. बी. एल. मिरगणे सेवानिवृत्त झाले. यानिमित्त बाजार समितीच्या सभागृहात सर्व कर्मचाऱ्यांच्यावतीने त्यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

श्री.बी.एल. मिरगणे यांनी बाजार समितीमध्ये सेवेस सुरुवात केल्यानंतर आपल्या २७ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी प्रशासकीय कामात पारदर्शकता, शेतकरी व व्यापाऱ्यांच्या प्रश्नांची तड लावण्याची तत्परता व कर्मचाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यामुळे सर्वांची मने जिंकली. बाजार समितीच्या आधुनिकीकरणात त्यांचे मोलाचे योगदान राहिले.

सभापती विजय गरड यांनी मिरगणे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, मिरगणे यांनी २७ वर्षे निष्ठेने, एकाही डागाशिवाय सेवा देणे सोपे नाही. नव्या पिढीतील अधिकाऱ्यांनी त्यांचा 'कामाशी प्रामाणिकपणा' हा गुण आवर्जून अंगीकारावा. आज ते सेवानिवृत्त होत असले तरी त्यांची कार्यपद्धती हा बाजार समितीसाठी एक 'मार्गदर्शक आराखडा' म्हणून कायम राहील. आम्ही सर्वजण त्यांच्या पुढील निरोगी व आनंदी आयुष्यासाठी मनापासून शुभेच्छा देतो..


सत्काराला उत्तर देताना मिरगणे म्हणाले, 'आजचा हा क्षण माझ्यासाठी आनंदाचा, अभिमानाचा पण तितकाच भावनिकही आहे. बाजार समिती ही संस्था नसून शेतकऱ्यांच्या घामाची माय आहे, या भावनेतून मी काम केले. कधी चुकलो असेल तर मोठ्या मनाने माफ करा. पण एक गोष्ट अभिमानाने सांगतो, कधीही शेतकऱ्याच्या हिताशी तडजोड केली नाही.आज मी खुर्ची सोडून जातोय, पण मनाने कायम इथेच असेन. नवीन पिढीला एकच सांगेन पद महत्वाचे नाही, त्यातून लोकांची सेवा करता येते हे महत्वाचे. शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचे समाधान हाच आपला खरा सन्मानचिन्ह आहे. तुम्ही सर्वांनी जो मायेचा सत्कार केला, त्यासाठी मी व माझे कुटुंबीय कायम ऋणी राहू. सेवानिवृत्तीनंतरही बाजार समितीच्या कोणत्याही कामासाठी मी हक्काने हजर राहीन. हे नाते निवृत्तीने संपणारे नाही. पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून आभार...

यावेळी संचालक रामेश्वर पाटील, सचिव तुकाराम जगदाळे, राजाभाऊ खंबाळे, प्रवीण मांजरे, नवनाथ गिराम, श्रीशैल्य घाणेगावकर, सचिन माने, आशिष काळे, जगन्नाथ गाढवे, हिरा जाधव, दिलीप पवार, दशरथ इंगोले, आनंद चौधरी, बबलू शेख, आसराम गडदे, गोकुळ मांजरे, विशाल खलसे, प्रथमेश ठोंबरे, गणेश कागदे, बाबासाहेब अंधारे, कन्हैया निंबाळकर, सुनिल मुठाळ, बापू घोलकर, अवधुत मॅडम उपस्थित होते..

# चिक्केहळ्ळी गावात विहिरीत पडलेल्या बैलाला जीवदान

## सागर कल्याणशेट्टीची संवेदनशिलता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ मे-**



कृषी संस्कृतीशी निगडीत बैलगाडा शर्यतीचे नेटके नियोजन करणारे पंचायत सामतीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी मुक प्राण्याच्या बाबतीत अंत्यत संवेदनशिल संकटसमयी तत्काळ धाऊन जाणारे असल्याचे दिसून आले. चिक्केहळ्ळी गावात घडलेली ही घटना खरोखरच माणुसकीचा आदर्श ठरावी अशीच आहे. विहिरीत पडलेल्या मुक्या बैलाचा जीव वाचवण्यासाठी उपसभापती. सागर कल्याणशेट्टी यांनी दाखवलेली तत्परता आणि नेतृत्व कौतुकास्पद आहे. याबद्दल मोठे समाधान व्यक्त होत आहे.

चिक्केहळ्ळी गावातील एका बैलाचा अपघात होऊन तो विहिरीत पडला. या घटनेची माहिती मिळताच उपसभापती.सागर कल्याणशेट्टी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी केवळ मदत करण्याचे आवाहनच केले नाही, तर संपूर्ण बचावकार्याचे नेतृत्व स्वतः हाती घेतले. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधत, ग्रामस्थांना सोबत घेत आणि योग्य नियोजन करून त्यांनी बैलाला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्याचे कार्य यशस्वी केले.आजच्या काळात अनेकजण समस्या पाहून पुढे निघून जातात . परंतु . उपसभापती कल्याणशेट्टी एका मुक्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी दाखवलेली संवेदनशीलता आणि जबाबदारी ही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कृतीतून प्राणीमात्रांविषयीची करुणा, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि संकटसमयी नेतृत्व करण्याची क्षमता दिसून येते.

शेतीची सर्वच कामे ट्रॅक्टर चालू आहेत बैलजोडी ठेवणे त्यांची निगा राखण काळजी घेण कमी होत चाललेल आहे. यामुळे कृषी संस्कृतीशी निगडीत बैलजोडी शेतकऱ्याचा आत्मा आहे . त्याचे रक्षण करणे गरजेचे आहे. सागर कल्याणशेट्टी यांचे हे कार्य केवळ एका बैलाचे प्राण वाचवण्यापुरते मर्यादित नाही, समाजात माणुसकी, दयाभाव आणि सेवाभाव जिवंत असल्याचा संदेश देणारे आहे. त्यांच्या या कार्याबद्दल शेतकरी वर्गातुन मोठे समाधान व्यक्त होत आहे .'नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर संकटात स्वतः पुढे येऊन जबाबदारी स्वीकारणे होय; आणि हेच उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मनसेतर्फे अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभाध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, वाहतूक सेना शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर, शिक्षक सेनेचे राज्यचिटणीस विश्वास गजभार, रोजगार व स्वयंरोजगार जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे आदी उपस्थित होते.



# आरोग्य शिबिरात २४० रुग्णांची केली तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडी, महाराष्ट्र प्रदेश, हृदयम सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, शेळगी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वरोग निदान मोफत आरोग्य शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

हृदयम सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश जगदीश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महाआरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांची मोफत तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रंगनाथ बंग, शेळगीचे पोलीस पाटील जगदीश मल्लिकार्जुन पाटील, प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक अविनाश पाटील, समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष शिवलिंग शहाबादे, उपाध्यक्ष चंद्रकांत रमणशेट्टी, डॉ. राजेश फडकुले आणि डॉ. सचिन बोणगारगी यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरामध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश पाटील, डॉ. अमोल पाटील, डॉ. सुनील हिलालपुरे, डॉ. अक्षय हवालदार, डॉ. अमर विभुते, डॉ. श्रेय आराध्ये, डॉ. मुक्तेश्वर शेटे, डॉ. अक्षय हनमशेट्टी, डॉ. चंद्रशेखर सालकी, डॉ. दीपिका चिंचोली आणि डॉ. नायडू यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी हृदयम सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांसह पंडित दीनदयाळ डेंटल हॉस्पिटल, केगाव आणि श्री शंकरशेठ साबळे हॉस्पिटल, बाळे येथील कर्मचारी वर्गाने सहकार्य केले. यावेळी कल्याणी बोरगावकर, नागनाथ बाळशेट्टी, सोमनाथ चौगुले, योगीनाथ धपाधुळे, अशोक धपाधुळे, प्रशांत शिवगुंडे, धनराज पाटील, शाम ढवणे, अल्ताफ इनामदार, मेघराज बोरगावकर उपस्थित होते.

# डी-४ कॅनॉलला तातडीने पाणी सोडा; माजी आमदार सातपुते यांच्या सूचना


## एक ते दोन दिवसांत पाणी सोडण्याची अधिकाऱ्यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३१ मे-**



माळशिरस तालुक्यातील डी फोर कॅनॉलला तातडीने पाणी सोडण्याच्या सूचना माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी नीरा उजवा कालव्याचे कार्यकारी अभियंता मोरे यांना दिल्या आहेत. एक ते दोन दिवसांत डी फोर कॅनॉलला पाणी सोडण्याचे आश्वासन कार्यकारी अभियंता मोरे यांनी दिले आहे.

वेळापूर, उघडेवाडी, पिसेवाडी आदी गावातील शेतकऱ्यांनी माजी आमदार राम सातपुते यांची भेट घेतली. परिसरात पाण्याची पातळी खालावली असून यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे सांगून कॅनॉलला लवकर पाणी सोडण्याबाबत विनंती केली होती. यावर माजी आमदार राम सातपुते यांनी नीरा उजवा कालव्याचे कार्यकारी अभियंता मोरे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. परिसरातील शेतकऱ्यांची अडचण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देत तातडीने पाणी सोडण्याबाबत विनंती वजा सूचना केली.



दरम्यान कार्यकारी अभियंता मोरे यांनी एक ते दोन दिवसांत म्हणजेच दिनांक १ जून किंवा २ जूनपर्यंत डी फोर कॅनॉलला पाणी सोडण्यात येईल असे आश्वासन दिले. आश्वासनाने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी माजी आमदार राम सातपुते यांचे आभार मानले आहेत.

# ‘भाजपा’च्या बंद लखोट्यात कोणाचं नाव दडलंय?

## जिल्हा परिषद, महापालिकेच्या धर्तीवर गोपनियता

## ‘महाविकास आघाडी’त अद्यापही अलबेलच



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपाच्या गोटात इच्छुकांची गर्दी दिसून येत असल्याने प्रदेश पातळीवरुन सोलापुरातील उमेदवारांचा बंद लखोटा आला आहे. या बंद लखोट्यामध्ये कोणाचं नाव दडलंय? याकडे लक्ष लागून राहिले आहे.

सोमवारी सकाळी भाजपाच्या बैठकीत हा लखोटा उघडून त्याच उमेदवारांचा उद्या शेवटच्या दिवशी वाजत-गाजत अर्ज भरला जाईल, अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली. दरम्यान, जिल्हा परिषद अन् मनपाच्या धर्तीवर उमेदवारीची प्रचंड गोपनियता पाळण्यात आल्याचे यावरुन दिसून येते. भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुकांत मोठी रस्सीखेच आहे. माजी आमदारद्वय राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, दिलीप माने, राजन पाटील यांच्यासह शशिकांत चव्हाण, शहाजी पवार, रोहन देशमुख आदींनी उमेदवारीसाठी शर्थीने प्रयत्न करीत आहेत. तर इकडे ‘महाविकास आघाडी’त उमेदवारीविषयी अद्यापही अलबेलच असल्याचे दिसून येत आहे.

> ४ दिवसांत ५४ अर्जांची विक्री
> सोमवार, दि.२५ मे २०२६ पासून उमेदवारी अर्ज विक्रीस सुरुवात झाली आहे. दि.२५, २६, २९ आणि ३० मे या चार दिवसांत एकूण ५४ अर्जांची विक्री झाली आहे. दि.२७, २८ आणि ३१ मे रोजी शासकीय सुट्टी असल्याने अर्ज विक्री बंद होती.

# भगवंत मंदिरात श्रीराम कथा ज्ञानयज्ञास प्रारंभ

### ह.भ.प.राघव चैतन्य बाबा यांचे प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३१ मे-**

येथील भगवंत मंदिरात श्रीराम कथा ज्ञानयज्ञास प्रारंभ करण्यात आला. ह.भ.प.राघव चैतन्यबाबा पुणे यांची श्रीरामकथा ज्ञानयज्ञ सुरुवात झाली. भाविकांनी या प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाबासाहेब कापसे यांनी केले.

याप्रसंगी माजी आमदार राजेंद्र राऊत, त्यांच्या पत्नी कविता राऊत, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, त्यांचे पती प्रशांत कथले, बार्शी पंचायत समितीच्या सभापती मीनाक्षी रोंगे, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन विजय गरड, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, बार्शी नगरपालिकेचे नगरसेवक विजय चव्हाण, प्रकाश माने, नगरसेविका चंद्रकला कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.






# वटवृक्ष मंदिर परिसर वाहनांनी झाला जाम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि ३१ मे-**

स्वामी महाराजाच्या दर्शनार्थ राज्यासह देश-विदेशातून आलेल्या भक्तांच्या वाहनांनी वटवृक्ष मंदिर परिसर जाम झाल्याचे दिसून आले. पोलिस निरीक्षक दीपक भिताडे हे पोलिस फौजफाट्यासह २४ तास फिल्डवर थांबून वाहतुकीचे नियोजन करण्यात मग्न होते. नो पार्किंग वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई करीत दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कमलाराजे चौक, फत्तेसिंह चौक येथेच वाहनाना रोखणे बेडर कन्नया चौकापासुन भाविकाना पायी सोडणे वाहनांना मंदिराच्या काही अंतरावरच रोखणे, भाविकाना मंदिरापासून काही अंतरावरून चालत पाठवणे गरजेचे बनले आहे. वाहने मंदिराच्या काही अंतरावरच रोखणे पार्क करणे गर्दीच्या कालावधीत आवश्यक आहे.

अरुंद रस्ते, भाविकांचा येणारा प्रचंड ओघ पाहता गर्दी काळात वटवृक्षस्वामी मंदिर अन्नछत्र मंडळ परिसरात वाहतुकीबाबत विशेष नियोजन करणे गरजेच बनले आहे. गर्दी काळात मंदिर परिसरात क्षेत्रफळप्रमाणे पार्किंग व्यवस्थाप्रमाणे किती वाहनाना प्रवेश दयायचा वाहनाना मंदिराच्या काही अंतरावरच रोखण यांसह विशेष नियोजन करणे अत्यावश्यक बाब बनली आहे.




# हेमु चंदेले हे स्व.भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत आहेत : सुशीलकुमार शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मे-**

ज्येष्ठ नेते हेमू चंदेले हे आपले वडील थोर स्वातंत्र्यसेनानी स्व.भाई छन्नुसिंह चंदेले यांच्यापासून प्रेरणा घेत त्यांच्या विचारांचा व ध्येयवादाचा वारसा पुढे नेण्याचे काम करीत आहेत. तसेच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य करीत नवी पिढी उभी करीत आहेत, असे गौरवोद्गार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

येथील ज्येष्ठ नेते हमीरसिंह ऊर्फ हेमू चंदेले यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित गौरव सम ारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर माजीमंत्री अशोक पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, माजी आम दार अनंतराव गाडगीळ, खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदारद्वय प्रकाश यलगुलवार, विश्वनाथ चाकोते, गौतम अरबडे, प्रा.विलास बेत, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे आदींची उपस्थिती होती.




हेमू चंदेले यांनी कधीच राजकीय महत्वाकांक्षा ठेवली नाही. सामजिक समरसतेचा विचार पुढे नेण्याचे काम करीत आहेत. सर्वधर्मसमभावाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्यदेखील ते नेटाने करीत आहेत, असेही ते म्हणाले.

माजी मंत्री अशोक पाटील म्हणाले की, या पक्षातून त्या पक्षात राजकीय कोलांटउड्या मारण्याच्या जमान्यात हेमू चंदले यांच्यासारखे व्यक्ती हे निश्चितच अपवाद आहेत. राजकीय लालसा न ठेवता त्यांनी आपली चळवळ कायम ठेवली आहे. ज्येष्ठ नेते उल्हास पवार म्हणाले की, हेमूजींनी विचार व तत्वांशी कधी तडजोड केली नाही. समर्पित भावनेने ते अविरतपणे काम करीत आले आहेत.माजी आमदार अनंतराव गाडगीळ म्हणाले की, हल्ली राजकारणात तत्व,निष्ठा याची किंमत राहिली नाही. अशा या जमान्यात तत्व,निष्ठा याला तिलांजली न देता गरिबांना ज्ञानदान तसेच इतर कार्याच्या माध्यमातून ऊब देण्याचे महत्त्वपूर्ण काम हेमू चंदेले करीत आहेत.

या कार्यक्रमात हेमू चंदेले व सविता चंदेले या दांपत्याचा सुताचा हार घालून सत्कार करण्यात आला. गौरव ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी नामदेव भगत, सुधीर खरटमल, प्रा.डॉ.रोझा चंदेले, डॉ.पायल चंदेले, रुस्तम कंपली, अमृतदत्त चिन्नी, तुळशीदास जव्हेरी, सुनील दावडा, नीलेश गायकवाड आदी उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार राकेश टोळ्ये यांनी प्रास्ताविक केले. अंबादास शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

### काँग्रेसचे योगदान तरुणांना माहीत नाही

सत्काराला उत्तर देताना हेमू चंदेले म्हणाले की, आमच्या कुटुंबाची ओळख ही काँग्रेस, गांधी-नेहरु-इंदिराजी यांचे विचार याच्याशी निगडीत आहे. वयाच्या १४ व्या वर्षी आंदोलनातील सहभागामुळे मी सक्रिय राजकारणात आलो. स्वातंत्र्य लढा आणि त्यानंतर देशाच्या उभारणीत काँग्रेसने दिलेले योगदान तरुणांना माहित नाही. देश स्वतंत्र झाला, त्यावेळी कोणत्याही सुविधा नव्हत्या. तेव्हापासून काँग्रेसने देशाच्या कल्याणाकडे लक्ष दिले. कठीण काळात देशासमोर असलेल्या आव्हानांचा सामना काँग्रेसने सक्षमपणे केल्याचे आम्ही नव्या पिढीला सांगू शकलेलो नाही; ते आता सांगावेच लागेल.

# पामतेलाचा साठा जप्त; दूध संकलन, शीतकरण केंद्र बंद करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३१ मे-**

अन्न व औषध प्रशासनाने अकलूज व माळशिरस तालुक्यात धडक कारवाया करत संशयित पामतेलाचा साठा जप्त केला. एका दूध संकलन व शीतकरण केंद्राला व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.



येथील व्यापारी जयकुमार दलुचंद दोशी यांच्या किराणा व भुसार दुकानाची तपासणी केली असता पामतेलाच्या दर्जा, लेबलिंग मधील त्रुटींवर संशय आल्याने २ लाख ४४ हजार ७०० रुपये किंमतीचा ९९७किलो पामतेलाचा साठा जप्त करण्यात आला.पिसेवाडी-वेळापूर (ता.माळशिरस) येथील जय हनुमान भाईनाथ दूध संकलन व शीतकरण केंद्रावरही अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली. या केंद्राचे मालक गणेश काळे पाटील यांनी वारंवार सूचना देऊनही अन्न व औषध प्रशासनाचा आवश्यक परवाना न घेता व्यवसाय सुरु ठेवल्याचे तपासात आढळून आले. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत सुरक्षित अन्न पुरवठ्यासंबंधीच्या अनेक तरतुदींचे उल्लंघन झाल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित डेअरीला तत्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले आहेत.



**धाराशिव जिल्हा आज शाश्वत विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. रेल्वे, सिंचन, उद्योग, शेती आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात होत असलेल्या बदलांमुळे जिल्ह्याच्या विकासाला नवे परिमाण लाभत आहे. या विकासाच्या पायाभरणीकडे पाहिले, तर त्यामागे एक नाव ठळकपणे दिसते ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील.**

# डॉक्टर साहेबांमुळे विकासाच्या वाटेवर आलेला धाराशिव जिल्हा

आज धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाचे काम वेगाने सुरू आहे. निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीसाठी मोठा निधी उपलब्ध झाला आहे. कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी साठवण्यासाठी तुळजापूरचा रामदरा तलाव सज्ज झाला आहे. ही सर्व कामे अचानक घडलेली नसून त्यामागे अनेक दशकांची दूरदृष्टी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा आहे.

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, चालू गाळप हंगामात धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उसबिलापोटी साखर कारखान्यांकडून तब्बल दोन हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळाली आहे. जिल्ह्यातील १६ साखर कारखाने आणि १२ गूळ पावडर कारखान्यांनी मिळून सुमारे ७१ लाख टन उसाचे विक्रमी गाळप केले आहे. या यशामागे केवळ कारखाने उभे राहणे नाही, तर त्यासाठी आवश्यक असलेली सिंचन व्यवस्था निर्माण होणे हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. १९७८ मध्ये डॉ. पद्मसिंह पाटील यांनी मंत्रीपदाची धुरा सांभाळली, त्यावेळी जिल्ह्याची परिस्थिती अत्यंत वेगळी होती. दुष्काळ, अपुरी सिंचन व्यवस्था आणि मर्यादित औद्योगिक विकास अशा अनेक अडचणी जिल्ह्यासमोर होत्या. मात्र, त्यांनी पाटबंधारे मंत्री आणि ऊर्जामंत्री म्हणून काम करताना जिल्ह्याच्या विकासासाठी दीर्घकालीन नियोजन केले. सिंचनाच्या सुविधा वाढविण्यावर त्यांनी विशेष भर दिला. परिणामी शेतीला पाणी मिळू लागले, उसाचे क्षेत्र वाढले आणि त्यासोबतच साखर उद्योगही विस्तारला.

कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. उजनी धरणातील पाणी धाराशिवसाठी आरक्षित करून घेणे हीदेखील त्यांची मोठी कामगिरी मानली जाते. ही कामे करताना त्यांना राजकीय किंमतही मोजावी लागली; मात्र आपल्या भागाचा विकास आणि शेतकऱ्यांचे हित यालाच त्यांनी नेहमी प्राधान्य दिले.

धाराशिवला रेल्वे आणण्याचे श्रेयही मोठ्या प्रमाणात डॉक्टर साहेबांनाच जाते. बार्शी-लातूर रेल्वेमार्गाला धाराशिवकडे वळवून जिल्ह्याला रेल्वे संपर्क मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आज आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे रेल्वे प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असून भविष्यात धाराशिव रेल्वे जंक्शन म्हणून विकसित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाण्याचा शाश्वत स्त्रोत नसल्याने मोठे उद्योग जिल्ह्यात येण्यास मर्यादा होत्या. मात्र सिंचन आणि जलसंधारणाच्या प्रकल्पांमुळे परिस्थिती बदलू लागली. कौडगाव एमआयडीसीमध्ये संरक्षण साहित्य उत्पादनाचा प्रकल्प सुरू होण्याच्या हालचाली या बदलाचेच द्योतक आहेत. शेती आणि शेतीपूरक उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे कामही डॉक्टर साहेबांच्या धोरणांमुळे शक्य झाले.

डॉ.पद्मसिंह पाटील यांचे राजकारण सामान्य म ाणसाभोवती फिरत आले आहे. शेतकरी, कामगार, युवक आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या त्यांनी जवळून अनुभवल्या. त्यामुळेच त्यांच्या निर्णयांम ध्ये जनसामान्यांचा विचार केंद्रस्थानी राहिला. मंत्री असताना त्यांनी जिल्ह्यात वीज उपकेंद्रांचे जाळे उभे केले, सिंचन प्रकल्पांना गती दिली आणि शेतीला आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार आले, अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. मात्र प्रत्येक वेळी त्यांनी धैर्याने आणि संयमाने परिस्थितीचा सामना केला. जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आणि केलेला संघर्ष आजही विकासाच्या रूपाने दिसून येतो. आज धाराशिव जिल्हा ज्या विकासाच्या टप्प्यावर उभा आहे, त्याची पायाभरणी अनेक दशकांपूर्वी करण्यात आली होती. रेल्वे, सिंचन, उद्योग, साखर कारखाने आणि कृषी विकास यामागील दूरदृष्टीचा विचार केला, तर डॉ.पद्मसिंह पाटील यांचे योगदान विशेषत्वाने अधोरेखित होते. त्यांच्या प्रयत्नांना पुढे नेत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून अनेक महत्त्वाचे प्रकल्प साकार होत आहेत.धाराशिवच्या विकासगाथेत डॉ. पद्मसिंह पाटील यांचे योगदान म हत्त्वपूर्ण राहिले आहे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी आयुष्यभर झटलेल्या या नेतृत्वाचा आज, १ जून रोजी वाढदिवस आहे. त्यांना निरोगी, दीर्घ आणि आनंदी आयुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**शब्दांकन-डॉ.धीरज वीर**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कोयते पुरवठ्याच्या व्यवहारात साडेसहा लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ मे -**

कोयते पुरवठ्याच्या व्यवहारातून ६ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रामेश्वर ज्ञानदेव सावंत (रा. वाकडी, ता. परंडा) यांनी दि. ६ जून २०२३ रोजी फिर्यादी धनंजय प्रल्हाद काकडे (वय ४२, रा. तांबेवाडी, ता. भूम) यांच्याशी विजय सुदाम राठोड यांच्या सोबत ८ कोयते पुरविण्याबाबत ९ लाख ६० हजार रुपयांचा करार केला होता.

मात्र, कोयते पुरवठ्यासाठी घेतलेल्या रकमेतून काही रक्कम परत करून उर्वरित ६ लाख ५० हजार रुपये परत देण्यास नकार देत फसवणूक केल्याची तक्रार धनंजय काकडे यांनी दिली आहे.

या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### पारगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**वाशी, दि.३१ मे -**

तालुक्यातील पारगाव येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महिलांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यानंतर शिवसेनेच्या जिल्हा परिषद सदस्या सविता विकास तळेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. गावातील मुख्य चौकात अहिल्यादेवींच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.



### तेरणा अभियांत्रिकात 'लाइफ स्किल आणि महिला सुरक्षा' कार्यशाळा

**धाराशिव, दि.३१ मे -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने 'लाइफ स्किल आणि महिला सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रमुख मार्गदर्शिका शलाका जाधव यांनी व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य, आत्मविश्वास वृद्धी, तणाव व्यवस्थापन, सायबर सुरक्षा आणि आत्मसंरक्षण यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने होते, तर तेरणा ट्रस्टच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी अनुराधा देशपांडे व सॉफ्ट स्किल डेव्हलपर धनिया मेनन यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### तुळजापूरहून पुरुषोत्तम पुरीसाठी एसटी बससेवा सुरू

**तुळजापूर, दि.३१ मे -**

तुळजापूर एसटी आगारामार्फत शनिवार (दि. ३०) पासून तीर्थक्षेत्र पुरुषोत्तम पुरीसाठी थेट बससेवा सुरू करण्यात आली. बससेवेचा शुभारंभ ज्येष्ठ पत्रकार अंबादास पोकळे यांच्या हस्ते करण्यात आला. अधिक मासानिमित्त पुरुषोत्तम पुरी येथे भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन ही सेवा सुरू करण्यात आली आहे. बस दररोज सकाळी ७ वाजता तुळजापूरहून सुटणार असून दुपारी २ वाजता पुरुषोत्तम पुरी येथून परतीचा प्रवास करणार आहे. ही बस धाराशिव, येडशी, येरमाळा, कळंब, केज, धारूर, माजलगाव मार्गे धावणार आहे. या बससेवेचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आगार प्रमुख महेश रामपुरे यांनी केले आहे.

### डॉ. सचिन चव्हाण यांची जिल्हा पर्यावरण समितीवर निवड

**परंडा, दि.३१ मे -**

शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालय, परंडा येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.



सचिन सुभाषराव चव्हाण यांची जिल्हा पर्यावरण समिती, धाराशिववर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आली. डॉ. चव्हाण हे संशोधक मार्गदर्शक, युनिसेफच्या ग्रीन क्लबचे प्रशिक्षक तसेच विविध पर्यावरणविषयक संस्थांमध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले.

### नलिनी रूईकर यांचे निधन

**तुळजापूर, दि.३१ मे -**


नलिनी कमलाकर रूईकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी दि. २४ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कोरेगाव (ता. उमरगा) येथील स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी तुळजापूर, उमरगा भागातील नातेवाईक उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक स्व. के.एन. रूईकर यांच्या त्या पत्नी होत.

## ३२ वर्षांनंतर धाराशिवला विधानपरिषदेत प्रतिनिधित्वाची संधी...

# बसवराज पाटील यांच्या उमेदवारीने विजयाचा मार्ग सुकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी महायुतीकडून माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर राजकीय चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे.



तीनही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीचे भक्कम संख्याबळ असल्याने त्यांच्या विजयाची शक्यता प्रबळ मानली जात आहे.

त्यामुळे तब्बल ३२ वर्षांनंतर धाराशिव जिल्ह्याला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व मिळण्याची संधी निर्माण झाली आहे.सध्या धाराशिव जिल्ह्याचे चार विधानसभा आमदार, एक शिक्षक मतदारसंघाचे आमदार आणि एक पदवीधर मतदारसंघाचे आमदार असे सहा आमदार आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून आणखी एक आमदार निवडून आल्यास जिल्ह्याच्या प्रतिनिधित्वात वाढ होणार असून विकासकामांना अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या मतदारसंघात यंदा एकूण १,०५१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतींतील निवडून आलेले सदस्य या निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावणार आहेत.

राजकीय समीकरणांचा विचार करता महायुतीचे संख्याबळ स्पष्टपणे वरचढ असल्याचे चित्र आहे.माजी मंत्री बसवराज पाटील यांना प्रशासनाचा मोठा अनुभव असून धाराशिव जिल्ह्यातील विकासकामांवर त्यांची मजबूत पकड मानली जाते.

### ३२ वर्षांनंतर धाराशिवकडे उमेदवारी

या मतदारसंघाच्या इतिहासात १९९४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या प्रभावकाळात धाराशिव जिल्ह्याला उमेदवारी मिळाली होती आणि नरेंद्र बोरगावकर विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यानंतर राजकीय समीकरणांमुळे उमेदवारी लातूर आणि बीडकडे वळली. यंदा मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने धाराशिव जिल्ह्याकडे उमेदवारीचा मान दिला आहे.

### ओबीसी-लिंगायत समीकरणांचा विचार

धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश आमदार मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करतात. अशा परिस्थितीत लिंगायत समाजातील अनुभवी नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या बसवराज पाटील यांना उमेदवारी देत महायुतीने सामाजिक संतुलन साधण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. धाराशिव, लातूर आणि बीड या तिन्ही जिल्ह्यांत लिंगायत समाजाचे लक्षणीय अस्तित्व असल्याने या निर्णयाला सामाजिक प्रतिनिधित्वाच्या दृष्टीनेही महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, महायुतीने केवळ संख्याबळाचा विचार न करता सामाजिक समतोल, आगामी स्थानिक राजकारण आणि भविष्यातील निवडणुकांची रणनीती लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाची ठरणार आहे.

## हयातीचा दाखला आता घरबसल्या ऑनलाईन : तहसीलदार ढोकले

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ मे -**

शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात जाण्याची आवश्यकता राहिलेली नाही. केंद्र शासनाने विकसित केलेल्या बीएसएलएई (BSLE) ऑनलाईन प्रणालीद्वारे मोबाईलवरून घरबसल्या हयातीचा दाखला सादर करता येणार असल्याची माहिती तहसीलदार हेमंत ढोकले यांनी दिली.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ व विधवा निवृत्तीवेतन योजनांतील लाभार्थ्यांना या सुविधेचा लाभ मिळणार आहे. लाभार्थी स्वतः, नातेवाईकांच्या मदतीने किंवा ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र व नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून ऑनलाईन दाखला सादर करू शकतात.

हयातीचा दाखला ऑनलाईन सादर केल्यानंतर त्याची प्रत तहसील कार्यालयात देण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विहित मुदतीत दाखला सादर न केल्यास योजनेचा लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार हेमंत ढोकले व संजय गांधी निराधार विभागाचे अशोक जाधव यांनी केले आहे.

## 'स्वआधार'च्या कार्याची आयुक्त सत्यजित बडे यांच्याकडून प्रशंसा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

आळणी (धाराशिव) येथे दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्याचे नवनियुक्त आयुक्त सत्यजित बडे यांनी आळणी येथील तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था संचलित स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहाला भेट देऊन संस्थेच्या विविध उपक्रमांची सविस्तर पाहणी केली. पदभार स्वीकारल्यानंतरच्या महत्त्वपूर्ण दौऱ्यांपैकी या संस्थेची निवड करून त्यांनी कार्याची प्रत्यक्ष माहिती घेतली.



भेटीदरम्यान आयुक्तांनी बालगृह, विशेष शाळा, कार्यशाळा, फाईल मेकिंग व पार्लर प्रशिक्षण केंद्र तसेच 'स्वआधार क्लिनिक'ची पाहणी केली. निवासी मतिमंद, बहुविकलांग व विशेष गरजा असलेल्या मुलींसाठी राबविण्यात येणारे शिक्षण, पुनर्वसन, कौशल्य विकास, आरोग्य सेवा व स्वावलंबन उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली.

स्पेशल ऑलिम्पिक्स राष्ट्रीय स्पर्धेत संस्थेतील दोन मुलींनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच ९१ मुलींचे कायदेशीर पालकत्व स्वीकारून विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संस्था करत असलेल्या कार्याचीही दखल घेतली. यावेळी संस्थेचे सचिव शहाजी चव्हाण, मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांच्यासह विविध अधिकारी व जिल्ह्यातील दिव्यांग शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

आयुक्त सत्यजित बडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना, ग्रामीण भागात विशेष गरजा असलेल्या मुलींसाठी आत्मविश्वास, स्वावलंबन आणि सन्मानाने जगण्याची दिशा देणारे हे कार्य समाजपरिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे, असे गौरवोद्गार काढले.

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक अंकुश जगताप यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा आदर्श शिक्षक



अंकुश अंबादास जगताप (वय ८०) यांचे दि.२९ मे रोजी पुणे येथे उपचारादरम्यान निधन झाले.

इंग्रजी विषयावरील प्रभुत्व, शिस्तप्रियता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले अपार प्रेम यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने धाराशिवच्या शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे. कपिलधार स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अहिल्यादेवी चौकाला मिळणार भव्य सभामंडप; जयंती सोहळ्यात नगराध्यक्षांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ मे -**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त नळदुर्ग येथे आयोजित कार्यक्रमात अहिल्यादेवी चौकात भव्य सभामंडप उभारण्यात येणार असल्याची घोषणा नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केली. या घोषणेमुळे उपस्थित नागरिक व समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



▶▶ नळदूर्ग शहरात अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी...

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या वतीने जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नळदुर्ग बसस्थानक व नगरपालिका कार्यालयात अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मुख्य कार्यक्रम अहिल्यादेवी चौकात पार पडला. यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे व काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे यांच्या हस्ते पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना बसवराज धरणे यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, धार्मिक व पर्यावरणपूरक कार्याचा गौरव केला.

देशभरातील मंदिरांचा जीर्णोद्धार, विहिरी, घाट आणि जनहिताच्या विविध कामांमुळे त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. समितीच्या मागणीनुसार पुढील एका वर्षात अहिल्यादेवींच्या कार्याला साजेसा भव्य सभामंडप उभारण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

यावेळी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी अहिल्यादेवींचे विचार आणि कार्य घराघरांत पोहोचविण्यासाठी त्यांची जयंती प्रत्येक कुटुंबाने साजरी करण्याचे आवाहन केले. दत्तात्रय दासकर, मारुती खारवे आणि मुकुंद नाईक यांनीही अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमास विविध राजकीय, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर घोडके यांनी केले.

जयंती सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### उमरेगव्हाण येथे घरफोडी; ६९ हजारांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उमरेगव्हाण येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून ६९ हजार ४५० रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत रमाकांत गोपाळराव कुर्ले (वय ६३, रा. उमरेगव्हाण) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २३ मे रोजी सकाळी ८ ते दि. २५ मे रोजी सकाळी ६ या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचा कडी-कोंडा तोडून प्रवेश केला. घरातील कपाटातून १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## परंड्यात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ मे -**

सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती रविवारी (दि. ३१) परंडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, परंडा तालुक्याच्या वतीने उभारण्यात आलेल्या भव्य मंचावर राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख रणजीत ज्ञानेश्वर पाटील तसेच माजी जिल्हा परिषद सभापती भाऊसाहेब खरसडे यांनीही राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी परंडा पोलीस ठाण्याचे एपीआय चोरमले, माजी पंचायत समिती सभापती प्रा. गौतम लटके, माजी सरपंच सुरेश डाकवाले, सरपंच बप्पाजी काळे, ॲड. सुजित देवकते, मारुती मासाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि धनगर समाज बांधव उपस्थित होते.

## तेर रोडवरील भीषण अपघातात युवकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

तेर रोडवर झालेल्या भीषण अपघातात २५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात चारचाकी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक ओम उर्फ ओमप्रकाश सोनटक्के (वय २५, रा. हासेगाव (के), ता. कळंब) हे दि. २५ मे रोजी सायंकाळी मोटारसायकल (एमएच-२५ बीबी-४७१०) वरून हिंगळजवाडी-तेर मार्गाने जात होते. तेर गावाजवळील एमएसईबी कार्यालयासमोर समोरून येणाऱ्या होंडा कंपनीच्या चारचाकी वाहनाने (एमएच-१२ सीएम-४१४१) भरधाव व निष्काळजीपणे धडक दिली. अपघातात प्रतीक सोनटक्के गंभीर जखमी झाले असून त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित चारचाकी चालकाने कोणतीही मदत किंवा माहिती न देता घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

# एसबीआयमध्ये तारण ठेवलेल्या सोन्यावर कर्मचाऱ्यांनीच मारला डल्ला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

नांदेडमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टर लेन शाखेतून ग्राहकांनी तारण ठेवलेल्या तब्बल ८० तोळे सोन्यावर बँकेच्या कॅश इन चार्ज आणि सर्विस मॅनेजरनेच डल्ला मारला असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा डाव उघडकीस येऊ नये म्हणून दोघांनीही बँकेच्या लॉकरमध्ये खरे सोने काढून घेऊन ४१ तोळे बनावट सोने ठेवले होते. याप्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जवळपास पंधरा दिवसांपूर्वी घडलेल्या या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाची नांदेडमध्ये डॉक्टर लेन भागात शाखा आहे. या शाखेत ग्राहकांनी कर्ज घेण्यासाठी सोने तारण म्हणून ठेवले होते. आठ ग्राहकांनी लॉकरमध्ये ठेवलेले ३९१ ग्राम सोने हे बँकेच्या कॅश इन्चार्ज असलेल्या आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे यांनी संगनमत करून काढून घेतले. त्याचवेळी बँकेच्या लॉकरमधील ४१४ ग्रॅम सोने लंपास करून त्या ठिकाणी बनावट सोने ठेवले. या प्रकारात ८०५.९० ग्राम सोने या दोघांनी लंपास केले. या सोन्याची किंमत ८५ लाख ८१ हजार ५९७ रुपये दर्शविण्यात आली आहे. १८ मे पूर्वी हा प्रकार घडल्याची नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणात बँक कॅश इन्चार्ज आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे या दोघांविरुद्ध स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टर लेन शाखेचे मुख्य शाखा व्यवस्थापक राजीव अनंत कदम यांनी दिलेल्या तक्रारीवरून वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम हे करीत

# पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी तक्रारदारांशी साधला 'संवाद'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस - नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलीसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप



महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. चालू महिन्यात, लातूर, हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचे माध्यमातून, मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलिस उप महानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या. दिनांक ३० मे रोजी, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयात जिल्हा पोलीसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी १२.३० ते ०२.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण ३७ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय, इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, इतर उपस्थितांनी पोलीसांच्या कामकाजाबाबत अधिक अपेक्षा व्यक्त केल्या. सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या तक्रारी शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे हजर होते.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**मुदखेड** -मुदखेड शहर काँग्रेस कमिटी कार्यालयात दि. ३१ मे रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व आदरपूर्वक साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



व तसेच त्यांच्या समाजहितकारी कार्याचा व आदर्श शासनकारभाराचा गौरवपूर्ण उल्लेख केला. या कार्यक्रमा प्रसंगी माजी नगरसेवक गंगाधर डांगे, नगरसेवक प्रतिनिधी तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार,गोविंद गोपानपाल्ले, सुभाष चौदंते, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोडके,विठ्ठल आचार्य,शेख गौस भाई फुलवाले, मोहन भाई फुलवाले, गंगाधर पाटील मगरे,शेख अनिस भाई नायगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्ह्यात दोन दिवसासाठी यलो अलर्ट

**नांदेड,-** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिनांक ३१मे २०२६ रोजी दुपारी १३:१८ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ३१ मे २०२६ व दि. ०१ जून २०२६ या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. ३१ मे २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व दि. ०१ जून २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या पांगरी च्यावतीने तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३१ मे -**

नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालय पांगरीच्यावतीने दिनांक ३१ मे २०२६ रोजी जागतिक तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात तंबाखू खाणे, सिगारेट ओढणे याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. या प्रसंगी जनजागृती व्हावी म्हणून नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वतीने खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी शहरातील वजीराबाद, रेल्वे स्टेशन, आय.टी.आय चौक येथे या प्रमुख चौकात पथनाट्याच्या माध्यमातून तंबाखू ही शरीरासाठी किती हानिकारक आहे हे दर्शवून दिले.

नांदेड शहरातील घराघरात विविध ठिकाणी डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी मोठ्या प्रमाणात करून तंबाखू व्यसनाधीन झालेल्या नागरिकांना व्यसनमुक्त करण्याचा मान मागच्या वर्षी भारतातून पहिला नंबर आला होता. आणि यंदाही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करून. यशाची परंपरा कायम ठेवण्याचे प्रयत्न करत आहोत. यासाठी नांदेड शहराच्या कानाकोपऱ्यात व शासकीय कार्यालय या ठिकाणी तंबाखू विरोधी माहिती सामान्य नागरिक व शासकीय अधिकारी कर्मचारी यांना वारंवार देऊन देऊन त्यांना व्यसनमुक्ती पासून प्रावर्त करण्याचे काम नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी सातत्याने करत करत आहेत. त्या अनुषंगाने नांदेडचे वजीराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक जयपालसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.यावेळीआजचा तरुण तंबाखूच्या आहारी जाऊन तंबाखूचे सेवन केल्याने कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसरोगाचे आजार तसेच तोंडाच्या कॅन्सर विकार होऊ शकतात. तंबाखू सेवनामुळे केवळ स्वतःचेच नव्हे तर कुटुंबाचे आणि समाजाचेही नुकसान होते.या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तंबाखूच्या वाढत्या समस्येविरोधात, विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाच्या महत्त्वपूर्ण संदेशाचे नागरिकांनी कौतुक केले.हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष विनोदकुमार श्रीरामवार, व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास डागवार, वरिष्ठ प्राध्यापक व मार्गदर्शक डॉ. राजेश कुमार दासी तसेच डॉ. सुजाता देशमुख व डॉ. सुजेल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला.

# कापसावरील आयात शुल्क रद्द : शेतकरी संघटनेचा संताप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मे -**

आगामी कापूस हंगामात दरवाढीची अपेक्षा ठेवलेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा धक्का दिला आहे. कापसावरील ११ टक्के आयात शुल्क पुढील ५ महिन्यांसाठी पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. या निर्णयामुळे कापूस उत्पादक शेतकरी देशोधडीला लागेल, असा गंभीर आरोप शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव शिंदे यांनी केला आहे.

सरकारने केलेली उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा फसवी असल्याचे शिवाजीराव शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी घोषणा करणाऱ्या सरकारचा शेतकरी विरोधी चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. संभाव्य दरवाढ रोखण्यासाठीच आयात शुल्क रद्द केले. हा निर्णय कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे. याचा फायदा फक्त कापड उद्योगाला होईल, देशातील कापड स्वस्त होणारच नाही, असा दावा सुद्धा त्यांनी केला आहे.

**काय होणार परिणाम?**

परदेशी कापसाची आयात वाढणार असून आयात शुल्क शून्य केल्यामुळे एआय आणि जेनेटिक मॉडीफाय तंत्राने उत्पादित केलेला, अमेरिका व आफ्रिकन देशांतील स्वस्त कापूस भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणात येईल. त्यामुळे देशांतर्गत भाव कोसळण्याचा धोका आहे. बाजारात परदेशी कापसाची उपलब्धता वाढल्याने स्थानिक कापसाचे भाव गडगडतील. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होईल.

आयात शुल्क ५ महिन्यांच्या कालावधीसाठी रद्द केल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचा कापूस बाजारात येण्याच्या काळात मोठ्या प्रमाणात आयात केलेल्या कापूस येऊन पडणार आहे. म्हणजे संपूर्ण कापूस हंगामासाठी याचे दुष्परिणाम दिसून येतील. जोपर्यंत शेतकऱ्याकडे माल आहे, तोपर्यंत भाव पाडायचे आणि माल व्यापाऱ्यांकडे गेला की शुल्क पुन्हा लागू करायचे, असा हा डाव असल्याचा आरोप शिंदे यांनी केला.

**उत्पादन खर्चही निघणे कठीण**

बोगस बियाणे, कीड-रोग, निसर्गाची अवकृपा झेलून शेतकऱ्यांनी कपाशीची बाजारपेठ उभी केली आहे. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, डिझेल व मजुरीचे दर वाढल्याने प्रति एकरी उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. अशा स्थितीत कापसाला किमान ९ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळणे अपेक्षित होते. मात्र आयात खुली केल्याने उत्पादन खर्चही निघणार नाही आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत जाईल, अशी भीती व्यक्त केली आहे.

भारतीय शेतकऱ्यांच्या कापसावर आयात कापसाचा परिणाम होणार नाही, कारण तो लांब धाग्याचा कापूस भारतामध्ये पिकवला जात नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. ते बियाणे सरकार उपलब्ध करून देत नाही तर मग पिकेल कोठून असा सवाल शिंदे यांनी केला आहे.

**अच्छे दिन फक्त उद्योगपतींसाठी?**

शिंदे यांनी सवाल केला की, हा निर्णय शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आहे की टेक्सटाईल लॉबीतील बड्या उद्योगपतींना स्वस्त कच्चा माल मिळवून देण्यासाठी? ग्राहकाला कापड महाग मिळते तेव्हा नफा शेतकऱ्याला मिळत नाही. पण शेतकऱ्याला दोन पैसे मिळण्याची वेळ आली की सरकार आयात-निर्यात धोरण बदलते. हा कुठला न्याय?

**आंदोलनाचा इशारा**

कापूस पिकवून देशाची अब्रू झाकणारा शेतकरी आज स्वतःच्या भविष्याची वस्त्रे फाटताना पाहत आहे. एकीकडे आत्मनिर्भर भारताच्या गप्पा आणि दुसरीकडे परदेशी कापसाला लाल गालीचा, हे चालणार नाही. सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही तर कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

# अंतरगावात अवैध वाळू उपसा पोलिसांची कारवाई ; ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३१ मे -**

नांदेड जिल्ह्यात सध्या अवैध वाळू माफियां विरोधात सुरू असलेल्या'ऑपरेशन क्रॅक डाऊन' अंतर्गत नायगांव तालुक्यातील अंतरगाव येथे पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत अवैध वाळू उपसा करणाऱ्या टोळीचा मोठा पर्दाफाश केला. गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर टाकलेल्या या छाप्यात तब्बल ७६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने वाळू माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांना ३० मेच्या रात्री गुप्त माहिती मिळाली की, नायगाव तालुक्यातील अंतरगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात बोटींच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू आहे.

माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी तातडीने नियोजन करून ३१ मे रोजी पहाटे १.२० वाजण्याच्या सुमारास दोन पंचांसमक्ष घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच काही जणांनी घटना स्थळा वरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी घटनास्थळी उभे असलेले एक हायवा, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी, दोन मोटारसायकली आणि सहा ब्रास काळी रेती असा मोठा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईदरम्यान जेसीबी चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला. संबंधित जेसीबी पोलिसांनी ताब्यात घेत पोलीस बंदोबस्तात ठेवली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये भारत बेंझ हायवा, दोन महिंद्रा ट्रॅक्टर-ट्रॉली, टाटा जेसीबी, दोन मोटारसायकली आणि सहा ब्रास काळी रेतीचा समावेश असून, त्याची एकूण किंमत सुमारे ७६ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक गजानन तोटेवाड यांच्या फिर्यादी वरून बळवंत गोविंदराव शिंदे, गोपिनाथ बालाजी हंबर्डे, गोविंद तुळशिराव शिंदे, मोहन सखाराव शिंदे, विश्वांभर नागोराव शिंदे, पांडुरंग हानमंत ईबितवार, नागेश संजय हंबर्डे, भिवजी सिताराम तोडे, गजानन भाऊराव तोडे, शंकर बाबाराव शिंदे व इतर एका आरोपीविरुद्ध कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मल्लिका र्जुन कारामुंगे करीत आहेत.

ही धडक कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली कुंटूरचे पोलीस निरीक्षक अरविंद घोडके, पोलीस उपनिरीक्षक मल्लीकार्जुन कारामुंगे, नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गजानन तोटेवाड व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दरम्यान, या कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी संपूर्ण पथकाचे अभिनंदन करत, जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधातील मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

# डॉ.व्यंकटेश मामीलवाड यांच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३१ मे -**

कुशल प्रशासक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक ३१ मे २०२६ रोजी शासकीय रक्तपेढी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच श्री हुजूर साहेब रक्तपेढी संतकृपा मार्केट गुरुद्वारा चौक नांदेड या दोन्ही रक्तपेढीत थेट रक्तदान शिबिराचे आयोजन माजी जिल्हाप्रमुख युवासेना नांदेड चे डॉ .व्यंकटेश मामीलवाड यांनी आयोजित केले होते. यामध्ये मोठ्या संख्येने युवकांनी आपले रक्तदान करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली.

नांदेड शहरातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने. उन्हाळ्याच्या दिवसात वाढलेल्या तापमानामुळे नांदेड शहरातील रक्तपेढ्यामध्ये रक्तदान रक्ताचा तुटवडा होत असल्यामुळे गरजू रुग्णाची प्रचंड गैरसोय होत आहे. ही बाब डॉ. व्यंकटेश मामीलवाड यांच्या लक्षात आल्याने त्यांनी



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे निमित्त साधून रक्तदान शिबिर थेट रक्तपेढीतच घेण्याचा निर्णय घेतला या कार्यक्रमास कसलाच विलंब न लावता हे रक्तदान शिबिर घेऊन शासकीय रक्तपेढी व श्री हुजूर साहेब रक्तपेढी यांना मोठ्या प्रमाणावर युवकांनी रक्तदान करून रक्त साठा वाढविला या थेट रक्तदान शिबिर कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गीरडे , माझी शिवसेना शहर प्रमुख साहेबराव मामीलवाड, राजेंद्रसिंग टमना, युवा सेनेचे अविनाश इंद्रवाड, लक्ष्मीकांत दिंडे, नागेश गायकवाड,कोमेश गायकवाड, ऋषिकेश वाघमारे, अक्षय गुजूवार, शुभम पवार, निखिल मुंडे, किरण पोकले आदींची उपस्थिती होती.

# अवैध दारु विक्रिसाठी भोकर शहर सूरक्षित!

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३१ मे -**

शहरात पहाटे पासून रात्री उशीरापर्यंत अवैध दारु विक्रि सूरु असताना राज्य उत्पादन शूल्क विभाग मात्र झोपेचं सोंग घेत असुन मोठ्या प्रमाणात दारु विक्रि होत असल्यामूळे अवैध दारू विक्रिला भोकर शहर सूरक्षित असल्याची चर्चा होत आहे.

भोकरमध्ये अधिकृत परवाना असलेली देशी दारुची दूकाने तर काही बार अँन्ड रेस्टॉरन्ट चालतात परवानाधारकांना शासनाकडून विक्रीचे नियम व अटी घालून दिले दूकाने उघडण्याची व बंद करण्याची वेळ ठरवून दिलेली आहे.अवैध दारु विक्रि करणाऱ्यांना कोणताही नियम नसतो ना कूणाची भिती रात्री बेरात्री आपली दूकाने सूरुच ठेवली जातात व याठिकाणी दारुड्यांना कोणत्याही वेळेला दारु उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत आहे, शहरातील व शहरालगत मटन खानावळ व धाब्यावरील अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून होत असलेली दारु विक्री थांबवण्याची मागणी शहरातील बार अँन्ड रेस्टॉरन्ट असोशिएशन कडून मागील काही दिवसापूर्वी संबधित विभागाकडे करण्यात आली होती संबधित विभागाकडून बार अँन्ड रेस्टॉरंट चालकांच्या मागणीकडे सोयीस्कर दूर्लक्ष करण्यात आल्याने अवैध दारु विक्रि करणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. शहरात खूलेआम अवैध दारु विक्रि होत असल्याचे पहावयास मिळते उत्पादन शूल्क विभागाचे संबधित कर्मचारी अवैध दारु विक्रेत्यांकडून दरमहा हफ्ते वसूली करित असल्याची चर्चा असून हफ्तेखोरीमूळे मटनखानावळ आणि धाब्यावर सर्रासपणे अवैधरित्या दारु विक्रि होत असल्याचे पहावयास मिळते. संबधित विभागातील कर्मचारी व दारु विक्रेते यांचे अर्थिक हित संबध असल्याने हा अवैध दारु विक्रिचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावल्याचे पहावयास मिळत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून होत असलेली अवैध दारु विक्रि त्वरीत बंद करण्यात यावी अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# लोक कल्याणकारी नेतृत्व : आ. बालाजीराव कल्याणकर

नांदेड उत्तरचे लोकप्रिय आमदार म्हणून ज्यांचे नाव आज नांदेड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर लोककल्याणकारी नेतृत्व म्हणून आदराने घेतले जाते, असे सर्वांचे लाडके आमदार बालाजीराव कल्याणकर साहेब यांचा १ जून हा वाढदिवस प्रत्येकासाठी आनंदाचा आणि उत्साहाचा क्षण ठरतो.

नेतृत्व म्हणजे केवळ पद नव्हे, तर जनतेच्या मनात निर्माण होणारा विश्वास, आपुलकी आणि जिव्हाळा होय. एखादा नेता आपला माणूस वाटतो, कुटुंबातील सदस्यासारखा वाटतो, तेव्हाच त्या नेतृत्वाला खऱ्या अर्थाने जनतेचे पाठबळ लाभते. ही भावना आज नांदेड उत्तर मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या मनात आमदार कल्याणकर साहेबांबद्दल दिसून येते, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

साहेबांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा साधेपणा आणि सहज उपलब्धता. प्रत्येक व्यक्ती त्यांना हक्काने भेटतो आणि साहेबही प्रसन्न मुद्रेने, हसतमुखाने प्रत्येकाची विचारपूस करतात. सार्वजनिक जीवनातील हे गुण आजच्या काळात दुर्मीळ होत चालले आहेत, पण साहेबांनी ते जपले आहेत.



मतदारसंघातील कोणतीही समस्या असोसामान्य माणसाचा प्रश्न असो किंवा विकासकामाचा मुद्दासाहेब प्रत्येक विषय गांभीर्याने घेतात. शासन दरबारी पाठपुरावा करून, संघर्ष करून आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करून जनतेसाठी काहीतरी मिळवून देण्याची त्यांची तळमळ हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख आहे.

नगरसेवक पदापासून आमदार पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ राजकीय नव्हे, तर जनसेवेचा प्रवास आहे. गेली अनेक वर्षे दिवस-रात्र जनतेसाठी झटणाऱ्या या नेतृत्वाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज नांदेडच नव्हे, तर राज्यस्तरावरही त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

विकासाच्या बाबतीतही साहेबांनी मोठी कामगिरी केली आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात शासकीय रुग्णालय, कृषी महाविद्यालय, नवीन बसस्थानक, रस्ते, पूल यांसारखी अनेक महत्त्वाची कामे पूर्णत्वास आली आहेत किंवा सुरू आहेत. इतके करूनही आणखी काय करता येईल? हा विचार त्यांना सतत प्रेरित करत असतो.

साहेबांच्या यशामागे त्यांचे कुटुंबही तितकेच योगदान देत आहे. सौ. संध्याताई कल्याणकर यांचे सामाजिक कार्य आणि लोकांशी असलेला संपर्क यामुळे त्यांचेही नाव जनतेच्या मनात घर करून आहे. तसेच सुहास कल्याणकर हेही नगरसेवक म्हणून जनतेच्या सेवेत सक्रिय आहेत.

आमदार बालाजीराव कल्याणकर साहेब यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केला असता काही ठळक गुण दिसून येतात:

दूरदृष्टी मतदारसंघाच्या भविष्याचा स्पष्ट विचार, जनसंपर्क जनतेशी सतत संवाद आणि जवळीक, निर्णयक्षमता योग्य वेळी ठाम निर्णय घेण्याचे धैर्य, सचोटी व प्रामाणिकपणा पारदर्शक आणि विश्वासार्ह कार्यपद्धती, समस्या निवारण कौशल्य सर्वांना सोबत घेऊन मार्ग काढण्याची क्षमता, संयम व सहिष्णुता टीका स्वीकारूनही सकारात्मकतेने पुढे जाणे.

आजच्या स्पर्धात्मक राजकारणात आरोप-प्रत्यारोप, टीका-टिप्पणी या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. पण त्यातून मार्ग काढत, सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची जिद्द साहेबांनी आपल्या कार्यातून दाखवून दिली आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मतदारसंघातील प्रत्येक नागरिक आनंदाने त्यांना शुभेच्छा देत आहे. जनतेच्या प्रेमावर उभे राहून, कोणताही राजकीय वारसा नसताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे हे नेतृत्व खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

साहेबांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या माध्यमातून नांदेड उत्तर मतदारसंघ अधिक प्रगत, समृद्ध आणि आदर्श बनो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. आमदार बालाजीराव कल्याणकर यांना वाढदिवसाच्या कोटी-कोटी शुभेच्छा!

**प्रकाश गिरे पाटील**
**नांदेड**

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## डॉ. सोनाली जाधव यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३१ मे -**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडून डॉ. सोनाली जाधव यांना भौतिकशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी रेअर अर्थ आयन सबस्टिट्यूशन इफेक्ट ऑन द प्रॉपर्टीज ऑफ गॅडोलिनियम आयर्न गारनेट नॅनो पार्टिकल्स या विषयावर संशोधन पूर्ण केले. हे संशोधन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे अध्यक्ष भारत कस्तुरे, सचिव रामचंद्र आलूरे, प्रा. भालचंद्र बिराजदार, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, विक्रम आलूरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे तसेच जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### जिल्ह्यात गोवंश संरक्षणासाठी पोलिसांची धडक कारवाई...

## ११ जनावरे व लाखोंचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक व कत्तलीसाठी ठेवण्यात आल्याच्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये धाराशिव आणि शिराढोण पोलिसांनी एकूण ११ गोवंशीय जनावरे तसेच लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी अनेक आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने २८ मे रोजी रात्री नागनाथ रोड परिसरात कारवाई केली. यावेळी साहिल पिरसाब शेख (वय २६, रा. धाराशिव) हा पिकअप वाहन (एमएच-२४ एयू-५२९२) मधून चार जर्सी गायी व दोन वासरे अशी सुमारे ८६ हजार रुपये किंमतीची गोवंशीय जनावरे चारा-पाण्याची व्यवस्था न करता कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक करताना आढळून आला.

पोलिसांनी जनावरे व वाहनासह सुमारे २ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी प्राणी क्रूरता प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व अन्य संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत शिराढोण पोलीस ठाण्याच्या पथकाने २९ मे रोजी शिराढोण शिवारातील एका शेतातील गोठ्यावर छापा टाकला.

मंजुर उस्मान कुरेशी व इतर सात जणांनी पाच गोवंशीय बैल चारा-पाण्याविना निर्दयतेने बांधून ठेवून कत्तलीची तयारी केल्याचे पोलिसांना आढळून आले.

या कारवाईत गोवंशीय जनावरे व कत्तलीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण ८ लाख ६१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित आठ आरोपींविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंध अधिनियम तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे.

## आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी; दर्शनासाठी पाच तासांची प्रतीक्षा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत असून, दर्शनासाठी भक्तांना तब्बल चार ते पाच तास प्रतीक्षा करावी लागत आहे. सप्ताहअखेरची सुट्टी आणि वाढता धार्मिक ओघ यामुळे मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला आहे.

शनिवारपासूनच भाविकांची संख्या वाढू लागली होती. रविवारी पहाटेपासून दर्शन रांगांमध्ये मोठी वाढ झाली. मंदिरातील दर्शन मंडप, मुख्य रांगा तसेच बाहेरील परिसरातही भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी तासन्तास रांगेत उभे राहत आहेत.

उन्हाचा त्रास आणि गर्दी असूनही भाविकांमध्ये दर्शनाची उत्सुकता कायम असून, अनेकांनी पाच तास प्रतीक्षा करूनही देवीचे दर्शन घेतल्याचे समाधान व्यक्त केले. भाविकांना सुरक्षित आणि सुरळीत दर्शन मिळावे यासाठी मंदिर प्रशासन व पोलिसांकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसर, महाद्वार, दर्शन मंडप आणि प्रमुख मार्गांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आदी राज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक तुळजापूरमध्ये दाखल होत आहेत.

त्यामुळे शहरातील हॉटेल्स, व्यापारी प्रतिष्ठाने आणि बाजारपेठांमध्येही मोठी वर्दळ निर्माण झाली आहे.

मंदिर प्रशासनाने भाविकांनी संयम राखून दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, आगामी काही दिवसांतही भाविकांची गर्दी कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

## अहिल्यादेवींचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी; चौकात उभारणार पूर्णाकृती पुतळा : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देश, धर्म तसेच महिला सक्षमीकरणासाठी केलेले कार्य अतुलनीय असून त्यांच्या जीवनकार्यापासून समाजाला कायम प्रेरणा मिळत राहील, असे प्रतिपादन राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.



धाराशिव शहरातील अहिल्यादेवी होळकर चौक येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी चौकात सर्व आवश्यक परवानग्या पूर्ण करून अहिल्यादेवींचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल तसेच चौकाचा विकास करून परिसरातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त करताना त्यांनी महिलांना पशुउद्योगासाठी सहकार्य देण्याबरोबरच सुशिक्षित मुलींना नामांकित संस्थांमधून प्रशिक्षण उपलब्ध करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे सांगितले.

कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नगराध्यक्षा नेहा काकडे, अमित शिंदे, ॲड. खंडेराव चौरे, गणेश सोनटक्के, नगरसेवक इंद्रजीत देवकते, राहुल काकडे, राजकन्या अडसूळ, सतीश कदम, राजाभाऊ वैद्य, डॉ. गोविंद कोकाटे, डॉ. शैलजा कुलकर्णी, ॲड. जयश्री तेरकर, उषा लांडगे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर करत महिला सक्षमीकरण आणि समाजविकासाचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

## धानुरी येथे शेतातील १५ क्विंटल ज्वारी चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

धानुरी येथे शेतातील सुमारे १५ क्विंटल ज्वारी चोरी केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी बलभिम दादाराव साळुंके (वय ८०, रा. धानुरी) यांच्या शेत गट क्रमांक ८६ मधील अंदाजे २५ हजार रुपये किमतीची १५ क्विंटल ज्वारी दि.११ मे रोजी पहाटे चोरीस गेल्याची तक्रार त्यांनी दिली. या प्रकरणी निळकंठ शाहुराज बाबर, ज्ञानेश्वर निळकंठ बाबर, श्रीहरी राजेंद्र बाबर व नरहरी राजेंद्र बाबर यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## महाविकास आघाडीकडून महेश देशमुख यांना उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मे -**

लातूर-बीड-धाराशिव स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने अखेर आपला उमेदवार जाहीर केला असून, धाराशिव जिल्हा परिषदेचे सदस्य तथा अखिल भारतीय युवक काँग्रेस चे सचिव महेश माणिकराव देशमुख यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे.

ही जागा महाविकास आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला आली असून उमेदवारीसाठी अनेक इच्छुकांची नावे चर्चेत असताना महेश देशमुख यांच्या नावाची अचानक घोषणा झाल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

काँग्रेस पक्षाने उमेदवार निवडीचे अधिकार पक्षातील वरिष्ठ नेतृत्वाकडे सोपविले होते. त्यानंतर झालेल्या चर्चेनंतर महेश देशमुख यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर झाल्याने आता या निवडणुकीची राजकीय रंगत आणखी वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## प्रा. गणपत बिराजदार यांचा गौरवशाली सेवाप्रवास पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३१ मे -**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे मार्गदर्शक तथा सी.ओ.ई.पी. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. गणपत (भालचंद्र) बिराजदार हे आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांचा सेवाप्रवास प्रेरणादायी ठरला आहे.

सी.ओ.ई.पी.मध्ये प्रभावी अध्यापन, प्रवेश प्रक्रिया, वसतिगृह व्यवस्थापन तसेच विविध शासकीय बांधकाम प्रकल्पांमध्ये मार्गदर्शक म्हणून त्यांनी मोलाचे योगदान दिले. स्थापत्यशास्त्र क्षेत्रातील त्यांच्या कार्याची स्वतंत्र ओळख पुणे शहरात निर्माण झाली आहे.



शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरच्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्येही त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. संस्थेच्या शाळांच्या बांधकामासाठी मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या सहकार्यामुळे जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सुमारे १९ लाख रुपयांच्या खर्चातून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध झाली.

शैक्षणिक तळमळ, सामाजिक बांधिलकी आणि निगर्वी स्वभावामुळे प्रा. बिराजदार यांना सर्व स्तरांतून आदर मिळाला आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देत निरोगी, सुखी व समाधानकारक आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.

## आवार पिंपरीत अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ मे -**

तालुक्यातील आवार पिंपरी येथे रविवारी (दि. ३१ मे) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील अहिल्यादेवी होळकर चौकात माजी सरपंच सुरेश डाकवाले यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपस्थितांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव केला. महिला, गरीब व पीडित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य, तसेच गावोगावी विहिरी, आड आणि पाण्याच्या सुविधा उभारून जनतेची तहान भागविण्यासाठी केलेले प्रयत्न यांची माहिती देण्यात आली. अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार करून सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्यही त्यांनी केल्याचे वक्त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास उपसरपंच विजयकुमार गुडे, दिगंबर गुडे, लहू डाकवाले, मारुती डाकवाले, नभीराज नरुटे, समाधान डाकवाले, विलास जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. जयंतीनिमित्त गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# तरुणाई अडकत चाललीय फसवणुकीच्या जाळ्यात?

### सोशल मीडियावरील आभासी नात्यांचा वाढता प्रभाव ; प्रेमाच्या शोधात आर्थिक आणि मानसिक शोषणाचे देखील संकट!




**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.३१ मे -**

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या युगात माणसांमधील संवादाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. एकेकाळी प्रत्यक्ष भेटीगाठी, पत्रव्यवहार आणि कौटुंबिक-सामाजिक कार्यक्रमांमधून निर्माण होणारी मैत्री आता मोबाईलच्या स्क्रीनमध्ये सामावली आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, एक्स (ट्विटर) यांसारख्या समाजमाध्यमांमुळे जग जवळ आले असले, तरी त्याचबरोबर फसवणूक, भावनिक शोषण आणि आर्थिक लुटीचे प्रमाणही चिंताजनकरित्या वाढत आहे.

आजची तरुणाई सोशल मीडियाच्या आभासी विश्वात प्रेम, मैत्री आणि भावनिक आधार शोधताना अनेकदा फसवणुकीच्या जाळ्यात अडकत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत असून हाय, हॅलो पासून सुरू झालेला संवाद काही दिवसांतच जवळीक, भावनिक गुंतवणूक आणि प्रेमाच्या नात्यात परिवर्तित होतो. मात्र अनेकदा या नात्यांचा शेवट मानसिक त्रास, आर्थिक नुकसान आणि नातेसंबंधांच्या तुटणीत होतो.

#### एकटेपणामुळे वाढतो सोशल मीडियाचा आधार

आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक तरुण-तरुणी एकटेपणा, ताणतणाव आणि भावनिक रिक्तता अनुभवत आहेत.

अशावेळी सोशल मीडिया त्यांना आधार देणारे व्यासपीठ वाटते. नवीन मित्र, नवीन ओळखी आणि मनमोकळा संवाद यामुळे अनेक जण या माध्यमांकडे आकर्षित होतात.

### प्रेमाच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार...

सायबर गुन्हेगार सोशल मीडियाचा वापर करून बनावट प्रोफाइल तयार करतात. आकर्षक छायाचित्रे, खोट्या ओळखी आणि गोड बोलण्याच्या माध्यमातून ते समोरच्या व्यक्तीचा विश्वास संपादन करतात. काही दिवसांच्या संवादानंतर प्रेम, लग्न किंवा भविष्यातील आयुष्याची स्वप्ने दाखवली जातात. यानंतर अचानक आर्थिक मदतीची मागणी, गुंतवणुकीचे आमिष किंवा एखाद्या संकटाची खोटी कहाणी सांगून पैसे उकळण्याचे प्रकार घडतात. अनेक सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम तरुण-तरुणीदेखील अशा फसवणुकीला बळी पडत आहेत.

प्रत्यक्ष आयुष्यातील व्यक्तींपेक्षा आभासी मित्रांना अधिक महत्त्व दिले जाऊ लागल्याने कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींशी असलेले संबंध कमकुवत होत चालले आहेत. एका घरात राहूनही प्रत्येक जण आपल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

राज्यातील विविध सायबर पोलीस ठाण्यांमध्ये सोशल मीडियाद्वारे झालेल्या आर्थिक फसवणुकीच्या शेकडो तक्रारी दरवर्षी नोंदवल्या जातात. मैत्री किंवा प्रेमाच्या नात्याचा आधार घेऊन लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची अनेक उदाहरणे समोर येत आहेत. सायबर सेल आणि पोलीस प्रशासनाकडून वारंवार जनजागृती केली जात असतानाही अनेक जण अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवून आर्थिक व्यवहार करतात. त्यामुळे फसवणूक करणाऱ्यांचे फावते आहे.

सोशल मीडियावरील प्रत्येक व्यक्ती विश्वासार्ह असेलच असे नाही. त्यामुळे कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी वैयक्तिक माहिती शेअर करू नये.

तसेच सोशल मीडियावर झालेल्या ओळखीतील व्यक्तींना पैसे पाठवणे, बँक खात्याची माहिती देणे किंवा आर्थिक व्यवहार करणे टाळावे. सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचा वापर विवेकाने करणे आवश्यक आहे.

आभासी नात्यांपेक्षा प्रत्यक्ष आयुष्यातील नात्यांना अधिक वेळ आणि महत्त्व दिल्यास अनेक समस्या टाळता येऊ शकतात.

### वैवाहिक जीवनावरही परिणाम...

सोशल मीडियावरील वाढत्या वापराचा परिणाम वैवाहिक जीवनावरही होत असल्याचे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. सोशल साईट्सवर निर्माण झालेली नाती पती-पत्नीमधील विश्वासाला तडा देऊ शकतात. अनेकदा घरातील संवाद कमी होतो आणि मोबाईलवरील संवाद वाढतो. यामुळे गैरसमज, संशय, वादविवाद आणि कौटुंबिक तणाव वाढण्याच्या घटना घडतात. काही प्रकरणांमध्ये विवाहबाह्य संबंध निर्माण होऊन संसार उद्ध्वस्त झाल्याची उदाहरणेही समोर येत आहेत.

### सजगता हाच उपाय...

सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचे वास्तव असले तरी त्यातील प्रत्येक गोष्ट खरी असेलच असे नाही. प्रेम, मैत्री आणि विश्वास या भावनांचा गैरफायदा घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियाचा वापर करताना सतर्क राहणे, भावनांपेक्षा विवेकाला प्राधान्य देणे आणि कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहारांपासून दूर राहणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा, आभासी जगातील क्षणिक आकर्षण आयुष्यभराची फसगत ठरू शकते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आज लातुरात कृषी अधीक्षक कार्यालयासमोर चाबूक आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३१ मे : लातूर जिल्ह्यातील केवळ तीन महसूल मंडळातच शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर झाला आहे. गतावर्षी अतिवृष्टीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक पूर्ण खरडून गेले. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र रेणापूर तालुक्यातील पानगाव आणि औसा तालुक्यातील भादा, बेलकुंड महसूल मंडळातील शेतकऱ्यांना विमा मंजूर झाला. इतर महसूल मंडळातील पीक नुकसानीची दाखलंच घेण्यात आली नाही. याला जिल्हा कृषी कार्यालय आणि आय सी आय सी आय लोम्बर्ड विमा कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांचा पीकविमा तात्काळ देण्यात यावा. या मागणीसाठी शेतकरी संघटनेच्यावतीने आज दिनांक १ जून रोजी लातूर येथील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर सकाळी ११ वाजता चाबूक आंदोलन करण्यात येणार आहे. असा इशारा शेतकरी संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. आणि या आंदोलनात शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सर्व शेतकऱ्यांनी सोबत येताना चाबूक घेऊन यावे येणाऱ्या काळात जर विमा आला नाही तर शेतकरी संघटना आयसीआयसी लोबार्ड कंपनीचा ऑफिस फोडण्याचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे



# भाजपाचे आ. कराड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३१ मे : आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे, शेतकरी, शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर येथील 'प्रयाग या निवासस्थानी भाजपासह विविध राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी समाज माध्यम व दुरध्वनीच्या माध्यमातून जन्मदिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. आ. कराड मित्रपरिवाराच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीतील कार्यकर्ती, मदतनीस आणि आशा सेविकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. अभिष्टचिंतन सोहळ्यास ग्रामीण भागातील नागरीकांनी प्रचंड गर्दी केली होती. अनेक गावात ग्रामदैवतांची महापूजा करुन रमेशअपांना दीर्घाष्य लाभावे यासाठी कार्यकर्त्यांच्या वतीने महापूजा, आरती व प्रार्थना करण्यात आली.

गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, शेतकरी शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी सतत संघर्ष करणारे, गरजुंना वेळोवेळी मदत करणारे, कार्यकर्त्यांना बळ देवून मान आणि सन्मान मिळवून देणारे, हजारो कुटूंबांना आरोग्य सेवेच्या माध्यमातून दिलासा देणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे आणि आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील कार्यसम्राट आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांचा शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी जन्मदिवस मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जन्म दिनाच्या पूर्व संध्येला २९ मे रोजी रात्री भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे जाहीर कीर्तन झाले. या कीर्तनास हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.



आ. रमेशअप्पा कराड मित्र परिवाराच्या वतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील एमआयटी परिसरातील प्रयाग या निवासस्थानी अभिष्ठचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयाला लातूर ग्रामीण मतदार संघातील नव्हेतर संपूर्ण जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यातील भाजपा व विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मित्रपरिवारांनी दिवसभरात आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला, पुष्पगुच्छ देवून, मिठाई भरवून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. अभिष्ठचिंतन करण्यासाठी दिवसभर मोठी गर्दी झाली होती. ग्रामीण मतदार संघातील विविध गावागावातील महिला भजनी मंडळ उत्स्फुर्तपणे अभिष्ठचिंतन सोहळ्यात सहभागी होवून भजनी मंडळातील महिलांनी आप्पासाहेबांचा यशोचित सत्कार करुन जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. बंजारा समाजातील पाचशे महिलांना अशोक राठोड यांच्या वतीने पारंपारीक बंजारा पोशाख वाटप करण्यात आला. शैक्षणिक साहित्याची तुला करण्यात आली. सकाळच्या वेळी रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणूका मातेसह लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावागावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांचा अभिषेक, महापूजा व आरती करून आ. रमेशअप्पा कराड यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तर अनेक ठिकाणी रक्तदान शिबीर, यासह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयासह इतर ठिकाणच्या रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांना जन्मदिनानिमित्त केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री गिरीश महाजन, मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री आकाश फुंडकर, मंत्री नितेश राणे, मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजीमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, माजीमंत्री आ. संजय बनसोडे, खा. धनंजय महाडिक, सुरजितसिंह ठाकुर, आ. चित्राताई वाघ, आ. प्रसाद लाड, आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे, आ. संदिप जोशी, आ. शंकर जगताप, आ. सचिन शेट्टी, आ. पराग अळवणी, आ. सुरेश खाडे, आ. मिहीर कोटेचा, आ. प्रविण दटके, आ. विक्रम काळे, आ. सुधीर पाटील, आ. नारायण कुचे, आ. प्रताप अडसर, आ. सुरेश धस, आ. प्रशांत ठाकूर, आ. चैनसुख संचेती, आ. संतोष दानवे, आ. संजय केणेकर, आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. श्र्वेता महाले, आ. समाधान औताडे, आ. राजन नाईक, आ. महेश लांडगे, आ. श्रीजया चव्हाण, प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन, गजानन घुगे, राम सातपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी दुरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

जन्मदिनानिमित्ताने आ. रमेशअप्पा कराड यांना श्री. अघोर महाराज व इतर त्यांच्या सहकार्यांनी मंत्रोपचारात शुभाशिर्वाद दिले. अभिष्ठचिंतन कार्यक्रम प्रसंगी तुळशीरामअण्णा कराड, काशिरामनाना कराड, सौ. संजिवनीताई कराड, राजेश कराड, सौ. शुभांगी कराड, विहार बोडके, सौ. ऋतुजा बोडके, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋशिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह कराड परिवारातील अनेक सदस्य होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

## जिल्हा माहेश्वरी सभेचा पदग्रहण सोहळा उत्साहात



तभा वृत्तसेवा

लातूर दि.३१ मे : लातूर जिल्हा माहेश्र्वर सभेची नुतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झालेली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी माहेश्र्वरी सभेचे प्रदेशाध्यक्ष मधूसूदन गांधी, माजी प्रदेशाध्यक्ष श्रीकिशन भन्साळी, महिला संघटनच्या प्रदेश सचिव सौ. अनिता मालू, जिल्हा माहेश्र्वरी सभेचे नुतन अध्यक्ष सीए प्रकाश कासट, प्रदेशचे जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश तापडीया यांच्यासह नवनिर्वाचित सचिव राजेश मंत्री व जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. हरिप्रसाद सोमाणी, बालकिशन मुंदडा, गोविंद कोठारी, फुलचंद काबरा, गोकुळदास चांडक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महेशपूजन करण्यात आले. यानंतर हनुमान रांदड यांनी महेश वंदना सादर केली.

यावेळी प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी व मान्यवरांच्या हस्ते जिल्हा माहेश्र्वरी सभेतील नुतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट, सचिव राजेश मंत्री, उपाध्यक्ष चांदकिरण लड्डा, विष्णूदास मंत्री, शामसुंदर मानधना, सहसचिव गोकुलदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकि शोर कर्वा, संघटनमंत्री फुलचंद काबरा, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा व प्रचारप्रमुख नंदकिशोर लोहिया यांचा समावेश आहे. याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करत उपाध्यक्ष म्हणून लातूर येथील रामेश्र्वर पुनपाळे व उदगीरचे अशोक बाहेती यांची नियुक्ती केली.

## मुलांसाठी निवासी विपश्यना शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३१ मे : किशोरवयीन मुलांमध्ये एकाग्रता आणि मानसिक शांतता वाढवण्यासाठी लातूर विपश्यना समितीतर्फे विशेष निवासी विपश्यना ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ३ जून ते ११ जून २०२६ या कालावधीत धम्मआवास विपश्यना, बाभळगाव रोड (आरटीओ ऑफिसजवळ), लातूर येथे होणार आहे. या शिबिरात १५ ते १९ वर्षे वयोगटातील मुले सहभागी होऊ शकतात. शिबिरात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी युवा शिबिरांची अनुशासन संहिता व वेळापत्रक काळजीपूर्वक वाचणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी दिलीप सोनोने, सागर कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा.

## झोपलेल्या वृद्धाला लुटले

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३१ मे : शहरातील गजबजलेल्या गांधी मार्केट परिसरात सुलभ शौचालयाच्या पाठीमागे झोपलेल्या एका ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचे दागिने आणि मोबाईल चोरट्याने चोरुन लुटल्याची घटना २९ मे २०२६ रोजी समोर आली आहे. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, प्रभू पुराजी राठोड (वय ७५, रा. कानडी बोरगाव तांडा, ता.जि. लातूर) यांनी यासंदर्भात गांधी चौक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी राठोड हे २९ मे रोजी सायंकाळी ४:४५ ते ३० मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान गांधी मार्केट परिसरात असलेल्या एका सुलभशौचालयाच्या पाठीमागे झोपले होते. ते गाढ झोपेत असल्याचा फायदा घेत अज्ञात चोराने त्यांच्या अंगावरील ५० हजार रुपयांची पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, २० हजार रुपयांचा पाच तोळे वजनाचा चांदीचा करदोरा, पाच हजार रुपयांचे हातातील जुने घड्याळ आणि पाच हजारांचा मोबाईल असा ८० हजार रुपयांचा मुद्देमाल पळविला. झोपेतून उठल्यानंतर हा प्रकार लक्षात आला. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात धाव घेत प्रभू राठोड यांनी तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

## जागृती शुगरला राज्य पातळीवरील सर्वोत्कृष्ट तांत्रिक संचालन व नवीनत्तम कार्याचा प्रथम पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि.३१ मे : वेस्ट इंडियन शुगर मिल असोसिएशन (विस्मा) यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सर्वोत्तम तांत्रिक संचालन व नविनत्तम कार्य TECHNICAL OPERATION AND INNOVATION) मानाचा पुरस्कार लातूर जिल्ह्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज या कंपनीला शनिवारी शानदार सोहळ्यात पुणे येथे भारताचे केंद्रीय रस्ते, वाहतूक, परिवहन मंत्री ना. नितीन गडकरी व राजस्थानचे राज्यपाल महामहीम हरिभाऊजी बागडे यांच्या शुभ हस्ते जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे संचालक दिलीप माने सरव्यवस्थापक गणेश येवले यांनी पुरस्कार स्वीकारला या अत्यंत मानाच्या पुरस्कारामुळे राज्य पातळीवरील साखर उद्योगात लातूरच्या जागृती शुगर इंडस्ट्रीजचे नाव कोरले आहे राज्याचे माजी मंत्री सहकार तथा जागृति शुगर चे संस्थापक दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा व कार्यकारी संचालक गौरवी अतुलबाबा भोसले (देशमुख) यांच्या नेतृत्वाखाली गेली १६ वर्षापासून साखर कारखान्याची दैदिप्यमान वाटचाल सुरू आहे हे विशेष आहे



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील राज्याचे माजी सहकार मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री नामदार शिवेंद्रसिंह राजे भोसले खासदार बजरंग सोनवणे साखर आयुक्त संजय कोलते, बी बी ठोंबरे यांची उपस्थिती होती.

जागृती शुगर इंडस्ट्रीज मागच्या १६ वर्षाच्या गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात उसाचे गाळप करत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी पेक्षा अधिक भाव देत या भागात शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देण्याचा प्रयत्न केला असून हे करीत असताना माजी मंत्री सहकार महर्षी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने सूक्ष्म नियोजन करत पारदर्शकता ठेवून केवळ उस गाळप इतक्यावरच न राहता शुगर इंडस्ट्रीजने इथेनॉल, वीज, सी बी जी गॅस आदी विविध नवनवीन तंत्रज्ञान वापरून प्रकल्प हाती घेतले आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अधिक उसाला योग्य भाव देण्यासाठी या साखर कारखान्याकडून मोठी मदत झाली असून राज्यात खाजगी साखर उद्योगात मराठवाडा आणि विदर्भ राज्यात कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव देण्यात आघाडीवर राहिलेला आहे.

या सोहळ्यास जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, उपअभियंता अक्षय सूर्यवंशी, मुख्य रसायन तज्ञ ज्ञानेश्र्वर जाधव, केमिस्ट गंगाधर जाधव, अभियंता महादेव डोंगरे, लॅब केमिस्ट श्रीरामवार, आदी उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधून देणार : नगराध्यक्ष हलगरकर



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३१ मे : निलंगा शहरातील अहिल्या सृष्टी येथे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर याच्या ३०१वी जयंती निमित्त निलंगा नगराध्यक्ष संजयराज हलगरकर याच्या हस्ते दीपप्रज्वलन, प्रतिमेचे पूजन, ध्रोवजारोहण , भंडारा उधळून जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांनी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह लवकरात लवकर बांधून देण्याचे अहिल्याप्रेमी, धनगर समाजाला आश्र्वासन दिले

या वेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिगाडे, उपनगराध्यक्ष रवी फुलारी, नगरसेवक हरिभाऊ सगरे, ईश्र्वर पाटील, दत्ता मोहळकर, प्रा गजेंद्र तरगे,मल्हारी पेठकर, गणेश पेठकर,राहुल कांबळे, सचिन गायकवाड, ब्रमदेसर, नाना आकडे,सामाजिक कार्यकर्ते झटींग (आण्णा ) म्हेत्रे, नामदेव काळे, प्रकाश सराटे, राजेंद्र हजारे,एम, एम, जाधव सर, कमलाकर म्हेत्रे, मोहन सोनटक्के, शिवाजी पांढरे, संदीप वजीर ,हगरगे सर, भगिरत वरवटे, तुकाराम सूर्यवंशी, रोहिदास म्हेत्रे, माणिक बिराजदार, मोहरे सर आदी सह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी विविध राजकीय पक्षाचे नेते वकार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या सख्याने उपस्थित होते.

### शिऊर येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी.

निलंगा तालुक्यातील शिऊर ग्रामपंचायत कार्यालय येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

अहिल्यादेवी जयंती निमित्त अभिवादन करण्यासाठी गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी सरपंच भानुदास सूर्यवंशी, उपसरपंच शेषेराव बंडगर, अमीर पटेल, रमेश गोबाडे, दिनकर तुगावे, तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानदेव तुगावे, राजू गोबाडे, श्रीमंत काचे, प्रताप तुगावे, अच्युत म्हेत्रे, भरत कांबळे, राजकुमार जाधव, व्यकट कांबळे, बालाजी कांबळे, आबा बनसोडे, पिरसाब पटेल व गावातील नागरिक मोठया प्रमानातं उपस्थित होते.

## नारदीय कीर्तनातून उलगडले स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनाचे अनेक पैलू




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३१ मे : लहान वयातील कीर्तनकार म्हणून उदयास येत असलेल्या ह. भ. प. सायली कुलकर्णी हिने आपल्या नारदीय कीर्तनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जीवनप्रवासातील काही महत्वपूर्ण घटना विषद करून त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू उपस्थित रसिकासमोर उलगडले.

उदगीर येथील संस्कार भारती शाखेच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची १४३ वी जयंती, वंदे मातरम या गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव व राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे शताब्दी वर्षे याचे औचित्य साधून ह. भ. प. सायली उमाकांत कुलकर्णी हिच्या नारदीय कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारती उदगीर शाखेचे अध्यक्ष सतीश उस्तुरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत अध्यक्षा प्रा. स्नेहल पाठक यांची उपस्थिती होती.

यावेळी सायली कुलकर्णी यांनी आपल्या नारदीय कीर्तनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे चरित्र मांडताना देशभक्ती ही सावरकर यांच्या अंतःकरणात ओतप्रोत भरलेली होती. या देशभक्तीतूनच त्यांनी अनेक महत्वपूर्ण ग्रंथाचे लिखाण केले असल्याचे सांगत संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अनेक अभंगाचा दाखला देऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्व विषद केले.

यावेळी बोलताना प्रा. स्नेहल पाठक यांनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे केवळ देशभक्तच नव्हते तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासोबत त्यांनी सामाजिक प्रबोधनावर भर दिला असल्याचे सांगत संस्कार भारतीच्या माध्यमातून नारदीय कीर्तनासारखा उपक्रम राबविण्यात आला हे कौतुकास्पद आहे. नवीन कलाकारांना सांस्कृतीक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी उदगीरच्या संस्कार भारतीने सातत्याने पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात सतीश उस्तुरे यांनी संस्कार भारती उदगीर शाखेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती देऊन आगामी काळात सर्वांच्या सहकार्यातून कलोपासनेचे उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर व भारतमातेच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. संस्कार भारतीचे ध्येयगीत गोपाळ जोशी यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय गुडसूरकर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीपाद सिमंतकर यांनी केले. आभार डॉ. रविकांत पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार भारतीचे मार्गदर्शक डॉ. संजय कुलकर्णी, अजय दंडवते, सचिव विक्रम हलकीकर, कोषाध्यक्ष योगेश मूर्के, प्रा. मुकेश कुलकर्णी, प्रदीप पत्तेवार, प्रा. प्रसाद जालनापूरकर, प्रा. गौरव जेवळीकर, प्रा. राहुल आलापुरे, बालाजी मूर्के यांच्यासह संस्कार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.